सदैव आपल्या वाचकांसोबत | कार्तिक कृ.४ | पृष्ठ : १४ | मूल्य : रु.५.०० मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित

पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी

# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

मुंबई, शनिवार, १२ नोव्हेंबर २०२२ | www.navarashtra.com | /navarashtra





मला कठोर भूमिका नाही जमत
आतील पृष्ठावर

## चित्रपटगृहात राडा प्रकरण; 'हर हर महादेव'चा वाद

# जितेंद्र आव्हाडांना अटक

**ठाणे, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार व माजी कॅबिनेट मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांना शुक्रवारी पोलिसांनी अटक केली. ठाणे येथे एका मॉलमधील चित्रपटगृहात सुरु असलेला 'हर हर महादेव' चित्रपट त्यांनी बंद पाडला होता. त्यावेळी मोठा राडा झाला होता. याप्रकरणी पोलिसांनी आव्हाडांना अटक केली आहे. 'हर हर महादेव' या चित्रपटात इतिहासाची मोडतोड करण्यात आली आहे. या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराज व बाजीप्रभू देशपांडे यांच्याबद्दलचे उल्लेख चुकीचे असल्याचा आरोप आव्हाड यांनी केला होता. हा चित्रपट चालू देणार नाही, असा इशार देत त्यांनी सोमवारी रात्री काही कार्यकर्त्यांना सोबत घेऊन रात्री दहा वाजण्याच्या सुमारास विवियाना मॉल येथील चित्रपटाचा शो बंद पाडला होता. यावेळी चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या एका दर्शकाने चित्रपटाचे पैसे परत मागितले, तसेच कोण जितेंद्र आवड असा सवाल केल्याने, संतप्त झालेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी त्या दर्शकाला मारहाण केली होती. यानंतर मंगळवारी ठाण्यातील वर्तकनगर पोलीस ठाण्यात जितेंद्र आव्हाडांसह 100 कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर मनसेने या चित्रपटाला पाठिंबा दर्शविला. या प्रकारामुळे ठाण्यातील वातावरण चिघळले होते.

### पक्षाची मदत घेणार नाही



ओरीजनल एफआयआरमधील सर्व कलम हे जामीनपात्र आहेत. पण आम्हाला अडकवायचे, त्यामुळे एक विशेष कलम शोधून आणले. हा संपूर्णत: कट रचण्यात आला आहे. सरकारने हा कट रचला आहे. पोलिस हतबल आहेत. आता प्रत्येक पोलिस स्टेशनच्या बाहेर 'बाळासाहेबांची शिवसेना' असा बोर्ड लावणार आहे. माझा आरोप कोणावर आहे हे महाराष्ट्राला दोन मिनिटात कळले आहे. पक्षाचीही मदत घेणार नाही. मला माहित आहे कसे लढायचे. – **जितेंद्र आव्हाड**, आमदार, राष्ट्रवादी

भाजपसोबत सत्तेत असलेल्या शिंदे गटातील एका आमदाराने गोळीबार केला. मात्र या आमदारावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास चुकीच्या पद्धतीने दाखवला जात आहे, म्हणून एखादा चित्रपट थांबवल्यावर कारवाई केली जात आहे. ही आश्चर्याची बाब आहे. पोलिस यंत्रणेच्या मदतीने महाराष्ट्राचा आवाज दाबणार आहात का? माझा महाराष्ट्र कोठे नेऊन ठेवला आहे?
– **रोहित पवार**, आमदार, राष्ट्रवादी

### कायदा हातात घेणे चुकीचे



अत्यंत योग्य आणि स्वागतार्ह कारवाई आहे. सार्वजनिक ठिकाणी जाऊन गोंधळ घालणे, लोकांना मारहाण करणे योग्य नाही. चित्रपटावर आक्षेप होता तर सेन्सॉर बोर्ड किंवा पोलिसांकडे तक्रार करता आली असती. पण स्वत: लोकप्रतिनिधी असताना कायदा हातात घेणे ही आव्हाडांची जुनी खोड आहे.
– **अतुल भातखळकर**, आमदार, भाजपा

### फाशी दिली तरी चालेल

**प्रसारमाध्यमांशी बोलताना आव्हाड म्हणाले की, शिवरायांची बदनामी रोखली म्हणून मला अटक झाली असेल तर, त्याचे मी स्वागतच करतो. मी स्वत: जेलमध्ये जाऊन बसेन. हे सरकार नेमके कोणाचे आहे? शिवरायांची बदनामी करणाऱ्यांचे आहे का? मी लढायला तयार आहे. फाशी दिली तरी चालेल. पण, मी जे केलेले नाही, तो मी गुन्हा कबूल करणार नाही. शिवाजी महाराजांचा अनऐतिहासिक चित्रपटाचा विरोध केल्यामुळे जर माझ्यावर कारवाई होत असेल तर मी स्वत: तुरुंगात जाऊन बसेन. मी जामीन मागणार नाही आणि घेणार सुद्धा नाही. या अटकेच मी मनापासून स्वागत करतो. महाराष्ट्राला पोलिसराजची ओळख माझ्या अटकेमुळे होईल, असेही आव्हाड म्हणाले.**



## सेन्सेक्सची १,१८१ अंकांची झेप

**मुंबई.(ए).** शुक्रवारी आठवड्याच्या शेवटच्या दिवशी भारतीय शेअर बाजारात तेजी पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्सने 1181 अंकांची वाढ नोंदवली आणि 61,795.04 अंकांवर बंद झाला. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी 321 अंकांच्या वाढीसह 18,349.70 अंकांवर बंद झाला. निफ्टी 50 मध्ये 37 शेअर्स वाढीसह बंद झाले तर 12 शेअर्स घसरले. शुक्रवारी एचडीएफसी बँकेच्या दोन्ही समभागांमध्ये 5.72 ते 5.73 टक्क्यांची वाढ झाली. याशिवाय इन्फोसिस 4.58 टक्के, टेक महिंद्रा 3.65 टक्के आणि एचसीएल टेक्नॉलॉजी 3.47 टक्क्यांनी वधारले. आयशर मोटर्स 4.91 टक्के, हीरो मोटोकॉर्प 1.75 टक्के आणि स्टेट बँक 0.95 टक्क्यांनी घसरले. शेअर बाजारात ऑटो, एफएमसीजी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रातील समभाग तेजीत राहिले. बँकिंग, आयटी, फार्मा, धातू, ऊर्जा, मीडिया आणि रिअल इस्टेट क्षेत्र वाढले.

# काँग्रेसच्या हाताला 'मशाली'ची साथ

## भारत जोडो यात्रेत राहुल गांधी– आदित्य ठाकरे एकत्र

**हिंगोली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वात निघालेली भारत जोडो यात्रा सध्या महाराष्ट्रातून जात आहे. नांदेड जिल्ह्यातील चार मुक्काम आणि 120 किमीचा प्रवास पूर्ण करत भारत जोडो यात्रा शुक्रवारी हिंगोली जिल्ह्यात दाखल झाली. हिंगोली जिल्हा काँग्रेसच्या वतीने भव्य स्वागत करत भारत जोडो महाद्वारातून यात्रेने हिंगोली जिल्ह्याकडे मार्गक्रमण केले. यावेळी यात्रेत काँग्रेसचा मित्रपक्ष असलेला शिवसेना पक्षही सहभागी झाला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी नांदेड आणि हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवरील चोरांबा फाटा येथे यात्रेत हजेरी लावली. यावेळी त्यांच्यासोबत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले देखील उपस्थित होते. **त्या मुलांचे संगणकाचे स्वप्न केले पूर्ण :** राहुल गांधी यांनी गुरूवारी भाषण करत असताना दोन लहान मुलांचा उल्लेख केला होता. या लहान मुलांचा उल्लेख करत राहुल गांधी म्हणाले होते की, जी दोन मुले सॉफ्टवेअर इंजिनिअर बनू इच्छितात त्यांनी अजून संगणकही पाहिलेला नाही तसेच त्यांच्या शाळेतही संगणक नाही. यानंतर शुक्रवारी त्या दोन मुलांच्या घरी जाऊन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्यांना संगणक भेट दिले. राहुल गांधीही या दोन मुलांच्या घरी उपस्थित होते. या दोन मुलांचे सॉफ्टवेअर इंजिनिअर होण्याचे स्वप्न आहे. राहुल गांधी यांनी या दोघांनाही संगणक दिल्याने ते पूर्ण होण्यास मदत होणार आहे. यावेळी खर्गे म्हणाले, आमचा हा मानस आहे की एकाही भारतीय मुलाचे स्वप्न चिरडले जाऊ नये.



### संविधान, लोकशाहीसाठी लढा

संविधान आणि लोकशाहीसाठी लढत आम्ही आहोत. महाराष्ट्रामध्ये आलेले सरकार घटनाबाह्य आहे. अशाच वागणुकीमुळे आपल्या घटनेला आणि लोकशाहीला या देशात धोका आहे. मी भारत जोडो यात्रेत सहभागी होत असलो तरी आणि आम्ही दोन्ही पक्ष वेगवेगळ्या विचारांचे असलो तरी लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. कधीकाळी इंदिरा गांधी आणि बाळासाहेब प्रणव मुखर्जींसाठी एकत्र आले होते.
– **आदित्य ठाकरे**, आमदार, शिवसेना (उबाठा)

### # QUICK NEWS


### 'बेरोजगारीतही शाहांच्या मुलाला नोकरी'

**नांदेड (ए).** द्वेषाचे बिज पेरून समाजाला, जाती-धर्माला एकमेकांविरोधात लढवून भाजपा आपली राजकीय पोळी भाजत आहे. देशात महागाई, बेरोजगारीची समस्या मोठी असताना केंद्रातील भाजपा सरकार त्याकडे लक्ष देत नाही. अशा विपरीत परिस्थितीत भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून देश जोडण्यास निघालेल्या राहुलजी गांधी यांच्याकडून लोकांच्या आशा, अपेक्षा व विश्वास असल्याने प्रचंड मोठ्या संख्येने लोक सहभागी होत आहेत, असे काँग्रेस नेते कन्हैया कुमार यांनी सांगितले. अर्धापूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना कन्हैया कुमार यांनी भारत जोडो यात्रेचा उद्देश स्पष्ट केलो. ते पुढे म्हणाले की, पदयात्रेत सहभागी झालेले लोक त्यांना भेडसावणाऱ्या दैनंदिन जिवनातील समस्यांवर बोलत आहेत. शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव मिळत नाही, शेतमालाला भाव मिळत नाही, उच्च शिक्षण घेऊनही नोकरी लागत नाही अशी तरुणांची अवस्था आहे मात्र अमित शाह यांच्या मुलाला मात्र नोकरी लागते तेही नियम बदलून याचा संताप तरुणांमध्ये आहे.

# ज्ञानवापी शिवलिंगाचे संरक्षण कायम

## हिंदू पक्षाला ३ आठवड्यांची मुदत

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** वाराणसी येथील ज्ञानवापी मशीदत सापडलेल्या 'शिवलिंगा'च्या संरक्षणाबाबत सुप्रीम कोर्टाने आपला पूर्वीचा आदेशाला मुदतवाढ देत संरक्षण पुढील आदेशापर्यंत कायम ठेवले आहे. यासोबतच सुप्रीम कोर्टाने हिंदू पक्षाला उत्तर देण्यासाठी तीन आठवड्यांची मुदत दिली आहे. ज्ञानवापी वादावरील खटला मजबूत करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने हिंदू पक्षकारांना वाराणसी जिल्हा न्यायाधीशांसमोर अर्ज करण्याची परवानगी दिली. याआधी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने शिवलिंगाच्या संरक्षणाचे आदेश दिले होते. शुक्रवारी तोच आदेश पुढील निर्णयापर्यंत कायम ठेवण्यात आला आहे. ज्ञानवापी परिसरात सापडलेल्या शिवलिंगाचे जतन करण्याची मुदत १२ नोव्हेंबरपासून वाढवण्याच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाने हा निर्णय दिला.वकील विष्णू शंकर जैन यांनी हिंदूंच्या बाजूने उपस्थित राहून गुरुवारी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या प्रकरणाचा उल्लेख केला आणि याचिकेवर लवकर सुनावणी घेण्याची मागणी केली. शिवलिंगाच्या सुरक्षेबाबत सुप्रीम कोर्टाने शुक्रवारी सुनावणी निश्चित केली होती. याआधीच्या आदेशात कोर्टाने वाराणसीच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मशिदीच्या आत ज्या ठिकाणी 'शिवलिंग' सापडले आहे ते जतन करण्याचे निर्देश दिले होते.



## सुप्रीम कोर्टाचे निर्देश • नलिनीसह सहा आरोपींची मुक्तता

# राजीव गांधींच्या मारेकऱ्यांची सुटका

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** एकीकडे काँग्रेस नेते राहुल गांधी भारत जोडो यात्रेत व्यस्त असताना त्यांचे वडील आणि देशाचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या मारेकऱ्यांची कारागृहातून सुटका करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने शुक्रवारी दिले. त्यामुळे जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या नलिनी आणि आरपी रविचंद्रन यांच्यासह सहा आरोपींची लवरकच सुटका होणार आहे. न्या. बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने त्यांची वागणूक समाधानकारक असल्याने त्यांच्या शिक्षेचा कालावधी पूर्ण होण्याआधीच त्यांची सुटका करण्याची परवानगी दिली आहे. या दोषींवर अन्य कोणताही खटला नसेल तर त्यांची सुटका करावी. राज्यपालांनी या प्रकरणात कुठलाही निर्णय न घेतल्याने सुप्रीम कोर्टाने हा निर्णय घेतला असल्याचे निर्णयात म्हटले आहे. या प्रकरणात दोषी ठरलेल्या पेरारिवलनच्या सुटकेचा आदेश उर्वरित दोषींनाही लागू असेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. या वर्षाच्या सुरुवातीला सुप्रीम कोर्टाने पेरारिवलनच्या सुटकेचे आदेश दिले होते. 21 मे 1991 रोजी तमिळनाडूमध्ये एका निवडणुकीच्या रॅलीदरम्यान आत्मघातकी हल्ल्यात राजीव गांधींची हत्या झाली होती. या प्रकरणात पेरारिवलनसह 7 जण दोषी आढळले. पेरारिवलन यांना टाडा न्यायालय आणि सुप्रीम कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली होती. मात्र, नंतर सुप्रीम कोर्टाने दयेचा अर्ज निकाली काढण्यास उशीर झाल्याच्या कारणास्तव फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली.



### या ६ दोषींची सुटका होणार

1) नलिनी 2) रविचंद्रन
3) मुरुगन 4) संथन
5) जयकुमार
6) रॉबर्ट पॉईस

### तामिळनाडू सरकारचा पाठिंबा

तमिळनाडू सरकारने यापूर्वी राजीव गांधी हत्येतील दोषी श्रीहरन आणि आरपी रविचंद्रन यांच्या अकाली सुटकेचे समर्थन केले होते. कारण त्यांची जन्मठेपेची शिक्षा माफ करण्याचा राज्य सरकारचा 2018 चा सल्ला राज्यपालांवर बंधनकारक होता. दोन वेगळ्या शपथपत्रांमध्ये, राज्य सरकारने सुप्रीम कोर्टाला सांगितले होते की, 9 सप्टेंबर 2018 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी या प्रकरणातील सात दोषींच्या दयेच्या अर्जावर विचार केला आणि घटनेच्या कलम 161 नुसार राज्यपालांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर केला. या दोषींची जन्मठेपेची उर्वरित शिक्षा माफ करण्याचा प्रस्ताव होता. दरम्यान, मद्रास हायकोर्टाने याचिका फेटाळल्यानंतर सध्या पॅरोलवर बाहेर असलेल्या नलिनी यांनी तुरुंगातून लवकर सुटकेसाठी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

# न्यायमूर्ती डांगरे यांची सुनावणीतून माघार

## देशमुखांच्या जामिनाला सीबीआयचा विरोध

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या जामीन अर्जाला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) शुक्रवारी मुंबई हायकोर्टात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात विरोध केला. देशमुख यांच्यावर भ्रष्टाचार, खंडणी व कट रचण्याचे गंभीर आरोप असल्याचे सीबीआयने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या एकल खंडपीठासमोर शुक्रवारी देशमुख यांच्या वतीने तातडीच्या सुनावणीची मागणी करणाऱ्या जामीन अर्जाचा उल्लेख करण्यात आला. मात्र, न्यायमूर्ती डांगरे यांनी कोणतेही कारण न देता या प्रकरणातून माघार घेतली आहे. वैयक्तिक कारणांनी न्यायमूर्ती डांगरे यांनी माघार घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. आता जामीन याचिका आता उच्च न्यायालयाच्या अन्य एकल खंडपीठासमोर ठेवली जाणार आहे. सीबीआयचे पोलिस उपअधीक्षक मुकेश कुमार यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, आरोपपत्रासह सादर केलेले तोंडी आणि कागदोपत्री पुरावे अर्जदाराचा (देशमुख) गुन्ह्यांमध्ये गुन्हेगारी सहभाग सिद्ध करण्यासाठी पुरेसा आहे. अर्जदारावर भ्रष्टाचार, खंडणी व गुन्हेगारी कट रचण्याचे गंभीर आरोप आहेत. मुंबई हायकोर्टाने एप्रिल 2021 मध्ये सीबीआयला प्राथमिक चौकशी करण्याचे निर्देश दिले होते.





# जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीला दिलासा नाही




**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीवर महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनाने कारवाई करत कंपनीचा उत्पादन परवाना कायमस्वरूपी रद्द केला होता. मुंबई हायकोर्टानेही परवाना रद्दचा निर्णय कायम ठेवला आहे.
त्यामुळे कंपनीच्या अडचणीत वाढ झाली आहे. नवजात बालकांसाठी जॉन्सन अँड जॉन्सन बेबी पावडरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. परंतु या कंपनीच्या उत्पादन प्रक्रियेत दोष असल्यामुळे नवजात शिशू आणि लहान मुलांच्या त्वचेस अपाय होण्याची शक्यता आहे. कंपनीचे उत्पादन अशाच प्रकारे सुरू राहिल्यास बालकांच्या आरोग्याला धोका पोहोचू शकतो. त्यामुळे मुंबई आणि मुलुंडमध्ये असणाऱ्या संस्थेच्या उत्पादनाचा परवाना आदेशान्वये कायम स्वरूपी रद्द करण्यात आला होता. हे प्रकरण नंतर मुंबई हायकोर्टात गेले. कंपनीने मुंबई हायकोर्टात प्रतिज्ञापत्र सादर करून आपली भूमिका मांडली होती. मात्र, मुंबई हायकोर्टाने कंपनीला दिलासा न देता एफडीएचा निर्णय कायम ठेवला. गेल्या अनेक वर्षांपासून जॉन्सन अँड जॉन्सन कंपनी भारतात आपल्या उत्पादनांची विक्री करत आहे. परंतु सदर नमुने सदोष आहेत. त्यामुळेच या कंपनीच्या उत्पादनचा परवाना रद्द करण्यात येत आहे असं सरकारच्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### आदरांजली



**बंगळुरू.** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी बंगळुरू येथील महर्षी वाल्मिकी यांच्या पुतळ्याला आदरांजली अर्पण केली. यावेळी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईही उपस्थित होते. कर्नाटकात पुढील सहा महिन्यात विधानसभा निवडणुका होत असल्याने पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यांना महत्व प्राप्त झाले आहे.

## सोरेन यांचा मास्टर स्ट्रोक; २७ टक्के ओबीसी आरक्षण

# झारखंडमध्ये आता ७७ टक्के आरक्षण

**राची, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** झारखंडमध्ये हेमंत सरकारने आरक्षण वाढवून 77 टक्के करण्याचे विधेयक मंजूर केले आहे. आता राज्यात अनुसूचित जमाती (एसटी) साठी 28 टक्के, मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) 27 टक्के आणि अनुसूचित जातींसाठी (एससी) 12 टक्के आरक्षण लागू केले जाणार आहे. विधानसभेच्या विशेष अधिवेशनात शुक्रवारी सरकारने दोन महत्त्वाची विधेयके सभागृहाच्या पटलावर ठेवली. यामध्ये 1932 च्या खत्यान आधारित स्थानिक धोरणाला कायदेशीर दर्जा देण्याचा आणि दुसरा उद्देश ओबीसी आरक्षण 14% वरून 27 टक्के करण्याचा होता. हे दोन्ही विषय विद्यमान सरकारच्या जाहीरनाम्यातही समाविष्ट होते. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांसाठी निवडणुकीचा मुद्दा बनलेल्या या दोन विधेयकांबाबत हेमंत सरकारने शुक्रवारी विधानसभेचे अधिवेशन बोलावले होते. याबाबत सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि मंत्र्यांनी सांगितले की, गेली 20 वर्षे भाजपाची सत्ता होती, पण त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. यावेळी आमच्या सरकारने हे करून दाखवले जे जनतेच्या हिताचे आहे. तेव्हा केवळ विधानसभेच्या पटलावर मांडून स्थानिकता आणि आरक्षण होणार नाही, तर ते ९व्या अनुसूचीसह केंद्रात मंजूर करावे यानंतर विधानसभेत मांडावे, असे विरोधकांनी म्हटले आहे.

### आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला



राज्याच्या इतिहासात हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, असे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी विधानसभेत बोलताना सांगितले. राज्यातील शूर शहीद आणि आंदोलकांचे स्वप्न साकार झाले. 1932 ची खत्यान आधारित परिसर आणि एसटी-28%, मागास-27% आणि एससी-12% आरक्षण विधेयके विधानसभेच्या विशेष अधिवेशनात मंजूर करण्यात आली.

### खत्यान विधेयक मंजूर

आरक्षणाव्यतिरिक्त सोरेन सरकारने 1932 भूमी अभिलेखाचा ठरावही विधानसभेत मंजूर करून घेतला. झारखंडच्या स्थानिक व्यक्तींची व्याख्या आणि त्यांना सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर फायद्यांचा विस्तार करण्यासाठी विधानसभेच्या विशेष अधिवेशनात विधेयक 2022 मंजूर करण्यात आले. या अंतर्गत, ज्या लोकांचे पूर्वज 1932 पूर्वी या भागात राहत होते आणि ज्यांची नावे त्या वर्षीच्या जमिनीच्या नोंदीमध्ये समाविष्ट होती, त्यांना हा प्रस्ताव लागू झाल्यावर झारखंडचे स्थानिक रहिवासी मानले जाईल.

## गैरप्रकारास आळा • हिमाचल प्रदेशात ६८ जागांसाठी आज मतदान; निवडणूक आयोगाचे मोठे पाऊल

# 'क्यूआर' कोडद्वारे मतदारांची ओळख

**मंडी, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** हिमाचल प्रदेश विधानसभेच्या 68 जागांसाठी आज शनिवारी मतदान होत आहे. जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी निवडणूक आयोगातर्फे विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. या निवडणुकीत मतदानाचे रिअल टाइम मॉनिटरिंग केले जाईल. तसेच पहिल्यांदाच क्यूआर कोडद्वारे मतदारांची ओळख पटवली जाणार आहे. ही प्रक्रिया राज्यातील कांगडा, सिमला, मंडी आणि हमीरपूरमधील प्रत्येकी एका विधानसभा मतदारसंघात केली जाईल. बोगस मतदान किंवा इतर गैरप्रकार रोखण्यासाठी यावेळी निवडणूक आयोगाने हा पुढाकार घेतला आहे. मंडी सदर विधानसभेच्या बूथवर क्यूआर कोड मतदार स्लिपचा वापर केला जाईल. मतदार स्लिप घेऊन बूथवर जाताच मतदान अधिकारी ॲपद्वारे त्यांची व्होटर स्लिप स्कॅन करतील.स्कॅनिंग केल्यानंतर मतदाराची माहिती कर्मचाऱ्यांसमोर असेल. याद्वारे ते मतदाराची उपस्थिती चिन्हांकित करू शकणार आहेत.



### ८ डिसेंबरला निकाल

हिमाचल प्रदेशातील एका टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीचा निकाल 8 डिसेंबरला जाहीर होणार आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीचे निकालही त्याच दिवशी लागणार आहेत. गेल्या निवडणुकीत हिमाचलमधील 68 जागांपैकी भाजपाने 44 जागा जिंकून सरकार स्थापन केले होते. तर 21 जागा काँग्रेसला मिळाल्या होत्या.

### इंटरनेट नसेल तरही काम करेल

इंटरनेट सुविधा नसली तरी हे ॲप काम करेल. मतदाराने हजेरी नोंदवूनही मतदान करण्यास नकार दिल्यास अशा प्रकारचा गुन्हा दाखल होऊ शकतो. मंडी सदर व्यतिरिक्त, क्यूआर कोड मतदार स्लिप हमीरपूर जिल्ह्यातील हमीरपूर, कांगडा जिल्ह्यातील धर्मशाला आणि सिमला जिल्ह्यातील सिमला शहरी विधानसभा मतदारसंघात वापरली जाईल. सहाय्यक निवडणूक अधिकारी मंडी सदर रितिका जिंदाल यांनी सांगितले की, मंडी सदर विधानसभा मतदारसंघातील बूथवर मतदारांची ओळख क्यूआर कोडद्वारे केली जाईल. यावरून मतदानाच्या टक्केवारीचीही अचूक कल्पना येईल.

# पवारांचा ठाकरेंवर जादूटोणा

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंचा निशाणा; राष्ट्रवादी, शिवसेनेचे प्रत्युत्तर

**सातारा, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** शरद पवारांनी उद्धव ठाकरेंवर जादूटोणा केला आहे. तसेच शरद पवारांच्या ताब्यात एकदा कोणी आले की त्याची सुटका होत नाही, असे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. बावनकुळे यांनी शुक्रवारी भाजपा खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेतली. यानंतर पत्रपरिषदेत त्यांनी शरद पवारांवर कठोर टीका केली. जादूटोणा करणारे भोंदूबाबा कोण असे विचारले असता ते म्हणाले, हे भोंदूबाबा कोण हे पूर्ण देशाला आणि राज्याला माहित आहे. शरद पवारांच्या ताब्यात एकदा कोणी आला तर त्याची सुटका होत नाही.

### आता आम्ही सतर्क



राष्ट्रवादी काँग्रेसने आता सत्तेत येण्याचे स्वप्न बघणे सोडले पाहिजे. बेईमानीतून सत्ता बनवण्याचा प्रयत्न अडीच वर्षांपूर्वी केला होता. उद्धव ठाकरेंवर एक प्रकारे जादूटोणा करण्यात आला होता. त्यात उद्धव ठाकरे फसले आणि विचार न करता राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेले. हा जादूटोणा राष्ट्रवादीने केला. मात्र आता आम्ही सतर्क झालो आहोत.
– **चंद्रशेखर बानवकुळे**, प्रदेशाध्यक्ष, भाजपा

### आपले कर्तृत्व काय आहे?



शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यासंदर्भात वादग्रस्त विधान करुन लक्ष आकर्षित करण्याची गरज जर भाजपाला पडत असेल तर त्यांनी हे थांबवायला हवे. त्यांच्यावर चिखलफेक करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की आपले कर्तृत्व काय आहे हे पाहावे. अशी विधाने आम्ही करत नाही तुम्ही करू नये.
– **संजय राऊत**, खासदार, शिवसेना

### हा त्यांचा फॉर्म्युला

भाजपाचे नेते एका बाजूला साधनसुचितेचा आणि खूप मोठ्या समंजसतेचा आव आणतात की, आपण राजकारणातील कटुता संपवली पाहिजे, द्वेष संपवला पाहिजे. भाजपाच्या प्रदेशाध्यक्षांनी जर शरद पवारांबद्दल असे वक्तव्य केले असेल तर भाजपाचा फॉर्म्युला असा आहे की, दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे. – **भास्कर जाधव**, नेते, राष्ट्रवादी

# सातारा जिल्हाधिकाऱ्यांना मागितला अहवाल

**दिल्ली (ए).** प्रतापगडाच्या पायथ्याला असलेल्या अफजलखान कबरीच्या परिसरात झालेल्या अतिक्रमाणावर अखेर सातारा जिल्हा प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली आहे. अफजलखान वध दिनी बुलडोझर फिरवत सर्व अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली होती. यानंतर याचिकाकर्त्याने न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणावर सुनावणी घेतली आहे. अफझलखानच्या थडग्याच्या आणि आजूबाजूच्या वास्तू पाडल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सातारा जिल्हाधिकारी, उप वनसंरक्षक यांच्याकडून अहवाल मागवला आहे.

# मला कठोर भूमिका नाही जमत



**स्मिता मांजरेकर । नवराष्ट्र : सध्या 'ठिपक्यांची रांगोळी' मालिकेमध्ये अनेक ट्विस्ट अँड टर्न पाहायला मिळत आहे. मालिकेत कानेटकरांचा वाडा विकला जाणार आहे. अशातच एका नव्या पात्राची एन्ट्री झाली आहे. प्रसिध्द अभिनेत्री शुभा खोटे यांची या मालिकेत एन्ट्री झाली आहे. दादा काकांच्या आत्याची भूमिका त्या साकारत आहेत. तेव्हा याच निमित्ताने 'नवराष्ट्र'च्या प्रतिनिधीने त्यांच्याशी खास बातचीत केली. या बातचीतमध्ये त्यांनी या मालिकेबद्दल आणि त्यांच्या करिअरविषयी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. त्याचाच हा सारांश**

## मालिकेत काम करण्याचा उत्साह

'ठिपक्यांची रांगोळी' या मालिकेबाबत शुभा खोटे सांगतात की, मला ही मालिका खूप आवडते. मी नेहमीच ही मालिका पाहायची. जेव्हा निर्मात्यांनी मला या मालिकेसाठी विचारलं तेव्हा मी फार विचार नाही केला. खरंतर जुहूपासून ठाण्याला यायचं म्हणजे मला रोजचा दीड तासाचा प्रवास करावा लागतो. पण मी फार विचार केला नाही की, मला त्रास होईल, मला जमेल की नाही? असे प्रश्न मनात आले नाहीत, इतकी मला ही मालिका आवडायची. त्यामुळे मला ही भूमिका ऑफर झाल्यावर मी लगेच होकार दिला. ही भूमिका फार कठोर नाही. मला कठोर भूमिका फार जमत नाही. मी नेहमीच प्रेमळ, सोज्वळ भूमिका केल्या आहेत. तसंच या मालिकेत कुकी गँगची धमाल-मस्ती सुरू असते. मीही त्यांच्यासह धमाल-मस्ती करायला उत्सुक आहे. सगळ्यांचे स्वभाव माझ्यासारखेच आहेत. त्यामुळे सेटवर सगळ्यांसह काम करताना मला मजा येत आहे.



## कामातूनच एनर्जी मिळते

या वयातही माझी एनर्जी फार असते. ते पाहून सगळ्यांना प्रश्न पडतो की, माझ्याकडे इतकी एनर्जी येते कुठून? पण यावर माझं एकच उत्तर आहे की, मला परफॉर्म करायला फार आवडतं. मालिका असो रंगभूमी असो किंवा चित्रपट असो या तीनही माध्यमात मला काम करताना एनर्जी मिळते. मेकअप केला की, मला नवा उत्साह मिळतो. आज मी ८५ वर्षांची आहे. पण मला अभिनयाची खूपच हौस आहे. तिथे मी कधीच थकत नाही.

## वयाच्या चौथ्या वर्षी कामाला सुरुवात

मी वयाच्या चौथ्या वर्षी गंमत म्हणून कामाला सुरुवात केली. माझे वडील ललित कला केंद्रामध्ये काम करायचे. त्यांचं एक नाटक होतं 'सत्येचं गुलाम'. माझे वडील त्यात अभिनय करायचे. त्यांच्यासह मी एक भूमिका त्यात केली. ती खरंतर माझी एक गंमत म्हणून सुरूवात झाली होती. पण नंतर माझं हे प्रोफेशनच झालं. मी कलाक्षेत्रात तीन-चार पिढ्यांसह काम केलं आहे. मला नवीन पिढीसह काम करतानाही आनंद होतो. आताची मुलं कार्यशाळेत भाग घेत आली आहेत. आमच्या काळात असं काही नव्हतं. आम्ही अनुभवातून शिकत गेलो. शाळेत असताना मी दिवाळीच्या सुट्टीत 'शुभमंगल' या चित्रपटात काम केलं होतं. एक महिना 'डे-नाईट' शिफ्ट होती. तो चित्रपट फारसा चालला नाही. त्यानंतर मी कॉलेज केलं. त्यानंतर मी व्यवसायिकदृष्ट्या 'सीमा' चित्रपटात काम केलं. 'सीमा' चित्रपटात माझा पहिला शॉट अभिनेत्री नूतनसह होता. पहिल्या दिवशीच नूतन यांच्यासह चांगली मैत्री झाली.

## माझं बालपण

माझ्या बाबांचं नाव नंदू खोटे. ते नाटकासह मूकचित्रपटातही काम करायचे. त्यांचा सगळ्यात आठवणीतला चित्रपट म्हणजे 'सरकारी पाहुणे'. तसंच मास्टर विनायक यांच्याकडे त्यांनी दोन-तीन चित्रपट केले. तर माझ्या आईचं नाव लीला खोटे. तिला चित्रकलेची आवड होती. शिवणकामाची आवड होती. आईच्या अनेक जुन्या आठवणी मी आजही कपाटात जपून ठेवल्या आहेत. मी बाबांची लाडकी होती. त्यांच्यासह मी सतत असायची. त्यांच्या नाटकाच्या तालमी मी खूप जवळून पाहिल्या आहेत. माझ्या आईला नाटक आवडायचं नाही. कारण नाटक म्हणजे 'फुल टाइम जॉब' नाही. त्यामुळे तिचा याला खूप विरोध होता. त्यामुळे मी बाबांसह नाटकाच्या तालमीला जातेयहे तिला आवडायचं नाही. पण मी नाटकात काम करायला लागले. तेव्हा घरी येऊन आईला सांगितलं. ती माझ्यावर फार चिडली. पण मी आईला सांगितली की, एक मुलगी आजारी पडली. त्यामुळे मी तो रोल केला आणि असं मी अनेक वेळा सांगितलं. तेव्हा तिला प्रश्न पडायचा की, दरवेळी तुझ्या वयाचीच मुलगी कशी आजारी पडते? मग तिला कळलं की, मी खूप लबाडी करत नाटकात काम करतेय आ णि









आमच्या कुटुंबाला कलेचा वारसा असला तरी आईचा माझा शिक्षणासाठी खूप कटाक्ष असायचा. माझ्या मुलांना इंग्लिश बोलता आलं पाहिजे असा तिचा अट्टहास असायचा. त्यासाठी मला आईने गिरगावात कॉन्व्हेन्ट शाळेत घातलं. मला शाळेत असताना सायकल चालवायची खूप आवड होती. माझ्या बाबांनी त्यासाठी मला खूप प्रोत्साहन दिलं. ते मला मरिनड्रायव्हला सकाळी सहा वाजता घेऊन जायचे. त्यानंतर मुंबई विभागातून मी सायकल स्पर्धेत भाग घेऊ लागले. त्यात मला अनेक बक्षिस मिळालं. 'सीमा' चित्रपटाच्या प्रीमियरच्या दिवशी माझी शेवटची सायकल स्पर्धा होती. त्यावेळी मी फक्त १८ वर्षांची होती. त्यानंतर मी स्वीमिंगमध्ये आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेऊन त्यात चॅम्पियनशिप मिळवली होती.



## 'सीमा' जवळचा चित्रपट

माझ्यासाठी माझ्या सगळ्याच भूमिका आवडीच्या आहेत. पण पहिला सिनेमा 'सीमा' हा माझ्या खूप जवळचा आहे. तसंच 'भरोसा', 'घराणा', 'ससूराल' या सिनेमामुळेदेखील मला एक वेगळी ओळख मिळाली.

## पुरस्कार नाही मिळाले

मी इतके वर्षे इंडस्ट्रीमध्ये काम करत आहे. पण मला अभिनेत्रीचा पुरस्कार नाही मिळाला. मला सिल्व्हर ज्युबली, गोल्डन ज्युबलीचे भरपूर ट्रॉफी मिळाले. पण मला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठी पुरस्कार नाही मिळाले याची खंत वाटते. मात्र आता या वयात जीवनगौरव पुरस्कार मिळतात.



## विजू खोटे यांच्याबद्दल

मी आधी फिल्म इंडस्ट्रीमध्ये आले. त्यानंतर माझा भाऊ विजू खोटे या इंडस्ट्रीमध्ये आला. तो माझ्यापेक्षा सव्वापाच वर्षांनी लहान होता. त्याला मी इंडस्ट्रीमध्ये आणलं नाही. तो स्वतः मेहनत करत आला. 'जबान सँभालके' या मालिकेत आम्ही एकत्र काम केलं होतं. तसंच अनेक चित्रपटातही काम केलं होतं. त्याचा स्वभाव फार गोड होता.

## स्पर्धेच्या जगात चपखल बसणारं 'श्याम की मम्मी'

'श्याम की मम्मी' या झी थिएटरवरील टेलीप्लेमध्ये अभिनेते मिलिंद फाटक मध्यवर्ती भूमिका साकारत आहेत. हे नाटक म्हणजे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेवरील तीक्ष्ण व विनोदी भाष्य आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये, बोर्डाच्या परिक्षांपूर्वी, पालकांच्या महत्त्वाकांक्षांचा प्रचंड दबाव मुलांवर येतो. त्यामुळे मुलं बालपणाच्या छोट्या आनंदांपासून वंचित राहतात. मिलिंद फाटक या टेलीप्लेबद्दल सांगतात, "हे नाटक सध्याच्या स्पर्धात्मक जगात चपखल बसणारं आहे. या जगात तरुणांवर कामगिरी करून दाखवण्यासाठी खूप दबाव टाकला जातो. कौटुंबिक चौकटींच्या आत व बाहेर मुलांना अतिअपेक्षा, समवयस्कांचा ताण या समस्या हाताळाव्या लागतात. प्रत्येकाने हे नाटक बघायला हवे, कारण, या सर्व बाबींवर नाटकाने खूपच आकलनक्षम भाष्य केलं आहे.



## लतादीदींच्या गाण्याचं रिमिक्स; नेटक-यांनी केली टीका

गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या गाण्यांना देशातीलच नाही तरी परदेशात देखील प्रेक्षकांची पसंती मिळते. लतादीदींच्या गाण्याचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतात. नुकताच एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये लतादीदींच्या 'दीदी तेरा देवर दिवाना' या गाण्याचं रिमिक्स व्हर्जन ऐकायला येत आहे. गायक आणि रॅपर ड्रेकने या गाण्याचं रिमिक्स केलं आहे. एका कॉन्सर्टमधील या रिमिक्स गाण्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. तर काही नेटकऱ्यांनी या गाण्याचं रिमिक्स करणाऱ्या ड्रेकला ट्रोल केलं आहे. एका युझरनं कमेंट केली की, 'मी रिमिक्स संगीताचा चाहता आहे. पण हे मला नाही आवडलं.'





## ...आणि माऊ बोलायला लागली; चाहते झाले खुष



'मुलगी झाली हो' मालिकेतील माऊ पहिल्यांदाच बोलणार आहे. आजवर प्रेक्षकांनी माऊचा आवाज ऐकलेला नाही. पण 'आता होऊ दे धिंगाणा'च्या मंचावर पहिल्यांदाच माऊचा आवाज ऐकायला मिळणार आहे. माऊची भूमिका साकारणाऱ्या दिव्या पुगांवकरसाठी हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. गेले दोन वर्ष दिव्या माऊची व्यक्तिरेखा साकारत आहे. माऊ कधी बोलणार? हा प्रश्न प्रेक्षक सतत विचारायचे. 'आता होऊ दे धिंगाणा'मुळे हा सुवर्णयोग जुळून आला आहे. ढोल ताश्यांच्या गजरात माऊची एण्ट्री होणार आहे. खरंतर या कार्यक्रमातच खूप सारी ऊर्जा सामावलेली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक सिद्धार्थ जाधव तर सळसळता उत्साह आहेत. या मंचामुळे माऊची बोलण्याची इच्छा पूर्ण होणार आहे अशी भावना दिव्याने व्यक्त केली. 'आता होऊ दे धिंगाणा'चा यावेळेचा एपिसोड 'आई कुठे काय करते' आणि 'मुलगी झाली हो' या मालिकेच्या टीममध्ये रंगणार आहे.

## बालदिनाच्या निमित्ताने 'छोटे हास्यवीरां'ची धमाल

महाराष्ट्राची हास्यजत्रा छोटे हास्यवीर

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या शोमधून प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन होतं. कधी प्रहसन, कधी मार्मिक विनोद तर कधी अंतर्मुख करणारे विनोदी स्कीट या मंचावर सादर करण्यात येतात आणि आता लवकरच 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमात वेगळेपण येणार आहे. अलिकडेच'महाराष्ट्राची हास्यजत्रा-छोटे हास्यवीर' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये १४ वर्षांखालील मुलांनी विनोदी सादरीकरणाचेव्हिडिओ पाठवून या स्पर्धेत भाग घेतला आणि त्यातल्या सर्वोत्तम स्पर्धकांना 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये परफॉर्म करण्याची संधी देण्यात आली. १४ नोव्हेंबर रोजी बालदिनानिमित्त हे छोटे 'हास्यवीर' आपल्याला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमात धमाल करताना दिसणार आहेत. आपल्या आवडत्या हास्यवीरांसोबत हे 'छोटे हास्यवीर' घरबसल्या प्रेक्षकांना बालदिनाची अनोखी ट्रीट देणार आहेत.



सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा 'उंचाई' चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित झाला. या चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. या सिनेमाला बॉक्सऑफिसवर चांगलं यश मिळावं यासाठी बिग बींनी मुंबईतील सिध्दीविनायकाला साकडं घातलं. लाडक्या बाप्पाचं दर्शन घेतल्यानंतर मंदिराच्यावतीने त्यांना बाप्पाची मूर्ती भेट म्हणून देण्यात आली. यावेळी बिग बींसह अभिषेक बच्चनदेखील उपस्थित होता.

## 'हेरा फेरी' मध्ये कार्तिक आर्यन



दिग्दर्शक प्रियदर्शन यांचा 'हेरा फेरी' चित्रपटानं प्रेक्षकांची मनं जिंकली होती. आजही हा चित्रपट अनेकजण आवर्जून बघतात. अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल या त्रिकुटाचा हा चित्रपट २००० मध्ये प्रदर्शित झाला होता. तर २००६ मध्ये 'हेरा फेरी २' प्रदर्शित झाला. या दोन्ही चित्रपटांनी प्रेक्षकांचे खूप मनोरंजन केलं होतं. आता प्रेक्षक तिसऱ्या भागाची वाट बघत आहेत. तिस-या भागात बॉलिवूडचा सध्याचा स्टार अभिनेता म्हणजे कार्तिक आर्यन दिसणार आहे. अभिनेते परेश रावल यांनी आपल्या ट्विटरवर ही माहिती दिली आहे. कार्तिकने अवघ्या काही वर्षात बॉलिवूडमध्ये आपलं नाव कमावलं आहे. 'भूल भुलैय्या २' नंतर कार्तिक 'फ्रेडी' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा टिझर लवकरच प्रदर्शित होणार आहे. तसंच सध्या तो 'सत्यप्रेम की कथा' या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे आणि आता 'हेरा फेरी ३'मध्येही कार्तिक आर्यन दिसणार असल्यामुळे त्याचे फॅन्स आनंदून गेले आहेत.

## आपले ASTRO

- **तिथी - संवत्सर**
- राष्ट्रीय मिती 21, शके 1944, विक्रम संवत्सर 2079, दक्षिणायन हेमंत ऋतू, कार्तिक कृष्ण पक्ष चतुर्थी 22:25
- **ता : 12-11- 2022, शनिवार**
- **सूर्योदय** - 6:32, **सूर्यास्त** - 5:40
- **सूर्योदयकालीन नक्षत्र** - मृगशिरा 7:32 नंतर आर्द्रा, योग - सिद्ध 22:01 नंतर साध्य, करण- बव 9:18, नंतर बालव 22:25 पश्चात कौलव
- **शुभ दिवस** – आजचा दिवस मध्यम आहे.
- **सण उत्सव**– संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री 8:43 वाजता
- **ग्रह गोचर** : सूर्य - तूळ, चंद्र - मिथुन, मंगळ - मिथुन, बुध- तूळ, गुरू -मीन, शुक्र- वृश्चिक, शनी - मकर, राहु - मेष, केतु - तूळ
- **राहुकाळ** : सकाळपासून दु. 1:21 पर्यंत
- **दिशा शूल** : पूर्व व ईशान्य
- **आराधना** : श्रीहनुमानाची पूजा व आराधना
- **उपासना** : शत्रूपीडा निवारण, शत्रूनाश, संकटमुक्ती, दुष्टांच्या भयनिवारण हेतू उपवास व उपासना
- **खरेदीसाठी शुभ वेळ** : आज प्रातः काळापासून रात्रीपर्यंत आर्द्रा नक्षत्र आहे जे खरेदीसाठी शुभ नाही.
- **शुभ अंक** - 8,7,4

### आजचे पंचांग




- **शुभ रंग** : राखाडी, काळा, कथ्था, गडद नीळा
- **शुभ रत्न** - नीलम
- **ग्रह पीडा हरण मंत्र** - शनी ग्रह
सूर्य पुत्रो दीर्घ देहो विशालाक्षो शिवप्रियः। मंदचारः प्रसन्नात्मा पीड़ां हरतु मे शनिः।।
- **चौघड़िया मुहूर्त**
- **दिन - काळ** - प्रातः 6:00, शुभ - 7:30, रोग - 9:00, उद्वेग -10:30, चंचल - दु.12:00, लाभ - 1:30, अमृत - 3:00, काळ - सायं 4:30
- **रात्री** - लाभ- सायं 6:00, उद्वेग - रात्री 7:30, शुभ - 9:00, अमृत -10:30, चंचल -12:00, रोग -1:30, काळ - 3:00, रोग - प्रातः 4:30
- **शुभ मुहूर्त** - शुभ, लाभ, अमृत, चंचल
- **अशुभ मुहूर्त** - रोग, काळ
- **मध्यम मुहूर्त** - उद्वेग

### व्यापार भविष्य

कार्तिक कृष्ण चतुर्थीला मृगशिरा नक्षत्राच्या प्रभावाने गुळ, खांड, चांदीच्या भावात तेजीचा कल राहील. पिवळ्या रंगाच्या वस्तूंमध्ये तेजी येईल. हळद, गुळ, सोने यांच्यात तेजी राहील. वायदा विचार - आज 2 वाजून 9 मिनिटांपासून 15 मिनिटे व्यापार करणे लाभदायी राहील. **भाग्यांक 2585**

### आज जन्मलेल्या बालकाचे भविष्य

आज जन्मलेले बालक सौभाग्यशाली, भाग्यवर्धक, सुंदर व शांतिप्रिय राहील. आर्थिक स्थिती ठीक राहील. जन्मस्थानाजवळ भाग्योदय होईल. वडिलांविषयी आस्था राहील. कौटुंबिक जीवन सुखी राहील.

### आज ज्यांचा जन्मदिवस आहे

वर्षाच्या प्रारंभी नोकरीत सामान्य स्थिती राहील. अधिनस्थ कर्मचा*यांचे सहकार्य मिळेल. वर्षाच्या मध्यात सामाजिक कार्यात संलग्नता राहील. व्यवसायात वाढ होईल. आर्थिक लाभ होईल. उतावीळपणाने घेतलेला निर्णय हानिकारक राहील. आर्थिक देवाणघेवाणीत सावधानता बाळगा. मित्रांच्या सहकार्याने उदासीनता दूर होईल.

मेष आणि वृश्चिक राशीच्या व्यक्तींना आर्थिक लाभाचा योग आहे. व्यवसायात वाढ होईल. कर्क राशीच्या व्यक्तींना नोकरीत सामान्य स्थिती राहील. सिंह राशीच्या व्यक्तींना सामाजिक कार्यात संलग्नता राहील. मिथुन व कन्या राशीच्या व्यक्तींना अधिनस्थ कर्मचा*यांचे सहकार्य मिळेल. मकर आणि कुंभ राशीच्या व्यक्तींना उतावीळपणे घेतलेला निर्णय हानिकारक ठरेल. धनु आणि मीन राशीच्या व्यक्तींना व्यक्तिमत्त्व विकास होईल. आर्थिक देवाणघेवाणीत सावधानता बाळगा.

### SUDOKU 6139

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | | | | | | 4 | |
| | | 5 | | 3 | | | 7 | |
| | | | | | 8 | | | 2 |
| | | | | | 1 | 9 | | |
| | 2 | | | | | | 8 | |
| | | 6 | 7 | | | | | |
| 1 | | | 4 | | | | | |
| | 9 | | | 2 | | 5 | | |
| | 8 | | | | | | | 1 |

प्रत्येक ओळीत 1 ते 9 अंक भरणे आवश्यक आहे. मात्र हे अंक क्रमवार असणे अनिवार्य नाही. उभ्या आणि आडव्या ओळींमध्ये 333 च्या वर्गात असावेत, अंकांची पुनरावृत्ती नको. आधीच्या अंकांच्या जागा बदलू शकत नाही. शून्य कोड्याचे एकच उत्तर आहे.

नवराष्ट्र SUDOKU

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 5 | 6 | 1 | 3 | 7 | 2 | 9 |
| 7 | 2 | 6 | 4 | 9 | 5 | 3 | 8 | 1 |
| 9 | 3 | 1 | 7 | 8 | 2 | 6 | 5 | 4 |
| 1 | 7 | 2 | 9 | 6 | 8 | 4 | 3 | 5 |
| 5 | 6 | 9 | 3 | 2 | 4 | 1 | 7 | 8 |
| 4 | 8 | 3 | 5 | 7 | 1 | 9 | 6 | 2 |
| 2 | 9 | 7 | 1 | 5 | 6 | 8 | 4 | 3 |
| 3 | 1 | 8 | 2 | 4 | 7 | 5 | 9 | 6 |
| 6 | 5 | 4 | 8 | 3 | 9 | 2 | 1 | 7 |

ज्योतिषाचार्य पं.नारायणशंकर नाथुराम व्यास-कोतवाली बाजार, जबलपूर

### आजचे राशीफळ

**मेष** : सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. मांगलिक यात्रेचा कार्यक्रम होईल. मित्रांशी वाद होईल. कामे पूर्ण होतील.

**वृषभ** : नवीन ऑफर मिळण्याची शक्यता आहे. भावनिक नात्यात जवळीक वाढेल. कौटुंबिक जीवनात सुख-शांती राहील. तुम्हाला सन्मान मिळेल.

**मिथुन** : कोर्टाच्या प्रयत्नात यश मिळेल. नवीन योजना तयार होतील. शरीर साथ देईल तेवढेच कष्ट करा.

**कर्क** : वृद्धांची काळजी घ्या. सत्ताधारी आणि उच्च अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मित्रांची मदत होईल. अपेक्षेपेक्षा जास्त नफा आनंद देईल.

**सिंह** : धाडसी प्रयत्नांनी शत्रूंवर विजय मिळेल. नोकरीत यश आणि कर्मचा*यांचे सहकार्य मिळेल. मेहनतीचा फायदा मिळेल.

**कन्या** : व्यवसायात विस्तार होण्याची शक्यता आहे. परोपकारात खर्च होईल. नियमिततेने काम करा. धैर्य प्रबळ राहील.

**तूळ** : विचारल्याशिवाय मत देऊ नका. अपमान होऊ शकतो. नवीन योजना हाती येण्याची शक्यता आहे. जमीन, इमारत, घर यासंबंधीचे वाद मिटतील.

**वृश्चिक** : उच्च शिक्षणाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. प्रवास सुखकर होईल. मित्रांची मदत होईल. राजकीय प्रभाव वाढेल.

**धनु** : वेळ मजेत जाईल. तुटक बोलणे टाळा. विचार करून गुंतवणूक करा. उदरनिर्वाहाच्या प्रयत्नात यश मिळेल. मुलांची कामे होतील.

**मकर** : संवाद सुरू ठेवा. नाती दृढ होतील. मित्रांच्या मदतीने काम सुरू करता येईल. जमीन आणि मालमत्ता मिळण्याची शक्यता आहे. शुभ कार्यात खर्च होईल.

**कुंभ** : भावनेने घेतलेले निर्णय बदलावे लागतील. अधिका*यांचे सहकार्य प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल. वाद टाळणे फायद्याचे ठरेल.

**मीन** : कायदेशीर बाबी तुमच्या बाजूने सोडवल्या जातील. नोकरीच्या संधींचा शोध पूर्ण होईल. शारीरिक दुर्बलतेमुळे त्रास होऊ शकतो.

### शब्दकोडे क्र. 1859



**उभे संकेत:**– 1) चाणाक्ष 2) दुःखाची गोष्ट 3) एखाद्याची बोलून मानहानी करणे 4) त्वरित, शीघ्र 5) क्षुल्लक किमतीचे 6) एक श्वासरोग 7) हातावर घड्याळ बांधण्याची जागा 10) समजण्यास कठीण गोष्ट 14) पहाटेची सुखावह थंडी 15) दूध साखर, रवा मिश्रीत गोड पातळसर पदार्थ 16) वागणूक 18) साखरेची चाचणी 20) अभिनेत्री अर्चना पुरणसिंगचा पहिला चित्रपट 21) जंगलात राहण्यास जाणे 25) मध्यस्थ, 26) पंधरवडा 28) वजन, ओझे.

**आडवे संकेत** :– 1) पाऊल न वाजविता जाणे 5) माज, उन्माद 8) एखाद्याचे विचार खोडून टाकणे 9) ....घोडे, एखादी गोष्ट घडून गेल्यावर त्यासंबंधीची सामग्री येऊन पोहोचणे 11) ... सोडणे म्हणजे त्याग करणे 12) मेघ 13) एका श्रीरामपुत्राचे नाव 14) गुरे राखणारा 17) एक टी.व्ही. चॅनल 18) झाडांची गळलेली पाने 19) ... करणे, एखादी गोष्ट फुगवून सांगणे 22) एक प्रसिद्ध, मुस्लिम संत 23) आमीर खानचा एक चित्रपट 24) अगदी लहानपणीच विधवा झालेली स्त्री 26) रिकामी पडलेली जागा 27) वाणी 28) अनिश्चित ज्ञान 29) अतिथींचा मानसन्मान

(उत्तर पुढील अंकी)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | द | र्श | | री | वा | ज | | ह | त्या |
| धा | र | | स | त | स | मा | ग | म | |
| र | वा | न | गी | | र | ख | र | खा | ट |
| | जा | | त | रू | | र्च | | स | र |
| झी | | श | | द्रा | क्ष | | क | | फ |
| | अ | व | ल | क्ष | ण | | स | फ | ल |
| | वि | | ता | | भ | डा | र | | |
| सु | ट | का | | | गु | | त | ल्ल | खा |
| र | | म | हा | भा | र | त | | | डा |
| | अ | ना | व | र | | प | र | ता | वा |

anumeya-8446302691

# बंडखोरीमुळे भाजपसह सर्वच त्रस्त

## काँग्रेसच्या ४६ उमेदवारांची यादी जाहीर

**अहमदाबाद, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** हिमाचल प्रदेशातील निवडणूक प्रचार संपल्यामुळे आता भाजपासह काँग्रेस, आप आणि इतर पक्षांचे ज्येष्ठ नेते व प्रचारक गुजरातमध्ये दाखल झाले आहे. निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतसे येथील राजकीय वातावरण तापत आहे. अशातच भाजपासह सर्वच पक्षांना बंडखोरीचे ग्रहण लागले असून पक्षांतरही झपाट्याने होत आहे. निवडणुकीच्या या रणधुमाळीत दररोज नाराजांची संख्या वाढत असून ते पक्षाला रामराम ठोकत असल्याचे चित्र आहे.




दरम्यान भाजपाने गुरुवारी 160 उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर शुक्रवारी काँग्रेसनेही 46 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यासह काँग्रेसने आतापर्यंत 89 उमेदवार रिंगणात उतरवले आहे. काँग्रेसन पहिल्या यादीत 43 उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. आतापर्यंत एकूण 89 जणांना विधानसभेचे तिकिट देण्यात आले आहे. दुसरीकडे आम आदमी पक्ष आणि भाजपानेही बहुतांश उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. काँग्रेसच्या दुसऱ्या यादीत जुनागढमधून भिखाभाई जोशी, सुरत पूर्वमधून अस्लम सायकलवाला, सूरत उत्तरमधून अशोक भाई पटेल, वलसाडमधून कमल कुमार पटेल आणि भुजमधून अर्जन भाई भुडिया यांच्या नावांचा समावेश आहे. गुजरातमध्ये दोन दशकांपासून सत्तेबाहेर असलेली काँग्रेस निवडणुकीत विजयासाठी घाम गाळत आहे. मात्र, आम आदमी पक्षही या निवडणुकीत उतरल्याने रंगत वाढली आहे.





### मतदारांनी मोफतच्या नादी लागू नये : वाघेला

गुजरातचे माजी मुख्यमंत्री शंकरसिंह वाघेला मोफत वीज आणि इतर घोषणांवर मत व्यक्त करताना म्हणाले, आज राजकीय पक्ष निवडणूक जाहीरनाम्यातून जनतेची फसवणूक करत आहेत. याबाबत निवडणूक आयोगाने पक्षांकडून हिशेब मागावा. पाच वर्षांत पक्षांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत, तर त्यांनी बाहेर पडावे, अशी आश्वासने पुन्हा देऊ नयेत, असे निर्देश द्यावे. ते पुढे म्हणाले, वास्तवात कोणतीही गोष्ट मोफत नसते. 300 युनिट मोफत वीज म्हणजे काय? कुणाच्या बापाची दिवाळी आहे का? हा तुमचा (सार्वजनिक) पैसा आहे. कोणताही पक्ष मोफतचे आश्वासन देत असेल तर त्या पक्षाने 200 कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा करून आश्वासन पाळावेत. तसेच मतदारांनी रेवडीच्या फंदात पडू नये, निवडणुकीतील आश्वासने पूर्ण करण्यासाठी कोणताही पक्ष निधी उभारत नाही, ते जनतेच्या पैशाच्या जोरावरच अशा घोषणा करतात.

### गांधीधाम, भुज, राजकोटमध्ये छापेमारी

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्राप्तिकर विभागही सक्रिय झाला आहे. निवडणुकीपूर्वी मोठे पाऊल उचलत आयकर विभागाने गांधीधाम, भुज आणि राजकोट येथे छापे टाकले. फायनान्स ब्रोकर, रिअल इस्टेटशी संबंधित लोकांच्या ठिकाणी हा छापा टाकण्यात आला. आयकर विभागाची ही कारवाई किती कर चुकवेगिरीशी संबंधित आहे, याचा खुलासा झालेला नसला, तरी राजकोट, भुज आणि या तिन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात आयकर विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी छापे टाकल्याचे सांगण्यात येत आहे.

### ७१.८८ कोटींची रोकड जप्त : आयोग

गुजरात आणि हिमाचल प्रदेशमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून रोख रक्कम, दारू आणि मोफत भेटवस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. हिमाचल प्रदेशमध्ये 2017 च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत अशा वस्तूंच्या वसुलीत पाच पटीने वाढ झाल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. माजी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखालील योजनेने जप्तीच्या प्रकरणात उत्साहवर्धक परिणाम दिसत आहेत. गुजरातमध्ये, निवडणुकीच्या घोषणेच्या काही दिवसांतच 71.88 कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली, जी 2017 च्या विधानसभा निवडणुकीतील आदर्श आचारसंहिता लागू होण्याच्या संपूर्ण कालावधीत करण्यात आलेल्या रकमेपेक्षा जास्त आहे. त्यावेळी 27.21 कोटी रुपये जप्त करण्यात आले होते. त्याचप्रमाणे हिमाचल प्रदेशमध्येही 50.28 कोटी रुपये जप्त करण्यात आले. 2017 ममध्ये 9.03 कोटी रुपयांच्या तुलनेत पाच पटीने जास्त आहे.

# २०० विद्यार्थ्यांना विषबाधा

## विद्यार्थिनी म्हणाली, जेवणात पाल आढळली, तक्रार केल्यानंतर जबरदस्तीने खाऊ घातले

**भागलपूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भागलपूरमध्ये एका शाळेत मध्यान्ह भोजनात तब्बल 200 विधार्थ्यांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या विद्यार्थ्यांनी जेवणात पाल आढळल्याची तक्रार केली होती. मात्र यानंतरही एका शिक्षकाने हे विषारी भोजन त्यांना खाऊ घातले. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले.

ही घटना नवगछिया विभागातील मदत्तपूर गावच्या माध्यमिक शाळेतील आहे. मदत्तपूर मध्य विद्यालयात गुरुवारी मिड डे मील घेतल्यानंतर सुमारे 200 विद्यार्थी आजारी पडले. या घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी शाळेत धाव घेतली. त्यानंतर सर्वांना नवगछिया मंडळातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे सर्वांवर उपचार करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर नवगछिया विभागीय रुग्णालयात एसडीओ, एसडीपीओ, बीडीओसह अनेक उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी धाव घेतली. विभागीय शिक्षणाधिकारी विजय कुमार झा यांनी सांगितले की, विद्यार्थी आजारी झाल्याची माहिती मिळाली होती. या प्रकरणाचा तपास केला जाईल. त्यानंतर जो कुणी दोषी आढळेल त्याच्यावर नियमांनुसार कारवाई केली जाईल.



### पाल नाही, वांग्याचे देठ होते : मुख्याध्यापक

यासंदर्भात शाळेच्या मुख्याध्यापकांना विचारणा करण्यात आली असता त्यांनी जेवणात पाल आढळली नसल्याचा दावा केला. तसेच जेवणात भात, डाळ, आलू, वांगी होती. जेवणात पाल आढळली नाही. ते वांग्याचे देठ होते, असेही त्यांनी सांगितले.

**ताटातील पाल काढून जेवण करण्यास केले बाध्य**

इयत्ता 6वीची विद्यार्थिनी शिवानी कुमारीने सांगितले की, गुरुवारी जेवनासाठी मध्यान्ह भोजन वाढण्यात आले. त्यावेळी आयुष नामक एका विद्यार्थ्याला ताटात पाल आढळली. त्याने त्याची तक्रार शिक्षकांकडे केली. विद्यार्थ्यांचा आरोप आहे की, शिक्षक चितरंजन यांनी ताटातील पाल काढून विद्यार्थ्यांनाच तेच जेवण करण्यास सांगितले. मुलीने सांगितले की, आरोपी शिक्षकाने मुलांना खायचे तर खा अन्यथा उपाशी राहा असे सांगितले. त्यानंतर जे विद्यार्थी जेवण करत नव्हते त्यांना त्यांनी मारहाण केली. त्यानंतर सर्वांची प्रकृती बिघडली.

## उत्तर प्रदेशात डेंग्यूचा कहर

**लखनौ, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उत्तर प्रदेशात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. जानेवारी 2022 पासून आतापर्यंत 11,183 रुग्ण आढळले आहेत. लखनौमध्ये सर्वाधिक 1,677 रुग्ण आहेत आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रयागराजमध्ये 1,543 रुग्ण आहेत. रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी आरोग्य विभागाने राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

## # QUICK NEWS

### आधार कार्ड दर १० वर्षांनी अपडेट करा

**दिल्ली, (ए).** आधार कार्ड हे प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा भाग बनले आहे. सरकारी कामानिमित्त असो, किंवा बँकेचे काम किंवा नोकरीच्या ठिकाणी अशा प्रत्येक ठिकाणी आधार कार्डची आवश्यकता लागतेच. याच आधार कार्डच्या संदर्भात आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. या नवीन निर्णयानुसार, प्रत्येक व्यक्तीला दर 10 वर्षांनी आपले आधार कार्ड अपडेट करावे लागणार असा सल्ला दिला आहे. परंतु, याबाबत सक्ती नसल्याचेही आधार प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. सरकारी कामकाजासाठी प्रामुख्याने आधार कार्डची गरज भासते.

### मेक्सिकोमध्ये गोळीबारात ९ ठार

**मेक्सिको, (ए).** मेक्सिकोत एका बारमध्ये झालेल्या गोळीबारात 9 जण ठार झाले आहेत. सेंट्रल मेक्सिकोधील ग्वानाजुटोमध्ये हा गोळीबार झाला असून यात दोघे जखमी झाले आहेत. गत काही दिवसांपासून गटांमधील हिंसाचारात वाढ झाली असल्याचे स्थानिक प्रशासनाने सांगितलं आहे. दोन गटातील वादातूनच हा गोळीबार झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. पोलिसांनुसार बुधवारी रात्री 9 वाजता एक गट हातात बंदुका घेऊन बारमध्ये घुसला होता. यावेळी त्यांनी बारमध्ये असणाऱ्यांवर अंदाधुंद गोळीबार सुरु केला. या गोळीबारात पाच पुरुष आणि चार महिला ठार झाल्या.

## तपास ● डिजिटल पुरावे मिटवण्यासाठी १०० कोटींची लाच : ईडीने केला दावा

# सिसोदियांसह ३४ व्हीआयपींनी बदलले १४० मोबाईल

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** दिल्ली सरकारच्या वादग्रस्त मद्य धोरणाबाबत ईडीने मोठा दावा केला आहे. ईडीने सांगितले की, दिल्लीचे उत्पादन शुल्क धोरण सार्वजनिक होण्यापूर्वीच काही मद्य उत्पादकांनी ते लीक केले होते. तसेच तपासात आढळून आले की, दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह सुमारे 34 व्हीआयपींनी डिजिटल पुरावे मिटवण्यासाठी सुमारे 140 मोबाईल फोन बदलले.

या प्रकरणात 100 कोटी रुपयांची लाच देण्यात आली होती, असा दावाही ईडीने केला आहे. दिल्ली दारू धोरणातील कथित घोटाळ्याप्रकरणी ईडीने 2 आरोपींना अटक केली होती. एजन्सीने अटक केलेल्या फ्रेंच मद्य कंपनी पेर्नोड रिकार्डचे दिल्लीचे प्रादेशिक प्रमुख बिनॉय बाबू आणि अरबिंदो फार्मा लिमिटेडचे संचालक पी सरथ चंद्र रेड्डी यांना पीएमएलए न्यायालयात हजर केले.

### २ महिन्यांपूर्वीच पॉलिसी लीक

ईडीने न्यायालयाला सांगितले की, हे धोरण गतवर्षी 31 मे रोजी काही मद्य निर्मात्यांना लीक केल्याचा पुरावा आहे. तसेच ते दोन महिन्यांनंतर 5 जुलै 2021 रोजी सार्वजनिक करण्यात आले. इतकेच नाही तर ईडीने असा दावा केला आहे की, बिनॉय बाबूने दिल्ली दारू घोटाळ्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती आणि मद्यविक्रेते समीर महेंद्रू आणि इतरांसोबत अनैतिक मार्गाने उत्पादक-घाऊक विक्रेते-किरकोळ विक्रेते यांचे संगनमत घडवून आणले होते. दिल्ली सरकार-अबकारी खात्याने लाचेच्या बदल्यात हे सर्व होऊ दिले.



### घोटाळा उघडकीस आल्यानंतर घडल्या घडामोडी

दिल्लीत किरकोळ दुकाने उघडण्यासाठी उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी लाच मागितल्याचे आणि स्वीकारल्याचे तपासात निष्पन्न झाले असल्याचा दावाही ईडीने केला आहे. ईडीने सांगितले की, अबकारी घोटाळ्यात सहभागी असलेल्या किंवा संशयित असलेल्या 34 व्हीआयपींनी डिजिटल पुरावे नष्ट करण्यासाठी एकूण 140 फोन बदलले. या लोकांमध्ये सर्व मुख्य आरोपी, दारू व्यापारी, वरिष्ठ सरकारी अधिकारी, दिल्ली उत्पादन शुल्क मंत्री आणि इतर संशयितांचा समावेश आहे. घोटाळा उघडकीस आल्यानंतर या लोकांनी आपले फोन बदलले आहे.

# लुधियानात दोन बड्या उद्योगपतींना अटक

## बँकेतील ८७ कोटींचे गैरव्यवहार प्रकरण

**लुधियाना, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** बँकेच्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी फरार असलेल्या लुधियानाच्या दोन उद्योगपतींना सीबीआयने कठुआ (जम्मू) येथून अटक केली आहे. दोघांनाही जम्मू न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांनाही 7 दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. लुधियाना शहरातील भारत बॉक्स फॅक्टरी लिमिटेड कंपनीचे दोन माजी संचालक प्रवीण अग्रवाल आणि अनिल कुमार अशी दोन्ही आरोपींची नावे आहेत. दोघांवर आरोप आहे की, त्यांनी लुधियानास्थित स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने 87.88 कोटींचा कर्ज घोटाळा केला आहे. तो आता व्याजासह सुमारे 121.13 कोटी झाला आहे.



सीबीआयच्या प्रवक्त्यानुसार स्टेट बँकेच्या शाखा व्यवस्थापकाच्या तक्रारीवरून 2020 मध्ये भारत पेपर्स मिलचे व्यवस्थापकीय संचालक, संचालक आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी कारवाई करत कंपनीचे तत्कालीन संचालक अनिल आणि प्रवीण अग्रवाल यांना अटक करण्यात आली आहे. कठुआ येथील लंगेट येथे 400 कनाल जमिनीवर भारत पेपर मिलची स्थापना करण्यात आली. हे युनिट 16 वर्षांपूर्वी मंदीमुळे बंद पडले होते. त्याची मशिनरीही विकली गेली आहे.

# चोरीच्या आरोपात तरुणाला बेदम मारहाण

**उज्जैन, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उज्जैनमध्ये एका तरुणाला साखळदंडाला बांधून लटकावलेल्या अवस्थेत मारहाण केल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. 23 सेकंदाच्या या व्हिडिओमध्ये 2 लोक त्याचे पाय, पोटरी, मांड्या आणि कमरेला काठीने निर्दयीपणे मारहाण करत आहेत. पीडित तरुण वारंवार त्याला सोडण्याची याचना करताना यात दिसतो. तो पुन्हा पुन्हा म्हणतो, मी तुझा मामा आहे, मला मारू नकोस, मी मरेन. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. ज्या युवकाला मारहाण झाली तो गाव सोडून पळून गेल्याचे सांगण्यात येत आहे.

हा व्हिडिओ उज्जैन जिल्ह्यातील इंगोरिया पोलिस स्टेशन हद्दीतील सिजावाता गावातील आहे. हा व्हिडिओ एक आठवडा जुना असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपी अर्जुन मोंगिया याने एका युवकावर शेतात पडलेली तलवार चोरल्याचा आरोप केला होता. त्यानंतर त्याने त्या तरुणाला बोअरिंग लिफ्टर मशिनच्या साखळीला बांधून लटकावले.



### मला मारू नको, मी मरेन

अर्जुन मोंगियाने आपल्या सहकाऱ्यांसह तरुणाला बोअरिंग लिफ्टर मशीनवर लटकावले. त्याचे हात-पाय बांधलेले होते. यानंतर त्याने त्याला काठीने बेदम मारहाण केली. मारहाण अशी जणू काही तालिबानी शिक्षा दिली जात आहे. व्हिडिओमध्ये तरूण वारंवार विनवणी करताना दिसतो की, मी तुझा मामा आहे, मला मारू नको, मी मरेन. यानंतरही अर्जुन त्याला सतत मारहाण करतो.

## आयुर्वेद विरोधी ड्रगमाफियांचे काम

**डेहराडून, (ए).** उत्तराखंड सरकारने पतंजली समूहातील दिव्या फार्मसीच्या पाच औषध उत्पादनावर बंदी घातली आहे. परंतु दिव्या फार्मसीकडून या वृत्ताचे खंडण करण्यात आले आहे. तसेच, यामागे आयुर्वेद विरोधी ड्रग माफियांचा हात असल्याचा उल्लेख पतंजलीकडून करण्यात आला आहे. उत्तराखंड सरकारने काही खोट्या माहिती आधारे दिव्या फार्मसीच्या पाच औषधांवर बंदी घातल्याचे सांगितले जात होते. मात्र, पतंजलीकडून सांगण्यात आले की, वृत्तपत्रांच्या बातम्यांचा हवाला देऊन उत्पादनांवर बंदी घातलेल्या आदेशाची प्रत अद्याप कंपनीला मिळालेली नाही. पण, यामागे 'आयुर्वेद विरोधी औषध माफियांचा' सहभाग असल्याचा आमचा संशय आहे. सरकारी विभागाने आपली चूक सुधारत दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. नुकसान भरपाई नाही दिल्यास, कायदेशीर कारवाईला तयार रहावे, असा इशाराही पतंजलीने दिला आहे.

## चेन्नईसह सात जिल्ह्यांत रेड अलर्ट

**चेन्नई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** ईशान्य मान्सून सक्रिय झाल्यामुळे तामिळनाडूमध्ये गेल्या आठवडाभरापासून पाऊस पडत आहे. हवामान खात्याने शुक्रवारी राजधानी चेन्नईसह 7 जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी केला आहे. विभागानुसार, चक्रीवादळविरोधी वातावरणामुळे हवामान बदल झाले आहे.

# सीएए भारतीयांना नागरिकत्व देते

## यूएनमध्ये भारताचे उत्तर

**जिनिव्हा, वृत्तसंस्था.** भारतातील नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि द्वेषयुक्त भाषणाचा मुद्दा संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेत (यूएनएचआरसी) उपस्थित करण्यात आला. यावर उत्तर देताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, सीएए हा शेजारच्या देशातील पीडित अल्पसंख्याकांना नागरिकत्व देणारा कायदा आहे. वास्तवात सीएएला विरोध करणाऱ्यांचे म्हणणे आहे की, यामुळे देशात राहणाऱ्या मुस्लिमांना लक्ष्य केले जाऊ शकते. दरम्यान सॉलिसिटर जनरल यांनी द्वेषयुक्त भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर उत्तर देताना सांगितले की, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला आहे.

जिनिव्हा येथे सुरू असलेल्या यूएनएचआरसी युनिव्हर्सल पीरियडिक रिव्ह्यूमध्ये अनेक सदस्य देशांनी भारतातील सीएएच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त केली होती. याबाबत तुषार मेहता म्हणाले, सीएए कायदा कायदा अगदी तसा आहे जो वेगवेगळ्या देशांतील नागरिकत्वाचे निकष ठरवतो. सीएए कायदा भारताच्या शेजारील देश अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील हिंदू, शीख, बौद्ध, पारशी, जैन आणि ख्रिश्चन धर्माच्या लोकांना धार्मिक छळाच्या आधारावर भारतीय नागरिकत्व मिळवण्यास मदत करतो. यामुळे कोणत्याही नागरिकाचे नागरिकत्व हिरावून घेतले जात नाही. तसेच कोणत्याही देशाच्या भारतीय नागरिकत्व देण्याच्या प्रक्रियेतही कोणताही होत नाही.



### अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मात्र काही निर्बंधही

मेहता पुढे म्हणाले, भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे पण त्यासंबंधी काही कायदे आहेत ज्यांचे पालन करणे गरजेचे आहे. भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता जोपर्यंत धोक्यात येत नाही तोपर्यंत स्वातंत्र्य आहे. योग्य निर्बंध लावल्याने द्वेषयुक्त भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे नियमन करण्यात मदत होते.










भारताचे माजी गृहमंत्री व दोन वेळा हंगामी पंतप्रधानपद भूषविलेले गुलजारीलाल नंदा यांना स्वतःच्या मालकीचे घर नसल्यामुळे म्हातारपणात भाड्याच्या घरात राहावे लागले. या भाड्याच्या घराचे भाडेसुद्धा ते देऊ न शकल्यामुळे त्यांना हे भाड्याचे घरसुद्धा सोडावे लागले होते. गुलजारीलाल नंदा हे सिद्धांतवादी नेते होते.

### मायदेशात स्वत:चे घर नाही

# मेहबूबा मुफ्ती राहणार विदेशात


**को** काही राजकीय पुढाऱ्यांवर अशी परिस्थिती येते की, त्यांना राहण्यासाठी स्वतःच्या मालकीचे घरसुद्धा नसते. त्यांची परिस्थिती अशी होते की, 'आबोदाना ढुंढते है, एक आशियाना ढुंढते है'. पदावर राहिल्यानंतर घर न बांधण्याचा परिणाम त्यांना भोगावे लागतात. भारताचे माजी गृहमंत्री व दोन वेळा हंगामी पंतप्रधानपद भूषविलेले गुलजारीलाल नंदा यांना स्वतःच्या मालकीचे घर नसल्यामुळे म्हातारपणात भाड्याच्या घरात राहावे लागले. या भाड्याच्या घराचे भाडेसुद्धा ते देऊ न शकल्यामुळे त्यांना हे भाड्याचे घरसुद्धा सोडावे लागले होते. गुलजारीलाल नंदा हे सिद्धांतवादी नेते होते. त्यांनी केंद्रीय गृहमंत्रीपदावरून दूर झाल्यानंतर समाचार आंदोलन चालविले होते. या आंदोलनाताला लोकांनी गांभीर्याने घेतले नाही आणि नंदा यांची खिल्ली उडविली होती. लोक गमतीने म्हणत होते की, सध्या 'लाच' देणे महागले आहे. जे अधिकारी एक नोट दिल्यानंतर खुश होत होते, ते आता चार नोटा मागू लागले आहेत. सध्या जम्मू काश्मीरच्या



माजी मुख्यमंत्री आणि पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांच्यावर सरकारी बंगला सोडण्याची वेळ आली आहे. श्रीनगर येथील गुपकार रोडवरील त्या राहात असलेल्या 8 खोल्यांचा 'फेयर व्ह्यू गेस्ट हाऊस' हा बंगला सोडावा लागणार आहे. हा बंगला मेहबूबांचे वडीत मुफ्ती मोहम्मद सईद यांना इ.स. 2005 मध्ये आवंटित करण्यात आला होता. मेहबूबा एप्रिल 2016 पासून जून 2018 पर्यंत या बंगल्यामध्ये राहात होत्या. पीडीपी-भाजप सरकार कोसळल्यानंतर मेहबूबांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला, परंतु त्यानंतरही त्यांना या बंगल्यात राहण्याची परवानगी देण्यात आली. या दरम्यान, मेहबूबांनी स्वतःसाठी नवीन बंगला खरेदी केला नाही. मेहबूबा आणि जम्मू-काश्मीर प्रशासनामध्ये या संदर्भात अजूनपर्यंत कोणतीही सहमती झालेली नाही. त्यांना तुळशीबाग विभागातील बंगला दाखविण्यात आला, परंतु हा बंगला चांगल्या स्थितीत नव्हता. आता मेहबूबांनी म्हटले आहे की, मी माझ्या विदेशात राहणाऱ्या बहिणीकडे राहण्यासाठी जाणार आहे. जर मेहबूबा विदेशात गेल्या तर काश्मीरचे राजकारण त्या कशा करणार? अशाच प्रकारची वेळ जे नेते केंद्रीय राजकारणात सक्रिय असतात, त्यांच्यावर सुद्धा येत असते. केंद्रीय सत्तेत असल्यानंतर जे नेते दिल्लीमध्ये स्वतःचे घर तयार करीत नाही, त्यांच्यावर सुद्धा पद गेल्यानंतर सरकारी बंगला सोडण्याची वेळ येत असते.

# लज्जास्पद पराभवाने भारताचे स्वप्न भंगले

### बॉलर पूर्णत: अपयशी



कोट्यवधी भारतीय क्रिकेट प्रेमींच्या अपेक्षा भंग झाल्या आहेत. वर्ल्डकप दुसऱ्या सेमी फायनलमध्ये इंग्लंडच्या टीमने भारताचा 10 गडी राखून पराभव केला. निश्चितपणे हा पराभव लज्जास्पद ठरला आहे. खेळात जय-पराजय असतोच पण तो या थाटाचा व्हावा हा भागच अतिशय शरमेचा ठरला आहे. लोकांना वाटत होते की भारत व पाकिस्तान हे दोन्ही संघ फायनल मध्ये आमने सामने राहतील. पण इंग्लंडच्या सलामीला आलेल्या दोन फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांना असे धुतले की विचारता सोय नाही असेच काहीसे म्हणावे लागेल. भारतीय कप्तान रोहित शर्मा यांनी गोलंदाजांच्या खराब प्रदर्शनाला दोष दिला. दारुण पराभवाला गोलंदाज जबाबदार असल्याचे ते म्हणाले. मोहम्मद शफी, भुवनेश्वर कुमार, रविचंद्रन अश्विन व हार्दिक पंड्या इंग्लंडच्या एकही खेळाडूला बॅड करू शकले नाहीत. 20 ओव्हरमध्ये एकही खेळाडू आऊट न होणे हा विक्रमच भारतीय गोलंदाजांनी आपल्या नावे नोंदविला. एवढेच नव्हे तर त्यांनी प्रति ओव्हर भरमसाठ धावा दिल्यात. गोलंदाजांचे बधिरपण भारताला भोवले. कर्णधार रोहित म्हणाला, नॉकआऊटमध्ये दाखल झाल्यानंतर तेव्हा दबावाला सांभाळणे कठीण ठरते. प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक तयारीवर ते अवलंबून आहे. तुम्ही कुणाला दबावापासून मुक्त असावे असे सांगू शकता पण तो मुक्त राहिलच याची खात्री देऊ शकत नाही. भारताचा 169 स्कोअर फार चांगला नसला तरी त्याला फार खराबही म्हणू शकत नाही. तो 8 रान प्रति हिशेबवर होता. गोलंदाज नेम साधून गोलंदाजी करू शकले असते. तर एवढी दुर्गती होण्याचे कारणच नव्हते. इंग्लंडचे गोलंदाज 20 ओव्हरपर्यंत संयमाने खेळले हे विशेष. ते शेवटपर्यंत नॉट आउट राहिले हे विशेष. इंग्लंडचे कर्णधार जोस बटलर याने प्रारंभी आपले सहकारी एलेक्स हेल्स यांच्याकडे जास्तीत-जास्त बल्लेबाजी सोपविली. हेल्सने भारतीय गोलंदाजांना असे धुतले की, 47 ओव्हरमध्ये त्याने तब्बल 86 धावा काढल्या. टी - 20 मॅचमध्ये त्यांचे हे 12 वे अर्धशतक होते. बटलरने 49 चेंडूत 80 रन काढले. इंग्लंडच्या या सलामी जोडी पुढे भारताच्या स्पिनर्स व तेज गोलंदाजांनी नांगीच टाकली. एलेक्सचा स्ट्राईक रेट 163. 27 राहिला. भारतीय संघाच्या फलंदाजांनी आपली हतबलता आधीच दर्शविली. सूर्यकुमार सारखा फलंदाज ग्रहण लागल्या सामान खेळला. विराट कोहली मात्र जमून राहिला. त्याने सिक्सर मारून 50 धावा पूर्ण केल्यात. हार्दिक पंड्या सोडला तर कुणीच फलंदाज टिकला नाही. विराटने आपल्या 4000 धावा पूर्ण केल्या. रोहित शर्मा याने 27 तर राहुलने 5 धावा काढल्या. बुमराह टीममध्ये नसणे हे सुद्धा दुर्दव्य म्हणावे लागेल. चहल याला सुद्धा संधी मिळाली नाही.

## सदा सर्वकाळ विठ्ठल चिंतन

एक वेळा पंढरी, वाचे जो उच्चारी। मोक्ष त्याचे घरी नांदतसे ॥
सदा सर्वकाळ विठ्ठल चिंतन । करिती कीर्तन दिवसराती ॥
ते माझे सोयरे, सज्जन सांगाती । जे आरविती विठोबासी ॥
चोखा म्हणे, ते परलोकीचे सखे ।
गाती नाम, मुखे विठोबाचे ॥

आस्था

चोखोबांनी या अभंगात आदर्श वारकऱ्यांचे शब्दचित्र रेखाटले आहे. स्वतःला काय आवडतं व काय काय प्रिय वाटते याबद्दल ते काही विवरण करताहेत, त्यातूनच आदर्श वारकऱ्यांचे हे शब्दचित्र साकार होत आहे, त्याची लक्षणे आणि वैशिष्ट्ये कोणती? तो पंढरीचा नामोच्चार करतो, म्हणजेच तो पंढरीचा महिमा गातो. तो विठ्ठलाचं चिंतन निराकार करीत असतो. तो रात्रंदिवस कथा-कीर्तनात मग्न असतो. हरिभक्तिपरायण लोक त्याचे सखेसोबती असतात आणि हेच पांडुरंगाचे अनन्यभक्त म्हणजे माझे 'परलोकीचे सखे' आहेत, असेही चोखोबा म्हणतात.

## पावसाचे थैमान



**चेन्नई.** गेल्या काही दिवसांपासून तमिळनाडूसह चेन्नईत पावसाने थैमान घातले आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून रस्त्यावरुन मार्ग काढताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

**तानाजी-नेताजी** अराऊंड द वर्ल्ड ...

### निवडणूक सोडा, भारत जोडा

# संसदेत नाही तर रस्त्यावर बोला!




**तानाजी म्हणाला,** नेताजी मोदी सरकार संसदेमध्ये विरोधी पक्षांच्या खासदारांना बोलू देत नाही. विरोधी खासदार संसदेमध्ये जेव्हा बेकारी, महागाई, अग्निपथ किंवा चीनच्या घुसखोरीच्या मुद्यांवर बोलण्यासाठी उभे राहतात, तेव्हा त्यांच्यासमोरील माईक बंद करण्यात येतो, यावर तुमची काय प्रतिक्रिया आहे? नेताजी म्हणाले, तानाजी आवाज बुलंद असेल तर माईकची काय आवश्यकता आहे? वाघ जेव्हा डरकाळी फोडतो आणि हत्ती जेव्हा चिंतकारतो तेव्हा त्यांना माईकची आवश्यकता थोडीच असते. आवाजातच मोठी ताकद असते. तुम्ही रेडिओवर 'आवाज की दुनिया के दोस्तो' ही अनाउसमेंट ऐकलीच असेल. नूरजहाँने 'आवाज दे कहाँ है, दुनिया मेरी जवाँ है' हे गीत ऐकलेच असेल. 'नाम गुम जाएगा, चेहरा ये बदल जाएगा, मेरी आवाजही पहचान है गर याद रखना' हे गाणेसुद्धा ऐकले असेलच. संसद आणि विधानसभेत आवाजी मतदानाने कितीतरी विधेयके पारित केली जातात. एकतेचे आवाहन करताना 'आवाज दो हम एक है' असा नारा दिला जातो. तानाजी म्हणाला, नेताजी तुम्ही जरा मुद्यावर बोला. राहुल गांधी म्हणतात, विरोधी पक्षाचा आवाज दडपून टाकल्या जातो. मोदी नेहमीच एकतर्फी 'मन की बात' सांगतात. विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलण्यापासून रोखले जाते. नेताजी म्हणाले, तानाजी खरं म्हणजे तक्रार करणे हे कमजोरीचे लक्षण आहे. तुम्ही जरा विचार करा, महात्मा गांधी कधीच संसदेत गेले नव्हते. परंतु त्यांचा आवाज संपूर्ण देशातील लोक ऐकत होते. सुभाषचंद्र बोस यांनी 'जय हिंद'चा नारा दिला होता. तो नारा अमर झाला. देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरून भाषण देतात आणि भाषण संपल्यानंतर शेवटी 'जय हिंद'चा नारा देतात. मोदी 'मन की बात' सांगतात तर राहुल गांधींनीही 'जन की बात' सांगितली पाहिजे. संसदेत शक्य होत नसेल तर देशातील रस्त्यांवर देऊन सांगावी. राहुल गांधींना गुजरात आणि हिमाचल प्रदेशच्या निवडणुकांमध्ये बोलण्याची संधी होती. परंतु त्यांनी तेथे न जाता 'भारत जोडो' यात्रा काढली. ते या 'भारत जोडो' यात्रेमध्येच आपला दम दाखवीत आहेत. राहुल गांधींनी असेही म्हटले आहे की, विरोधी पक्षांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी मोदी सरकार चौकशी संस्थांचा वापर करीत आहेत. तानाजी म्हणाला, नेताजी खरं सांगायचं म्हणजे चौकशी संस्था ह्या अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्याचा 'जिन्न' आहे. ज्यांच्या हाती हा जादूचा दिवा लागला, त्यांना 'जिन्न' विचारतो की, 'क्या हुक्म है मेरे आका? किसकी करू जांच और कहाँ मारू छापा?'

# भारत-इस्त्रायल संबंधांना मिळणार नवी ऊर्जा

इस्त्रायल आणि भारताचे संबंध नेहमीच व्यापक राहिलेले आहेत. विशेषतः बेंजामिन नेतान्याहू यांच्या काळात त्यात बरीच सुधारणा झालेली दिसून आली. आता हेच नेतान्याहू पुन्हा एकदा इस्त्रायलचे पंतप्रधान झाल्याने भारत-इस्त्रायल संबंधांना नवी ऊर्जा मिळणार आहे.आजमितीला भारत स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात खूप सक्रिय आहे आणि इस्त्रायलकडे यासंदर्भात उच्च प्रतीचे तंत्रज्ञान आहे. या क्षेत्रात दोन्ही देश एकत्र येण्याची शक्यता अधिक आहे. रशिया युक्रेन युद्धाचा विचार केल्यास इस्त्रायल आणि भारत हे उभय देश युद्ध थांबविण्यासाठी आणि चर्चा करण्याच्या बाजूने आहेत. इस्त्रायलचे पंतप्रधान म्हणून बेंजामिन नेतान्याहू यांचे पुनरागमन ही जागतिक पातळीवरची महत्त्वाची घडामोड आहे. इस्त्रायलच्या इतिहासात सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहणारे तसेच 15 महिने विरोधकाच्या बाकावर असलेले नेतान्याहू पुन्हा पंतप्रधान झाले आहेत. जून 2021 मध्ये नेतान्याहू यांना लिपिड यांच्याकडून पराभव पत्करावा लागला व पद सोडावे लागले. त्यावेळी इस्त्रायलमध्ये नवीन पर्व सुरू झाल्याचे काहींनी म्हटले. मात्र, नेतान्याहू यांनी आपण पुन्हा येऊ, अशी भविष्यवाणी केली. आता ती खरी ठरली आहे. नेतान्याह हे एलिट कमांडो फोर्समध्ये होते. त्यांनी अनेक विशेष मोहिमांत सहभागदेखील घेतला आहे. एवढेच नाही तर त्यांचे मोठे बंधूदेखील कमांडो होते. भारताशी चांगले संबंध असावेत, असे इस्त्रायलच्या शासनकर्त्यांना नेहमीच वाटले आहे. इस्त्रायलच्या नागरिकांतदेखील भारताबाबत चांगली भावना आहे. भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही देशाचे पाठबळ असणे हे इस्त्रायलसाठी खूप महत्त्वाचे ठरते. दोन्ही देशांत अनेक क्षेत्रांत परस्पर सहकार्य आहे. मग से तंत्रज्ञान असो, सैन्याभ्यास असो किंवा कृषी क्षेत्र असो. आजच्या काळात मध्य-पूर्व भागात इस्त्रायल ही एक मोठी शक्ती म्हणून ओळखली जाते.

# भूकंपाचा इशारा देणारी सक्षम यंत्रणा हवी

नेपाळ, चीन आणि भारताला भूकंपाचे धक्के बसले आहेत. यापासून बचावाची सक्षम यंत्रणा उभी करण्यासाठी सर्व देशांना एका व्यासपीठावर येणे गरजेचे आहे. 8 नोव्हेंबर रोजी रात्री नेपाळ, चीन आणि भारताला बसलेले भूकंपाचे धक्के ही सामान्य नैसर्गिक घटना नाही. त्याचे केंद्र नेपाळमधील मणिपूर होते. भूगोलाच्या हिशेबाने "इंडियन टॅक्टोनेट' हे पूर्वेपासून ते पश्चिमेपर्यंत पसरला आहे. त्यात आपला पूर्वोत्तर भाग, हिंदुकुश, अफगाणिस्तान, पाकिस्तानच्या काही भागाचा समावेश आहे. या ठिकाणी इंडियन प्लेट हे आपल्यापेक्षा वजनाने अधिक असलेल्या युरोशियन प्लेटच्या आत जात आहे. म्हणून हिमालय वर उचलला जात असून संपूर्ण भागच भूकंपाच्या दृष्टीने संवेदनशील होत आहे. आता झालेल्या या भूकंपाची तीव्रता 6.3 इतकी रिश्टर स्केलवर नोंदली गेली आहे. परंतु पूर्वीच्या काळी यापेक्षाही अधिक शक्तिशाली मॅग्निट्यूडचे हादरे बसलेले आहेत. नेपाळमधील वर्ष 1934 चा विनाशकारी भूकंप हा ज्वलंत उदाहरण म्हणून सांगता येईल. हिमालयाच्या परिसरात भूकंप होणे ही आश्चर्यकारक बाब नसली तरी या नैसर्गिक घटनेकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. या ठिकाणची स्थिती पाहिल्यास भविष्यात 8 रिश्टर स्केलपेक्षा अधिक तीव्रतेचा भूकंप होण्याची शक्यता

भूकंपामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी "प्री डिझास्टर मॅनेजमेंट' आवश्यक आहे. आइसलॅंडसारख्या देशात लहान मोठे धक्क्यांचे आकलन केले जाते. त्यामुळे ते आपत्तीचा चांगला सामना करतात. आपण अशा प्रकारचे तंत्र विकसित करू शकत नाही, मात्र बचावाच्या उपायाबाबत गंभीर राहत नुकसानीचे प्रमाण कमी करू शकतो.



वर्तविली जात आहे. साहजिकच तेवढ्या तीव्रतेचा भूकंप झाल्यास नेपाळ किंवा सीमा भागात तसेच दिल्ली, उत्तर भारतातील राज्यात हाहाःकार उडू शकतो. ऑगस्ट 1988 मध्ये बिहारमध्ये झालेला भूकंप आपण अजूनही विसरलेलो नाही.सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे भूकंपाचा अंदाज वर्तविला जात नाही. तसेच किरकोळ धक्क्याच्या आधारे मोठ्या भूकंपाची शंका देखील व्यक्त करता येऊ शकत नाही. अर्थात, काही तंत्रज्ञानाच्या पातळीवर आणि व्यावहारिक उपाय करता येऊ शकतात. उदाहरणार्थ, भूकंपाचा इशारा देणारी चांगली यंत्रणा. वास्तविक भूकंपात दोन प्रकारच्या वेव्ह येतात. एक "पी' आणि दुसरी "एस'. दोन्हीत वेळेचे अंतर असते. "पी' वेव्ह ही फार नुकसान करत नाही, मात्र "एस' वेव्ह ही तुलनेने अधिक धोकादायक असते. दोन टेक्टोनिक प्लेट्स एकमेकाला धडकतात, तेव्हा "पी' वेव्ह तयार होते. उदाहरणार्थ, भूकंपाचे केंद्र नेपाळ असेल तर पी वेव्हला दिल्लीपर्यंत पोचण्यासाठी काही सेकंद लागतील. त्यानंतर "एस' वेव्ह तयार होईल. ती याच वेगाने दिल्लीला पोचेल. आपण "पी वेव्ह'ला केंद्रावर मोजले आणि त्याची तत्काळ माहिती दिल्लीला दिली तर "एस वेव्ह'च्या हल्ल्यापासून वाचण्यासाठी एक मिनिटापेक्षा कमी वेळ असेल. भूकंप हे माणसाचे जीव घेत नाहीत. भूकंपामुळे पडझड झाल्याने जीवितहानी होते. त्यामुळे घरे आणि इमारती बांधताना त्यात आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केल्यास भूकंपाच्या मोठ्या तीव्रतेचा धक्का देखील सहन करता येईल. परंतु आपल्या देशात "बिल्डिंग कोड' असतानाही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. साहजिकच कायदा लागू करणाऱ्या संस्थांची जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे.

## जगातलं सर्वात सुरक्षित ठिकाण

जर तुम्ही गुगलवर जाऊन जगातलं सर्वात मजबूत आणि सुरक्षित ठिकाण कोणतं? असे सर्च कराल तर तुम्हाला उत्तर मिळेल की, फोर्ट नॉक्स. ही अमेरिकेची ती तिजोरी आहे, ज्यात सगळं सोनं ठेवण्यात आलं आहे. इथे साधारण 50 हजार टन सोनं ठेवण्यात आले आहे. हे जगभरातील सोन्याचे 2.5 टक्के सोनं आहे. या सोन्याची किंमत 12, 60000 कोटी रूपये इतकी सांगितली जाते. त्यामुळे अर्थातच इथे सुरक्षा अशी आहे की, इथे पक्षीही घुसू शकत नाही. या कारणानेच या ठिकाणाला पृथ्वीवरील सर्वात सुरक्षित तिजोरी म्हटले जाते. 1936 मध्ये तयार करण्यात आलेली ही बिल्डींग कोणत्याही प्रकारचे हल्ला परतवून लावण्यासाठी सक्षम आहे.

अधिक रोचक बातम्यांसाठी दिलेला QR कोड स्कॅन करा

**Trending NEWS**



"राष्ट्रवादी काँग्रेसने आता सत्तेत येण्याचे स्वप्न बघणे सोडले पाहिजे. बेईमानीतून सत्ता बनवण्याचा प्रयत्न अडीच वर्षांपूर्वी त्यांनी केला होता. उद्धव ठाकरेंवर एकप्रकारे जादूटोणा करण्यात आला होता. त्यात उद्धव ठाकरे फसले आणि विचार न करता राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर गेले. हा जादूटोणा राष्ट्रवादी काँग्रेसने केला होता. मात्र आता आम्ही सतर्क झालो आहे. 2024 मध्ये देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आमचे 200 पेक्षा जास्त आमदार निवडून येतील, त्यामुळे राष्ट्रवादीने सत्तेत येण्याचा विचार आता करू नये."
– **चंद्रशेखर बावनकुळे**, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष



"अंधश्रद्धा व जादूटोणाविरोधी कायदा ज्यांच्यामुळे संमत झाला त्या डॉ.नरेंद्र दाभोलकरांच्या साताऱ्यात भाजपा प्रदेशाध्यक्षांची जादूटोण्याची भाषा पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारी आणि महाराष्ट्राचा व या कायद्याचा अवमान करणारी आहे. शिवाय जादूटोणाविरोधी कायद्यालाच हे आव्हान आहे. आता याबाबत राज्य सरकार काय करतं याकडं सर्वांचं लक्ष लागलंय! राज्यातले प्रकल्प गुजरातला नेऊन प्रगतीच्या बाबतीत महाराष्ट्राला मागं आणण्याचा प्रयत्न तर भाजपकडून सातत्याने होतच आहे, पण विचारांच्या बाबतीतही महाराष्ट्राला मागं आणण्याचा त्यांचा डाव स्पष्ट दिसतोय."
– **रोहित पवार**, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार



"सगळ्याच बाबींवर मी देवेंद्र फडणवीसांना प्रश्न विचारतेय की गृहमंत्रालय नावाची गोष्ट अस्तित्वात आहे का? त्यांची अडचण अशी होतेय की त्यांच्यावर कामाचा ताण फार आहे. मला देवेंद्र फडणवीसांची काळजी वाटतेय. शेवटी बहीण आहे मी त्यांची. सहा जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद, गृहमंत्रीपद, एवढी सगळी खाती, उपमुख्यमंत्रीपदमाणसानं किती बिचाऱ्यानं काम करायचं. त्यांनी थोडा ताण कमी केला पाहिजे. गृहमंत्रीपद त्यांना झेपत नाहीये हे लक्षात येतंय. त्यांनी ते दुसऱ्या कुणाकडेतरी सोपवलं पाहिजे."
– **सुषमा अंधारे**, ठाकरे गटाच्या उपनेत्या

**#Viral #फीवर**

"छत्रपती शिवाजी महाराजांची तलवार परत भारतात आणण्याच्या सरकारच्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो. पण महाराष्ट्राबाहेर उद्योग गेल्याने हजारो युवकांचे रोजगार गेले आहेत. हा विषय बाजुला ठेवून केवळ भावनेशी खेळून सरकार राजकारण करत असल्याचं राज्यातील युवकांना कळत आहे."
– **विजय वडेट्टीवार**, महाविकासआघाडीचे नेते

# 'या' देशात मृतांचा वार्षिक दिन साजरा करण्याची अजब परंपरा

**अजब-गजब**

फ्लोरिडामध्ये अलिकडेच मृतांचा वार्षिक दिन अनोख्या प्रकारे साजरा करण्यात आला. येथे एक मेक्सिकन हॉलिडे असून या दिवशी मिक्टलान (मृतांची प्राचीन एझटेक भूमी) आणि जगामधील प्रवेशद्वार खुले होते असे मानले जाते. या दिवशी एका विशेष काळासाठी स्वतःच्या गमावून बसलेल्या प्रियजनांसोबत नाचगाणे करता



यावे म्हणून हा सण साजरा करण्यात येतो. लोक स्वतःच्या पूर्वजांसोबत जीवनाचा आनंद व्यक्त करतात अशी मान्यता आहे. डे ऑफ द डेड हा पूर्वजांची मनधरणी करण्याच्या प्राचीन एझटेक प्रथेला ऑल सोल्स डेसोबत जोडले जाते. स्पॅनिशांनी 1500 च्या दशकाच्या प्रारंभी ही प्रथा मेक्सिकोत आणली होती. या प्रथेला मानणाऱ्या लोकांनी फ्लोरिडाच्या फोर्ट लॉडरडेलमध्ये मृत उत्सवात भाग घेतला आहे. या दिवशी लोक स्वतःच्या मृत कुटुंबीयांच्या जीवनाचा आनंद व्यक्त करतात आणि त्यांच्या आत्म्याची भेट घेण्याची इच्छा बाळगतात. हा उत्सव प्रामुख्याने 1 आणि 2 नोव्हेंबर रोजी मेक्सिकोत साजरा केला जातो. हा एक प्रकारे कुटुंबाच्या पुनर्मिलनाप्रमाणे आहे. मृत पूर्वज एक अतिथीच्या स्वरुपात येत असल्याचे मानले जाते. उत्सवात भाग घेणारे लोक रंगबिरंगी पेहराव परिधान करतात आणि अनोख्या प्रकारचा मेकअप करतात. अनेक लोक स्वतःच्या कुटुंबासह उत्सवात सामील होतात आणि त्यांना अजब पद्धतीने पेहराव करायला लावतात. काही लोकांचे पेहराव हे समोरच्या व्यक्तीला घाबरविणारे असतात.

# थंडीत हृदयासंबंधी धोका वाढतो

थंडी पडायला सुरुवात झाली आहे. सर्दी, खोकला, ताप येणे या गोष्टी सामान्यच आहेत. मात्र आणखी काही गंभीर आजार हिवाळ्यात लगेच होऊ शकतात. थंडीत हृदयाचे विकार होण्याची शक्यता जास्त असते. अशावेळी हृदयाची काळजी घेण्याची जास्त गरज आहे.

**SCIENCE FACTS**

ताणतणाव, बदललेली जीवनशैली यामुळे आजकाल अगदी तरुणयातही हार्टअटॅकचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. युरोपियन जर्नल ऑफ एपिडेमियोलॉजीच्या संशोधनानुसार, ज्यांचे वजन जास्त असते किंवा जे स्थुलमुळे त्रस्त आहेत त्यांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता जास्त असते. याशिवाय उच्चरक्तदाब असलेल्या व्यक्तींनीही थंडीत जास्त काळजी घ्यावी. थंडीत हार्टअटॅक येण्याचे प्रमाण 30 पटींनी वाढते. थंडीत नसा आखुडल्या जातात. यामुळे रक्तदाब वाढतो. उच्चरक्तदाब हार्टअटॅक येण्याचे मूळ कारण असू शकते. शरीरात रक्त साठून राहते, रक्तनलिकांमधून नीट पुरवठा होत नाही. सकाळी तापमान खूपच कमी असते. बाहेरच्या तापमानाशी जुळवून घेण्यात शरीराला काहीसा वेळ लागतो. शरीराचे तापमान योग्य राखण्यासाठी रक्तदाब वाढतो आणि हेच हार्टअटॅकचे कारण बनते. पहाटे-पहाटे बाहेर फिरायला जाणे शक्यतो टाळावे. 9 नंतर बाहेर गेल्यास थंडी थोडी कमी झालेली असते. जेवणात कमीत कमी मीठ खावे. शरीरासाठी व्हिटॅमिन डी गरजेचे आहे यासाठी कमी मीठ खा. तसेच व्यायाम नियमित करावा.



## स्वत: बनवलेल्या विमानातून जगप्रवास


स्वत: हेलिकॉप्टर किंवा विमान बनवणारी काही माणसं या जगाच्या पाठीवर आहेत. मात्र, हे प्रयोग नेहमीच यशस्वी होतात असे नाही. विशेषत: अशा विमानांना उड्डाणासाठी परवानगीही मिळणे कठीण असते. मात्र, स्वत: विमान बनवून त्याच्या उड्डाणाची परवानगी घेऊन जगप्रवास करणारी एक व्यक्तीही या जगात आहे. ही व्यक्ती भारतीयच आहे हे विशेष! अशोक थमारक्षण या मूळच्या केरळ राज्यातील अलापुज्जा येथील व्यक्तीने गरजेपोटी कुणाला खरा वाटणार नाही इतका भन्नाट प्रकार केला आहे. मेकॅनिकल इंजिनिअर असलेल्या या व्यक्तीला आपल्या कुटुंबाला अमेरिकेत फिरण्यासाठी घेऊन जायचे होते; पण अनेक कारणांनी त्याला ते शक्य नव्हते. नंतर कोरोना काळात तर आंतरराष्ट्रीय प्रवास बरेच महिने बंदच होता. मग पठ्ठ्याने काय करावे? तर थेट 4 सीटर विमान तयार करून टाकले. सध्या अशोक हे लंडनमध्ये नोकरीला आहेत. तिथून अमेरिकेला जाण्याचे त्यांना शक्य होत नव्हते. त्यातही त्यांना एयरक्राफ्ट तयार करायची आधीच हौस असल्याने आता निमित्त सापडले होते. त्यांनी काम सुरू केले. दक्षिण आफ्रिकेतून सामान मागवून घेतले. जवळपास 18 महिने हे काम सुरू होते. ब्रिटनच्या उड्डयन विभागाचे सर्व तयारीकडे पूर्ण लक्ष या काळात होते.

**माईंड ब्लो**

## असूस झेनबुक 17

**LAUNCH पॅड**

आता मोबाईल प्रमाणेच फोल्डेबल लॅपटॉप देखील लॉंच झाला आहे. पारंपरिक लॅपटॉपपासून एक पाऊल पुढे जात असूसने भारतात फोल्डेबल लॅपटॉप लॉंच केला आहे. Asus Zenbook 17 असे या फोल्डेबल लॅपटॉपचे नाव आहे. लॅपटॉपमध्ये 17.3 इंचची फोल्डेबल ओएलईडी डिस्प्ले मिळते जे मोठे टॅबलेट किंवा कॉम्पॅक्ट मॉनिटरसारखे वापरता येते. फोल्ड असताना युजरला 12.5 इंचची स्क्रिन मिळते, तर उरलेली



जागा ऑनस्क्रिन किबोर्डसाठी वापरता येते. सुरळीत फोल्ड होण्यासाठी स्क्रिनमध्ये दोन हिंजेस देण्यात आले आहेत. लॅपटॉपमध्ये कनेक्टिव्हिटीसाठी वायफाय 6 ई, दमदार आवाजासाठी डोल्बी स्पिकर्स आणि 12 व्या पिढीचा इन्टेल कोअर आय 7 प्रोसेसर देण्यात आला आहे. दुमडलेले नसताना डिस्प्ले 4:3 अस्पेक्ट रेशिओसह 2560x1920 पिक्सेल रेझोल्युशन देते, तर फोल्ड केल्यावर डिस्प्ले 3:2 अस्पेक्ट रेशिओसह 1920x1280 पिक्सेल रेझोल्युशन देत असल्याचे असूसचे म्हणणे आहे.

**STORY कथा**

## बोकड आणि खाटीक



एका गावातल्या सगळ्या बोकडांनी सभा भरवून खाटकाच्या हाती न सापडण्याची तजवीज कशी करावी याविषयी विचार केला. आपल्या मालकाचा डोळा चुकवून सर्वांनी पळून जावे, ही युक्ती सर्वानुमते ठरली व ती त्याच दिवशी अमलात आणावी असे ठरले. ते ऐकून त्यातला एक म्हातारा शहाणा बोकड त्यांना म्हणाला, 'अरे, तुम्ही हे लक्षात ठेवा की, आपण जरी पळून गेलो, तरी बोकडाच्या मांसाशिवाय लोक राहतील ही गोष्ट शक्य नाही. शिवाय खाटीक लोक आपल्या कामात तरबेज असल्याने आपला जीव घेताना ते आम्हाला फार वेळ धडपडत ठेवत नाहीत, पण आपण एकदा येथून निघून रानावनातून हिंडू लागलो म्हणजे भलत्याच अडाणी लोकांच्या हाती सापडू व ते आपले हालहाल करून आपल्याला मारतील.' हे ऐकताच बोकडांनी आपला पहिला ठराव रद्द केला व ते आपापल्या घरी गेले.

**तात्पर्य :** कोठेही जाऊन दुःख टाळता येणे जर शक्य नसेल तर निदान जेथे कमी दुःख होईल. अशी जागा निवडणे जास्त शहाणपणाचे होय.

मालक, मुद्रक, प्रकाशक व एडिटर-इन-चीफ विनोद आर. माहेश्वरी यांनी नवभारत प्रेस लि. प्लॉट नं. १३, सेक्टर-८, सानपाडा (पूर्व), नवी मुंबई- ४०० ७०५,येथे मुद्रित करून १८९-ए, आनंद कॉम्पलेक्स, एस.जी. मार्ग, चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई- ४०० ०११ येथून प्रकाशित केले.
एडिटर इन चीफ- विनोद माहेश्वरी, प्रबंध संपादक - निमिष माहेश्वरी.
फोन : ०२२-४९६४२३०९
सानपाडा प्रेस फोन : २७७५६११७, २७७५६११९
वर्ष ०८, अंक ३२९ RNI NO . MAHMAR/२०१४/५९८६२

## ऑक्टोबर महिन्याचा अहवाल अंतिम नसल्याने हा आकडा वाढण्याची शक्यता

# अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान

**शेवगाव, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** नगर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जून ते सप्टेंबर या कालावधीत तब्बल १ लाख ३६ हजार ६७७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. तर ऑक्टोबरच्या प्राथमिक अहवालानुसार त्यात १ लाख ९१ हजार १२६ हेक्टर क्षेत्राची भर पडणार आहे. त्यानुसार आतापर्यंत १००९ गावातील तब्बल ३ लाख १७ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे ऑक्टोबर महिन्याचा अहवाल अंतिम नसल्याने हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबरपर्यंत निधी मागणी २९१ कोटींवर पोहोचली आहे. ऑक्टोबरच्या अंतिम अहवालानंतर एकूण मागणी आकडा ५०० कोटींच्याही पुढे जाईल.

जिल्ह्यात सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत १४९.५ टक्के पाऊस झाल्याची नोंद झाली आहे. यंदा अतिवृष्टी झाली असून, महसूल विभागाने २३ ऑक्टोबरअखेर ७४५.७ मिमी पाऊस नोंदवला आहे. अतिवृष्टीमुळे खरिपाच्या मका, सोयाबिन, उडीद, कांदा, फुलपीके, तूर, कापूस, बाजरीसह भाजीपाला पिकाचे मोठे नुकसान झाले. ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर कृषी अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी कार्यालयांमार्फत जूनपासून पंचनामे करण्यात आले. ऑक्टोबर महिन्याच्या प्राथमिक अहवालात १ लाख ९१ हजार १२६ हेक्टर नुकसानीचा प्राथमिक अहवाल तयार केला. परंतु, ऑक्टोबर महिन्यातील पंचनाम्यांना उशिर झाला आहे.



### पंचनामा अहवालासाठी शुक्रवारपर्यंत अल्टिमेटम

"जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले, जून ते सप्टेंबरपर्यंतचा अहवाल अंतिम झाला असून ऑक्टोबर अहवालाचे काम प्रगतीपथावर आहे. केवळ चार ते पाच तालुके बाकी आहेत. परंतु, शुक्रवारपर्यंत (११ नोव्हेंबर) अहवाल अंतिम होण्याची अपेक्षा आहे."

**रविंद्र माने,** उपसंचालक, कृषी विभाग.

### २९१ कोटींपैकी ४.२५ कोटी निधी प्राप्त

कृषी विभागाने नोंदवलेल्या अहवलात महिनानिहाय झालेल्या नुकसानीसह अपेक्षीत निधी मागणी मागणीही नोंदवली आहे. त्यानुसार जून ते सप्टेंबर या कालावधीत झालेल्या नुकसानीपोटी तब्बल २९१ कोटी २५ लाखांची मांगणी नोंदवली. शासनाकडून जून ते ऑगस्ट या कालावधीत झालेल्या झालेल्या नुकसानीपोटी ४ कोटी २५ लाख ९२ हजारांचा निधी प्राप्त झाला आहे. ऑक्टोबरचा अंतिम अहवाल आल्यानंतर पुन्हा सुमारे २५० कोटी निधीची गरज भासणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात नुकसानी पोटी मदतीचा आकडा ५०० कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

### पेरण्या लांबणीवर

शेतात अजुनही पाणी तसेच दलदलीची स्थिती असल्याने जिल्ह्यात खोळंबल्या रब्बी हंमागाच्या पेरण्या जिल्ह्यात २३ ऑक्टोबरपर्यंत पाऊस सुरूच होता. पाऊस थांबून पंधरा दिवस उलटले तरी शेतजमिनीत अजुनही पाणी तसेच दलदलीची स्थिती आहे. निचरा होणाऱ्या जमिनीत वाफसा होऊन पेरणी सुरू झाली, परंतु, काळ्या कसदार व पक्क्या जमिनीत अजूनही पेरणीपूर्व मशागतीला गती आलेली नाही. त्यामुळे रब्बीच्या पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत.



## थेट जनतेतून सरपंचांची निवड होणार

# फुलंब्रीत ग्रामपंचायत निवडणुकांचे बिगुल

**फुलंब्री, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा बिगूल वाजला आहे. ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची आता रणधुमाळी वाढणार आहे. सरपंचपदाची निवडणूक जनतेतून होणार आहे. गावपातळीवर राजकीयदृष्ट्या प्रतिष्ठेचे पद मिळविण्यासाठी अनेकांकडून मोर्चेबांधणी केली जाणार आहे.

युती सरकारच्या काळात जनतेतून सरपंच निवडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. २०१७ च्या ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पद जनतेतून निवडण्यात आले. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर मविआ सरकार अस्तित्वात आले. महाविकास आघाडी सरकारने जनतेतून सरपंच निवडण्याचा निर्णय रद्द करून सदस्यातून सरपंचपद निवडले. आता पुन्हा शिंदे फडणवीस सरकार आल्याने त्यांनी जनतेतून थेट सरपंच निवडण्याचा निर्णय घेतला आहे.



1 सरपंच पदासाठी अनेकांकडून मोर्चेबांधणी

2 मविआच्या रद्द निर्णयाचे झाले पुनरुजीवन

### राजकीय पक्षांची प्रतिष्ठा पणाला

फुलंब्री तालुक्यात अठरा डिसेंबर रोजी घेण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत १८ गावांचे सरपंच हे थेट जनतेतून निवडले जाणार आहेत. जनतेतून सरपंच निवडीची प्रक्रिया सुरू झाल्याने या १८ गावात भावी सरपंच पायाला भिंगरी बांधून घरोघर फिरू लागले आहेत. घरोघरी जाऊन मी सरपंच पदाचा उमेदवार असून मला यावेळेस संधी द्यावी, अशी विनवणी मतदारांसमोर करताना दिसत आहेत.

# QUICK NEWS

### छोट्या सर्वेशचे स्वप्न साकारले

**नांदेड :** भारत जोडो यात्रेदरम्यान नांदेडच्या वाटेवर असताना राहुल गांधी यांना दोन मुलांनी सॉफ्टवेयर इंजीनियर व्हायचे बोलून दाखवले.



पण आपण आजपर्यंत संगणक पाहिला नाही व आपल्या शाळेतही नसल्याचे सांगितले. शाळेत संगणकच नाही तर या मुलाचे स्वप्न कसे पूर्ण होणार हे जाणून राहुल गांधींच्या उपस्थितीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या मुलाला संगणक भेट दिला. हिंदुस्थानमधील प्रत्येक मुलाचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न आहे. देशातल्या प्रत्येक मुलाने राजीव गांधी यांचे आधुनिक तंत्रज्ञानाचे स्वप्न पूर्ण करावे. लाखो मुले कोरोना काळात संगणक नसल्याने ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहिले. 'भारत जोडो' यात्रा अशा स्वप्नांना मुर्त रुप देण्याचे काम करत आहे.

# गोगाबाबा टेकडीवरील आढळले दुर्मीळ गिधाड

**औरंगाबाद, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** पक्षी सप्ताहानिमित्त निसर्ग मित्रमंडळ व महाराष्ट्र पक्षी मित्र संघटनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, गोगाबाबा टेकडीच्या परिसरातील माळरानावरील पक्षी निरीक्षणात दुर्मिळ इजिप्शियन गिधाड आढळून आला, अशी माहिती मंडळाचे सचिव किशोर गठडी यांनी दिली.

कार्यक्रमात किशोर गठडी यांनी पक्षी सप्ताहाबद्दल माहिती दिली. पक्षी निरीक्षण, पक्ष्यांची ओळख व त्यांच्या नोंदी कशा घ्याव्या, याची माहिती दिली. याचबरोबर पक्षी अभ्यासक किरण परदेशी यांनी ई-बर्ड या पक्ष्यांविषयी काम करणाऱ्या अँप विषयी माहिती व प्रशिक्षण दिले.

दुर्बिणीचा वापर करून पक्षी निरीक्षण करण्यात आले. पक्षी निरीक्षणादरम्यान किरण परदेशी यांना अचानक दुर्मिळ इजिप्सियन गिधाड पक्षी माळरानावर आकाशात घिरट्या घालताना आढळला. या गिधाडाला इजिप्शियन व्हल्चर म्हणतात.

हा निओफ्रॉन जातकुळीतील एकमेव दुर्मिळ गिधाड आहे. ते दक्षिण यूरोप, आफ्रिका आणि आशियात आढळते. याच आकार घारीएवढा असतो. पूर्ण वाढ झालेल्या नर गिधाडांची लांबी ४७-५२ सेंमी तर मादींची लांबी ५२-५५.५ सेंमी असते. पंखांची लांबी शरीराच्या लांबीच्या २.७ पट असते.

सगळे शरीर मळकट पांढऱ्या रंगाचे असते; डोके पिवळे असून त्यावर पिसे नसतात; चोच पिवळी; उडण्याच्या कामी उपयोगी पडणारी पिसे काळी असतात; शेपटी पाचरीसारखी; पंख लांब व टोकदार असतात. नर व मादी दिसायला सारखीच असतात. हे पक्षी एकएकटे किंवा जोडप्याने राहतात. पक्षी निरिक्षणात राखी ,तितर, होला, भारद्वाज, रातवा, पकोळी, रंगीत करकोचा अशा १६ पक्षांची नोंद करण्यात आली.



1 नर गिधाडांची लांबी ४७-५२ सेंमी तर मादींची लांबी ५२-५५.५ सेंमी

2 राखी ,तितर, होला, भारद्वाज, रातवा, पकोळी, रंगीत करकोचा अशा १६ पक्षांची नोंद

3 निओफ्रॉन जातकुळीतील एकमेव गिधाड यूरोप, आफ्रिका, आशियात आढळते

## जमीनदोस्त • किल्ले प्रतापगड परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त

# अखेर कबरीजवळील बांधकाम हटविले

**पाचगणी, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** साताऱ्यातील किल्ले प्रतापगड (ता महाबळेश्वर) येथील अफजलखान कबरीजवळील अनधिकृत बांधकाम पोलीस बंदोबस्तात हटविण्यास गुरुवारी पहाटेपासून सुरवात करण्यात आली. शिंदे – फडणवीस सरकारने मागील अनेक वर्षांपासून वादात असलेल्या प्रतापगडावरील अफजलखानाच्या कबरी भोवतीची अतिक्रमणे हटवण्याचे काम पहाटेपासून सुरू करण्याचा मोठा निर्णय घेतला..

१० नोव्हेंबर १६५९ या तारखेप्रमाणे आजच्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याला अफजल खानाचा वध केला होता. आज या ऐतिहासिक घटनेला ३६३ वर्षे पूर्ण होत असतानाच शासनाच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासनाने आज प्रतापगडाच्या पायथ्याशी असणारी अफजलखान याच्या कबर परिसरातील अनधिकृत बांधकाम जमीन दोस्त करण्यास सुरवात केली आहे.

यासाठी सातारा, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, रायगड ग्रामीण या चार जिल्ह्यातील अठराशेहुन अधिक पोलीस बंदोबस्त वाई येथील पोलीस उपविभागीय कार्यालयात बुधवारी रात्रीपासून दाखल झाला होता. पहाटे सर्व यंत्रणा प्रतापगडावर दाखल झाली. तेथील अनधिकृत बांधकाम साडेसहा सात पासून हटविण्यास सुरवात झाली.

प्रतापगड, महाबळेश्वर, वाई, कराड, सातारा येथेही मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या परिसरात जमाव बंदीचे १४४ कलम लागू करण्यात आले आहे. साताऱ्याचे जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, पोलीस अधीक्षक समीर शेख, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, पोलीस उपअधीक्षक डॉ शीतल जानवे खराडे, महाबळेश्वरच्या तहसीलदार सुषमा पाटील चौधरी आदी वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. माध्यम प्रतिनिधींनाही परीसरात जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

अफजल खानाच्या कबरी शेजारील उदात्तीकरण करण्यासाठी वनविभागाच्या हद्दीत अनेक खोल्यांचे अनधिकृत बांधकामकरण्यात आले आहे. ते पाडून टाकण्याची मागणी हिंदुत्ववादी संघटनांनी केली होती. उच्च न्यायालयानेही २०१७ मध्ये हे बांधकाम पाडण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे सातारा प्रशासनाने हे बांधकाम हटवण्याची कारवाई आज पहाटेपासून सुरु केली आहे. सातारा जिल्ह्यातील प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या अफजल खानाच्या कबरी शेजारी अलीकडच्या काही वर्षात उदात्तीकरण करण्यात येत होते. तेथे उरूस ही भरविण्यास सुरवात झाली होती. तेथील उदात्तीकरण रोखण्याची मागणी करण्यात आली होती.. आज पहाटे तारखेप्रमाणे आलेल्या शिवप्रतापदिनीच राज्य सरकारकडून यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. प्रतापगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या अफझलखान कबरीलगतचे अतिक्रमण हटविण्याचे काम सुरू झाले आहे. प्रशासनाच्या वतीने कबरीशेजारील अनधिकृत बांधकाम हटवण्यात आले. मागील अनेक वर्षापासून अफजल खान कबरी लगतचा अनधिकृत बांधकामाचा वाद सुरू होता. आज राज्य सरकारने यावर कारवाईची बडगा उचलला आहे. मागील अनेक वर्षे सातारा प्रशासन व वनविभागाकडे या बांधकामाचा कब्जा आहे. जेसीबी, पोकलेन अफजलखान कबरी लगतच्या परिसरात आज भल्या पहाटे दाखल झाले होते.



"नितीन शिंदे म्हणाले की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री शंभूराज देसाई हे कडवट हिंदूत्ववादी व शिवभक्त असल्यामुळेच अफजल खानाच्या बेकायदेशीर दर्ग्यावर बुलडोझर फिरवण्यात आला. शिवप्रताप भूमी मुक्तीआंदोलनाची शिवप्रताप दिनापूर्वी अफजल खान थडग्या भोवतीच्या अनधिकृत बांधकाम तोडण्याची मागणी आज पूर्ण केली."

**- नितीन शिंदे,** माजी आमदार, सांगली.

"अफजल खानाच्या कबरीच्या मूळ ढाच्याला हात न लावता परिसरात झालेले अतिक्रमणे काढण्यात येत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हे अतिक्रमण हटविले जात आहे. मूळ ढाच्याला हात लावला जाणार नाही. आतमध्ये असणारी कबर व त्याचा ढाचा यांना कोठेही हात लावला नाही. हा नियमित कामकाजाचा भाग असून, अनेक दिवसांपासून हे काम सुरू होते. आज त्याला अंतिम स्वरूप आले आहे. नियमित कामकाजाचा भाग आहे. जे अनधिकृत आहे ते अनधिकृत आहे. ते काढले."

**- शंभूराज देसाई,** पालकमंत्री, सातारा

"प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाच्या बेकायदेशीर थडग्याचे अतिक्रमण झाले होते. त्यामुळे इतिहासाची विटंबना झाली होती. छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास काळवंडण्याचे काम मुस्लिम अतिरेक्यांनी केले होते. परंतु, महाराष्ट्र शासनाने ते अतिक्रमण उद्धवस्त करण्याचे काम केले. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शासनाचे अभिनंदन करतो."

**- मिलिंद एकबोटे**

"अतिक्रमण काढण्याच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेची काळजी घेतली आहे. लोकांनी या कारवाईचे समर्थन केले आहे. काहींवर प्रतिबंध कारवाई केली आहे. परिस्थिती निवळेपर्यंत बंदोबस्त ठेवला जाईल. आम्ही दक्ष आहोत."

**- समीर शेख,** पोलीस अधीक्षक, सातारा.

# बालविवाहाविरोधात 'ती' यात्रेत

## 'लेक लाडकी'चा जनसामान्यांना सामाजिक संदेश

**पार्डी, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** 'मी लहान असताना आणि मला खूप शिकायची इच्छा असताना, माझ्या मामांनी माझा विवाह निश्चित केला. अनेकदा विनवण्या करूनही माझे कोणी ऐकले नाही. तेव्हा मी धाडसाने आणि 'लेक लाडकी' संस्थेच्या मदतीने लग्न रोखले. पण माझ्या जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण प्रचंड आहे. राज्यात आणि देशातही तीच स्थिती आहे. याच विषयावर मला राहुलजींशी बोलायचे आहे,' असे सतरा वर्षाची युवती सारिका पाखरे (मानूर, जिल्हा बीड ) सांगत होती, पदयात्रेत ती चालत होती.

सामाजिक ज्वलंत प्रश्न प्राधान्याने हाताळून समाजात जनजागृती करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्था 'भारत जोडो' यात्रेत जोडल्या गेल्या आहेत. साताऱ्यातील 'लेक लाडकी' संस्था ही त्यापैकीच एक. 'आमचा भाग दुष्काळी, त्यामुळे ऊसतोड कामगार जास्त. उसतोडीला जात असताना सोबत मुलींना घेऊन न जाता त्यांचे कोवळ्या वयात लग्ने करून आईबाप रिकामे होतात,' ती व्याकुळ होऊन व्यथा मांडत होती.

माझ्याप्रमाणेच माझ्या दोन मैत्रिणींचे बालविवाहही मी रोखले आहेत. पण हे कायमस्वरूपी रोखून सामाजिक परिवर्तन घडवायचे असेल तर ग्रामीण भागात छोटे छोटे उद्योग उभारले जाणे गरजेचे आहे. त्यातून रोजगार वाढेल आणि आमच्या कुटुंबांचे स्थलांतर थांबेल. स्थलांतर थांबले की मुलींना घरी सुरक्षितपणे वावरता येईल, शिकता येईल, मग बाल विवाह सहजपणे रोखता येतील. ही माझीच नव्हे महाराष्ट्रातील माझ्यासारख्या हजारो लेकींची व्यथा आहे. ती राहुलजींना मी सांगणार आहे'असे सारिका म्हणाली.

शुक्रवारी सकाळी सातच्या सुमारास नांदेडजवळील दाभाड येथून यात्रा सुरू झाली. तेव्हा संस्थेच्या प्रमुख वर्षा देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली दहा सदस्य सारिकासोबत यात्रेत चालत होते.




# कृषिपंपांना दिवसा अखंडित वीज

**मुंबई,** राज्यातील गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमधील गावातील शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या पंपांचा दिवसा वीजपुरवठा खंडित होणार नाही, अशी घोषणा राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. रात्री शेतात कामासाठी गेल्यास मनुष्य आणि वन्य प्राण्यांच्या संघर्षाच्या घटना टाळण्यासाठी गडचिरोलीमध्ये सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेत कृषी जलपंपांना अखंड वीजपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे.

## खासगी डॉक्टराच्या विरोधात तक्रार

# बाळाला पाजला मुदतबाह्य डोस

**बीड, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** माजलगावमध्ये दीड महिन्याच्या बाळाला एका खासगी डॉक्टराने मुदतबाह्य डोस पाजल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आरोग्य विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे. माजलगाव शहरातील पवार हॉस्पिटलमध्ये दीड महिन्याच्या बाळाला आजी आजोबा डोस देण्यासाठी घेऊन गेले होते. डोस दिल्यानंतर त्याच्यावरील तारीख ही मुदत संपलेली असल्याने मुदतबाह्य डोस दिल्याने डॉ. शरद पवार यांच्याविरोधात आरोग्य विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे.


**NCDEX**
Pragati ka Solid Exchange

**National Commodity & Derivatives Exchange Limited**
CIN : U51909MH2003PLC140116
Regd Office : Akruti Corporate Park, 1st Floor, L.B.S. Road, Near G.E.Garden, Kanjurmarg West, Mumbai, Maharashtra 400078

**Ph:** 022-66406789 | **Email:** askus@ncdex.com | **Website:** www.ncdex.com

**Extract of Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Half Year ended September 30, 2022**

(Amount Rs. in Lakhs)

| Sl. No. | Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended 30.09.2022 | Quarter ended 30.09.2021 | Half year ended 30.09.2022 | Quarter ended 30.09.2022 | Quarter ended 30.09.2021 | Half year ended 30.09.2022 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1. | Total Income from operations | 1,356 | 3,041 | 2,596 | 2,894 | 4,672 | 6,226 |
| 2. | Net profit/ (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#) | (1,189) | 518 | (2,609) | (1,557) | 210 | (2,550) |
| 3. | Net profit/ (Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | (1,676) | 518 | (3,096) | (2,044) | 210 | (3,037) |
| 4. | Net profit/ (Loss) for the period after Tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | (1,327) | 409 | (2,370) | (1,621) | 191 | (2,191) |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)] | (1,388) | 330 | (2,454) | (1,679) | 86 | (2,268) |
| 6. | Equity Share Capital | 5,068 | 5,068 | 5,068 | 5,068 | 5,068 | 5,068 |
| 7. | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet of the previous year | - | - | - | - | - | - |
| 8. | Earnings Per Share (FV ₹ 10 each) (for continuing and discontinued operations)- 1. Basic (₹): Not annualised 2. Diluted (₹): Not annualised | (2.62) (2.62) | 0.81 0.81 | (4.68) (4.68) | (3.09) (3.09) | 0.39 0.39 | (4.15) (4.15) |

**Notes:**
1 The above is an extract of the detailed format of Standalone and Consolidated Financial Results vide Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Standalone and Consolidated Financials are available on our website www.ncdex.com
2 The above Standalone and Consolidated Financial Results have been reviewed by the Audit Committee in its meeting held on November 10, 2022 and approved by the Board of Directors in their meeting held on November 11, 2022.
3 # During the quarter and half year ended September 30, 2022, the Exchange had written off the recoverable from Shareholders, towards IPO and Capital restructuring related expenses, amounting to Rs. 424 lakhs along with GST recoverable thereon of Rs. 63 lakhs and debited it to the Statement of Profit & Loss account shown as exceptional item.

**For and on behalf of the Board of Directors**
**sd/-**
Arun Raste
Managing Director & Chief Executive Officer
DIN - 08561128

Place: Mumbai
Date: November 11, 2022


# विश्वासामुळे पदयात्रेला मिळतोय प्रतिसाद

## 'भारत जोडो'वरुन कॉंग्रेस नेते कन्हैय्याकुमारांनी भाजपवर डागली तोफ

**नांदेड, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** विविधतेत एकता ही या देशाची ओळख असताना ही ओळख पुसण्याचे काम मागील काही वर्षांपासून केले जात आहे. द्वेषाचे बिज पेरून समाजा-समाजाला, जाती-धर्माला एकमेकांविरोधात लढवून भाजपा आपली राजकीय पोळी भाजत आहे. देशात महागाई, बेरोजगारीची समस्या मोठी असताना केंद्रातील भाजपा सरकार त्याकडे लक्ष देत नाही. जनतेला त्यांनी वाऱ्यावर सोडून दिले आहे. अशा विपरीत परिस्थितीत 'भारत जोडो' यात्रेच्या माध्यमातून देश जोडण्यास निघालेल्या राहुल गांधी यांच्याकडून लोकांच्या आशा, अपेक्षा व विश्वास असल्याने प्रचंड मोठ्या संख्येने लोक सहभागी होत आहेत, असे कॉंग्रेस नेते कन्हैयाकुमार यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना कन्हैयाकुमार यांनी 'भारत जोडो' यात्रेचा उद्देश स्पष्ट केला व देशातील सद्यः परिस्थितीवर भाष्य केले. ते पुढे म्हणाले की, पदयात्रेत सहभागी झालेले लोक त्यांना भेडसावणाऱ्या दैनंदिन जीवनातील समस्यांवर बोलत आहेत. शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव मिळत नाही, शेतमालाला भाव मिळत नाही, उच्च शिक्षण घेऊनही नोकरी लागत नाही, अशी तरुणांची अवस्था आहे. मात्र अमित शाह यांच्या मुलाला मात्र नोकरी लागते; तेही नियम बदलून, याचाच तरुणांमध्ये संताप आहे. आपली स्वप्ने भाजपा सरकार धुळीस मिळवत आहे, हे त्यांचे दुःख आहे. महागाईने महिलांच्या स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले आहे. जिवघेण्या महागाईत जगणे मुश्कील झाले आहे. जनतेच्या या समस्या असताना केंद्रातील भाजपा सरकार मात्र या मुळ मुद्द्यांना हात घालत नाही. जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी ते इतर मुद्द्यांना महत्व देत आहेत. सरकार जनतेचे ऐकत नाही, पण राहुल गांधी मात्र जनतेच्या समस्या, वेदना, दुःख ऐकून घेत आहेत.



### जनतेचे समर्थन

आपले दुःख ऐकण्यासाठी आपल्याकडे कोणीतरी आले आहे ही भावनाच जनतेला आपलीशी वाटत असल्याचे कन्हैय्याकुमार यावेळी म्हणाले.
भारत जोडो यात्रेचा उद्देश पवित्र व स्वच्छ असून देश तोडणाऱ्या शक्तींना देश जोडण्यातून उत्तर दिले जात आहे आणि याकामी जनतेचे मोठे समर्थन लाभत आहे. या पदयात्रेचा उद्देश केवळ निवडणुका जिंकणे नाही तर जनतेला विश्वास देण्याचा आहे, देशातील एकोपा कायम ठेवणे आहे. आपापसात भांडण्यापेक्षा महागाई, बेरोजगारीसह आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्याची लढाई लढली पाहिजे हे जनतेला आता समजले आहे, असेही कन्हैयाकुमार म्हणाले. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे उपस्थित होते.

## १ लाख १३ हजार २७९ फुकट्यांवर कारवाई; ७८ लाख ४४ हजार ६५० रूपयांची दंड वसुली


# बेस्टला फुकट्या प्रवाशांचा विळखा

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. उपनगरीय रेल्वेबरोबरच आता मुंबईची जिवनवाहिनी अशी ओळख असलेल्या बेस्टच्या बसमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या फुकट्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. वाढलेली प्रवासी संख्या आणि विनावाहक बसेसेवेतील नियोजनाचा अभाव यामुळे अनेक प्रवासी विनातिकीट प्रवास करु लागले आहेत. या फुकट्या प्रवाशांमुळे बेस्टच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. बेस्टने २०१९ पासून आतापर्यंत बसमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या तब्बल १ लाख १३ हजार २७९ फुकट्या प्रवाशांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ७८ लाख ४४ हजार ६५० रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

करोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर मुंबई हळूहळू पूर्वपदावर आली आणि बेस्ट बसमध्ये प्रवाशांची गर्दी वाढू लागली. सध्या दररोज ३५ लाखांहून अधिक प्रवासी बेस्टमधून प्रवास करीत आहेत. मात्र अनेक प्रवासी विनातिकीट प्रवास करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापैकी काही प्रवासी सराईतपणे हातानेच खूणावून 'पास' असल्याचे सांगून निसटण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर गर्दी असलेल्या बसमध्ये दरवाज्याजवळ उभे राहून प्रवासी तिकीट न काढताच आपल्या थांब्यावर उतरून निघून जातात. फुकट्या प्रवाशांना पकडून त्यांच्याकडून दंड वसूल करण्याचा प्रयत्न तिकीट तपासनीस करीत असतात. मात्र तिकीट तपासनीसांचे संख्याबळ, बस आणि थांब्यांची संख्या लक्षात घेता सर्वच फुकट्या प्रवाशांना पकडणे शक्य होत नाही.

बेस्ट प्रशासनाने सुरू केलेल्या विनावाहक सेवेचा काहीजण गैरफायदा घेत आहेत. बेस्ट उपक्रमाने ऑक्टोबर २०१९ मध्ये १३ मार्गांवर विनवाहक बस सेवा सुरू केली. सध्या ६५ मार्गांवर विनावाहक बस सेवा सुरू आहे. या बसमध्ये वाहक नसतात. या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बस थांब्यांवर उभ्या असलेल्या वाहकांकडून तिकीट देण्यात येते. मधल्या थांब्यांवर गर्दीच्या वेळी काही प्रवासी वाहकाची नजर चुकवून बसमध्ये प्रवेश करतात व सर्रास विनातिकीट प्रवास करतात. काही वेळा बस थांब्यांवर वाहक उपलब्ध नसल्याने शेवटचा थांबा येईपर्यंत प्रवाशांना तिकीट उपलब्ध होत नाही. त्यामुळे विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत आणखी भर पडते.

२०१९ पासून आतापर्यंत एक लाख १३ हजार २७९ विनातिकीट प्रवाशांवर तिकीट तपासनीसांमार्फत कारवाई करण्यात आली.




### फुकट्या प्रवाशांमुळे बेस्ट उपक्रमाकडून विनावाहक बसेसच्या संख्येत कपात

सप्टेंबर २०२२ मध्ये ११० मार्गांवर विनावाहक बस सेवा सुरू होती. आता ही संख्या ६५ झाली आहे. चालकांची कमतरता आणि विनावाहक सेवामुळे फुकट्या प्रवाशांची वाढणारी संख्या लक्षात घेऊन काही मार्गांवर विनावाहक बस कमी करण्यात आल्या आहेत. काही मार्गांवर विनावाहक बस सेवा चालवताना बेस्ट उपक्रमला योग्य प्रकारे नियोजन करता आलेले नाही. एखाद्या थांब्यावर वाहक नसल्यास पुढील थांब्यावर उपलब्ध असलेल्या वाहकाकडून बसमधील प्रवाशांना तिकीट काढावे लागते. त्यावेळी प्रवाशांना आसन सोडून पुन्हा बसच्या दरवाजाजवळ जाऊन वाहकाकडून तिकीट घ्यावे लागते. तिकीट काढण्यासाठी दरवाजाजवळ गेलेल्या प्रवाशांच्या आसनावर अन्य प्रवासी बसतात. त्यामुळे प्रवाशांमध्ये वाद होतात.

# मुंबईच्या सुशोभिकरणाला कंत्राटदारांमुळे ग्रहण


### निविदा घोटाळ्याचा आरोप; दोन प्रभागातील निविदा रद्द

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबई शहराचे सौंदर्यीकरण करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिकेला दिले होते. त्यासाठी पालिकेने १७०५ कोटी रुपयांची निविदाही काढली, मात्र आता पालिकेने नेमलेल्या कंत्राटदारांमुळे सुशोभीकरणाला ग्रहण लागले आहे. दोन प्रभागातील निविदा घोटाळ्यानंतर पालिकेला निविदा रद्द कराव्या लागल्या.

सुशोभीकरणासाठी, पालिकेने सर्व वॉर्डांना सुमारे ५० कोटी रुपयांचा निधीही दिला आहे. प्रभाग कार्यालये त्यांच्या स्तरावर निविदा काढून सुशोभीकरणाचे काम ठेकेदारांना देत आहेत. त्याचप्रमाणे महापालिकेच्या दोन प्रभागांमध्ये काढण्यात आलेल्या निविदांचे दर उणे ३० टक्क्यांवर आले आहेत. पालिकेचा २२ टक्के कर जोडून ही निविदा सुमारे ५२ टक्के भरली आहे. निम्म्या खर्चात मुंबईचे सौंदर्यीकरण कसे होणार, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### २४ कोटींची निविदा

माजी नगरसेवक विनोद मिश्रा यांनी आयुक्त इक्बाल सिंग चहल आणि दक्षता विभागाचे सहआयुक्त अजित कुंभार यांना पत्र लिहून या संपूर्ण घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मिश्रा म्हणाले की, पी उत्तर प्रभागाने सुशोभीकरणासाठी २४ कोटींची निविदा काढली होती. पालिकेच्या ठरलेल्या दरापेक्षा ३० टक्के कमी दराने कंत्राटदाराने कंत्राट भरले. ३० टक्के कमी दराने कंत्राट भरले असून २२ टक्के रक्कम पालिकेच्या प्रशासकीय विभागाला द्यावी लागेल, कंत्राटी रकमेपैकी ५२ टक्के रक्कम अशीच निघून जाईल, असा आरोप विनोद मिश्रा यांनी केला.



## # QUICK NEWS

### बच्चन पिता - पुत्र सिद्धीविनायक चरणी

**मुंबई :** उंचाई चित्रपट रिलीज होताच आशीर्वाद घेण्यासाठी अमिताभ बच्चन यांनी अभिषेकसह सिद्धिविनायक मंदिराला भेट दिली. शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारात दोघेही मंदिरात दाखल झाले. यापूर्वी ऐश्वर्या राय बच्चन यांनीदेखील वाढदिवसाच्या दिवशी १ नोव्हेंबर रोजी मुलगी आराध्यासोबत सिद्धीविनायक मंदिरात भेट दिली होती.

अमिताभ बच्चन यांचा बहुप्रतिक्षित 'उंचाई' हा चित्रपट शुक्रवारी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात बोमन इराणी, अनुपम खेर, नीना गुप्ता, सारिका, डॅनी डेन्झोंगपा आणि परिणीती चोप्रा यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. राजश्री प्रॉडक्शन, महावीर जैन फिल्म्स आणि बाउंडलेस मीडिया यांनी संयुक्तपणे निर्मिती केलेल्या या हिंदी भाषेतील ड्रामा चित्रपटाचे दिग्दर्शन सूरज यांनी केले आहे. हा चित्रपट रिलीज झाल्याने अमिताभ सिद्धीविनायक दर्शनाला आल्याचे मानले जाते.

## आनंदाश्रू • संजय राऊतांनी केली अंधारेंच्या कार्याची प्रशंसा

# टायगर इज बॅक : सुषमा अंधारे

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. संजय राऊत यांच्या सुटकेनंतर महाविकास आघाडीतील सर्वच नेत्यांनी या निर्णयावर आनंद व्यक्त केला. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, आम्ही सगळे जण आनंद व्यक्त करण्यासाठी जमलो आहोत. टायगर इज बॅक, हा खूप मोठा आनंदाचा क्षण आहे. यावेळी बोलताना त्यांना रडू कोसळले होते.

पत्रा चाळ घोटाळ्याप्रकरणी अटकेत असलेले शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना अखेर १०३ दिवसांनी जामीन मिळाला आहे. संजय राऊतांच्या जामीनानंतर राज्यभरात शिवसैनिकांकडून जल्लोष साजरा करण्यात येत आहे. संजय राऊत यांचे सुटकेनंतर सर्वत्र जल्लोषात स्वागत करण्यात आले.

तब्बल १०२ दिवसांनी आमच्या कुटुंबातील महत्त्वाचा सदस्य बाहेर येत आहे. मरण पत्करेन, शरण नाही असे सांगणारा आमचा नेता परतला आहे. लढाई सुरू असताना सेनापती, सरदार असणे गरजेचे असते. काळ पालटणार नाही असे ज्यांना वाटले, त्यांना कळाले असेल. शिवसेना विचार आहे, कधीही संपणार नाही. शिवसेना दुपटीने तेवढेच आमदार आणण्याची ताकद ठेवते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता.

सुषमा अंधारे यांनी आज संजय राऊत यांच्या भांडूप येथील घरी जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी, त्यांच्यासमवेत औपचारीक गप्पाही मारल्या. त्यांच्या कुटुंबासमवेत त्यांनी सेल्फी घेतले आणि संजय राऊत हे मला गुरूतुल्य असल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी, विधानपरिषद विपक्ष नेते अंबादास दानवेही उपस्थित होते.

संजय राऊत यांची अंधारे यांनी शुक्रवारी त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. बऱ्याच दिवसानंतर मनमोकळ्या गप्पा केल्या.



### कामाची पोचपावती

तब्बल १०२ दिवस मला पक्षात येऊन झालेत आणि तब्बल १०२ दिवसांनी सन्माननीय राऊत साहेब हे आमच्या सगळ्यांना भेटीसाठी उपलब्ध झालेत, हा एक योगायोगच म्हणावा, परंतु एक नक्की राऊत साहेबांच्या येण्याने खूप ताण कमी झाल्यासारखा वाटत आहे, असेही सुषमा अंधारे यांनी म्हटले. थोडेसे हलके वाटत आहे आणि सोबतच शिवसेनेची ताकद दहा पटीने वाढली आहे. राऊत साहेबांना म्हटले, सर आम्ही खारीचा वाटा उचलायचा प्रयत्न केला, आमच्या आमच्या परीने खिंड लढवली. फार मोठे काही नाही केले, असे सुषमा अंधारे यांनी फेसबकवरुन सांगितले. राऊत साहेब उत्तरले, तुम्ही ही खिंड निकराने लढलात म्हणजेच ही देखील पावनखिंड झाली. यासारख्या एका छोट्या शिवसैनिकांसाठी ही फार मोठी पोच आहे, असेही सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियातून म्हटले आहे.संजय राऊतांनी केलेली प्रशंसा महत्त्वाची असल्याचे अंधारे यांनी यावेळी सांगितले.

# झवेरी बाजार महोत्सव उत्साहात



**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. इंडियन बुलियन अ‍ॅण्ड ज्वेलर्स असोसिएशनच्या वतीने झवेरी बाजार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचा शुक्रवारी समारोप झाला असून या आयोजनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा महोत्सव झवेरी बाजारातील प्रदर्शकांसाठीच केंद्रीत करण्यात आला होता.

या महोत्सवात झवेरी बाजार परिसरातील सुमारे २७० ज्वेलर्स सहभागी झाले होते. यावेळी खरेदीदारांसाठी अनेक योजना, लकी ड्रॉ स्कीम आणि जॅकपॉट बक्षिसेही असोसिएशनने जाहीर केली.झवेरी बाजाराचा जुना गौरव परत मिळविण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

लहान, मोठ्या सर्वच ज्वेलर्सला आणि खरेदीदारांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या माध्यमातून असोसिएशनने केला असून अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी व सचिव सुरेंद्र मेहता यांच्या संकल्पनेतून महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# गरजूंना महापौर निधीची प्रतीक्षा

**मुंबई,** मुंबईमधील गरीब आणि गरजू रुग्णांना मुंबई महापालिकेच्या महापौर निधीमधून आर्थिक मदत केली जाते. मार्चमध्ये कार्यकाळ संपल्याने महापालिका बरखास्त करण्यात आली आहे. यामुळे गरीब व गरजू रुग्णांच्या २०० हुन अधिक नातेवाईकांनी मदतीसाठी अर्ज करून सुद्धा त्यांना या निधीमधून आर्थिक मदत मिळालेली नाही. पालिका आयुक्तांनी पुढाकार घेऊन गरीब गरजू नागरिकांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी केली जात आहे.

रुग्णाला रुग्णालयात दाखल केल्यावर खर्च आवाक्याबाहेर गेल्यावर इतर ठिकाणाहून आर्थिक मदत मिळवण्यासाठी नातेवाईक प्रयत्न करतात. त्यासाठी ते विविध संस्था, ट्रस्ट, मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच मुंबई महापालिकेच्या महापौर निधीमधून आर्थिक मदत मिळवण्याचा प्रयत्न करतात. महापौर निधीमधून २०११ पासून रुग्णांना प्रत्येकी ५ हजार रुपये आर्थिक मदत दिली जात होती.

# प्रीपेड टॅक्सीचा प्रवास आता महागणार

### भाडेवाढ करण्याचा एमएमआरटीएचा निर्णय



**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने (एमएमआरटीए) नुकत्याच झालेल्या बैठकीत मुंबई विमानतळावरील काळ्या-पिवळ्या प्रिपेड टॅक्सीच्या भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळवरून प्रिपेड टॅक्सीने किमान सहा किलोमीटर अंतरावरील ठिकाणी जाण्यासाठी आता १४० रुपये, तर देशांतर्गत विमानतळाबाहेरून या टॅक्सी चार किलोमीटर अंतरासाठी ९३ रुपये मोजावे लागणार आहेत.

यापूर्वी आंतरराष्ट्रीय विमानतळाबाहेरून प्रिपेड टॅक्सीतून सहा किलोमीटर प्रवास करण्यासाठी १२७ रुपये, तर देशांतर्गत विमानतळवरून चार किलोमीटर प्रवासासाठी ८५ रुपये मोजावे लागत होते. आता या टॅक्सीने देशांतर्गत विमानतळावरून आठ किलोमीटर प्रवासासाठी १७९ रुपये, तर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून १६ किलोमीटर प्रवासासाठी ३५८ रुपये मोजावे लागणार आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात ९२ रिक्षा-टॅक्सी थांब्यांनाही मान्यता देण्यात आल्याची माहिती परिवहन विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. यामध्ये ७३ रिक्षा थांबे, सात शेअर रिक्षा थांबे, नऊ टॅक्सी थांबे आणि तीन शेअर टॅक्सी थांबे यांचा समावेश आहे.

योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी १ जुलै २०२१ पासून येणाऱ्या टॅक्सींवर रुफलाईट इंडिकेटर बसविणे सक्तीचे करण्यात आले होते. मात्र इंडिकेटर बसविण्याच्या निर्णयाला एमएमआरटीएने ३१ मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रवाशांना काळ्या-पिवळ्या टॅक्सीची उपलब्धता समजावी यासाठी रुफलाईट इंडिकेटर बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. टॅक्सीच्या वरच्या बाजूला तीन रंगात प्रकाशित करणारे एकच इंडिकेटर बसविण्यात येणार आहेत. हिरवा रंग टॅक्सी उपलब्ध, पांढरा रंग टॅक्सी बंद आणि लाल रंग टॅक्सी उपलब्ध नाही, असे दर्शविणार आहे.

### विमानतळावरील सलुनला अच्छे दिन

**मुंबई,** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक्स्प्रेस ब्युटी आणि ग्रूमिंग सेवा प्रदान करणाऱ्या एनएस स्टाइल सलूनने प्रतिदिन सरासरी १५ ते २० हजार रूपयांच्या विक्रीच्या तुलनेत एकाच दिवसात १ लाख रूपयाच्या विक्रमी कमाईची नोंद केली. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये सलूनचे उत्पन्न ४०० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ दिसून येत आहे. एनएस स्टाइल सलूनने ४ नोव्हेंबर २०२२ रोजी१ लाख रूपयाच्या विक्रमी कमाईची नोंद केली.

# जानेवारीत होणार एमपीएससीची राज्यसेवा मुख्य परीक्षा

### १४ ते २८ नोव्हेंबरमध्ये उमेदवारांना अर्ज भरण्याचे आवाहन

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गेल्या आठवड्यात एमपीएससी अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२ चा निकाल जाहीर करण्यात आला. ही परीक्षा २९ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्यात आली होती. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २०२२ चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर ४ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आला. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची अधिसूचना आयोगाच्या

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२ उत्तीर्ण उमेदवारांनी मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याचा कालावधी १४ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दिला आहे. या कालावधीमध्ये उमेदवारांनी अर्ज सादर करण्याचं आवाहन करण्यात आले आहे. मुख्य परीक्षा ही अमरावती, नाशिक,पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद या सहा केंद्रांवर २१, २२ आणि २३ जानेवारी २०२३ रोजी घेण्यात येणार आहे.

पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेकरता प्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी आणि गुणांची कटऑफ आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

### शुल्क भरणाऱ्या उमेदवारांनाच प्रवेश

पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे ४ तारखेला निकाल जाहीर झाला आहे. पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या व परीक्षा शुल्क भरणाऱ्या उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल, असं एमपीएससीने आपल्या निवेदनात स्पष्ट केलं होते.

आयोगाने दिलेल्या पत्रकानुसार आता पूर्व परीक्षा पास झालेल्या उमेदवारांची मुख्य परीक्षा २१, २२ आणि २३ जानेवारी २०२३ रोजी घेण्यात येणार आहे. पूर्व परीक्षेतील पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळवण्यात आले आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती आणि परीक्षा शुल्क दिलेल्या मुदतीत विहित पध्दतीनं सादर करणं आवश्यक आहे. अन्यथा त्या उमेदवाराला मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्वीकारार्ह ठरतील, असे आयोगाच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये म्हटले आहे.

# किहीमचे अर्धवट अवस्थेतील बांधकाम कोसळण्याच्या अवस्थेत



**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतीय पक्षितज्ञ डॉ. सलीम अली स्मरणार्थ किहीम अलिबाग येथे पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र उभारण्यात येत आहे. याचे महिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याचे काम मात्र गेल्या चार महिन्यापासून रखडले आहे. डॉ. सलीम अली यांच्या जन्मदिनी म्हणजे १२ नोव्हेंबरला या अभ्यास केंद्राचे लोकार्पण करायचे होते. मात्र नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर त्यांनी मविआ सरकारच्या निर्णयांना दिलेल्या स्थगितीचा फटका अभ्यास केंद्राला बसला आहे. त्यामुळे अर्धवट उभे असलेले बांधकाम जीर्ण झाले असून कोसळण्याच्या अवस्थेत आहे.

डॉ. सलीम अली यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र सरकारने ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर हा पक्षी सप्ताह घोषित केला आहे. डॉ. सलीम अली यांनी किहीम, अलिबाग येथे आयुष्याचा बराच वेळ घालवला आणि पक्ष्यांचे आणि त्यांच्या प्रजननाचा अभ्यास केला. तत्कालीन राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी डॉ. सलीम अली यांच्या सन्मानार्थ, वनविभाग अलिबागमध्ये पक्षी केंद्र सुरू करण्याची कल्पना मांडली. त्यासाठी रायगड जिल्हा परिषद,वन विभाग यांच्या माध्यमातून पक्षी निरीक्षण व अभ्यास केंद्राचे काम सुरू करण्यात आले. ११ जानेवारी २०२२ राजी आदिती तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

याबाबत बोलताना आदिती तटकरे यांनी सांगितले की डॉ. सलीम अली यांनी आयुष्यातील महत्वाचा काळ हा किहीम मध्ये व्यतीत केला आहे.

### राज्य सरकारने लवकर स्थगिती उठविण्याची जोरदार मागणी

पद्मभूषण आणि पद्मविभूषण डॉ. सलीम अली यांनी पक्षी अभ्यास व पक्षी संरक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य बी.एन.एच.एस या संस्थेच्या माध्यमातून खर्ची घातले. त्यांच्या नावाने त्यांच्याच किहीम या गावी हे पक्षी अभ्यास केंद्र महाराष्ट्र शासन उभारत आहे हे कौतुकास्पद आहे. ही वास्तू उभी होताच बी.एन.एच.एस येथे पक्षी अभ्यासासाठी लागणाऱ्या गोष्टी उपलब्ध करेल. हा प्रकल्प लवकर पूर्ण व्हावा ही आमची अपेक्षा आहे असे बी.एन.एच.एस.चे मानद सचिव,किशोर रिठे यांनी सांगितले.

डॉ. सलीम अली (१२ नोव्हेंबर १८९६-२० जून १९८७) आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतीय पक्षितज्ञ आहेत. भारतीय उपखंडातील पक्ष्यांच्या निरिक्षणासाठी आखलेल्या विविध अभ्यास मोहिमा, दुर्मिळ पक्ष्यांचे लावलेले शोध, तसेच पक्ष्यांसंबंधी लिहिलेले अनेक गंथ यांकरिता सलीम अली प्रसिद्ध आहेत. त्यांचे कार्य पक्षिविज्ञानाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा समजला जातो.

## प्रस्ताव तयार • शासकीय तिजोरीतून खर्च न करता रायगडवासीयांनी 'करून दाखविले'

# रायगडमध्ये श्रमदानातून ७६ तलावांचे संवर्धन

### रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित १८८ तलाव ; अवघ्या ५ महिन्यात रायगडवासियांनी साधली किमया

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. शासनाच्या एखाद्या योजनेचे महत्व जनसामान्यांना पटवून देण्यासाठी शासकीय यंत्रणेने संवेदनशीलतेने प्रयत्न केले तर जनसामान्य देखील आपल्याच उपयुक्ततेच्या योजनेत स्वेच्छेने सक्रीय सहभाग देण्यास तयार होतात. मग ती शासकीय योजना शासनाची एक योजना राहात नाही तर ती जनसामान्यांची योजना बनून जाते. ती योजना शासनाच्या तिजोरीतील एक रुपया देखील न वापरत जनसामान्यांच्या श्रमदानातून प्रत्यक्षात उतरते. याची प्रचिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केवळ रायगड जिल्ह्यासच नव्हे तर संपूर्ण राज्याला सरोवर संवर्धन अभियान योजनेंतर्गत तब्बल ७६ तलावांचे यशस्वी संवर्धन करून आणून दिली आहे.



राज्यातील ३४ जिल्ह्यात एकूण ३३२४ तलावांचे संवर्धनाकरिता गुगल मॅपींग करण्यात आले. त्यातील सर्वाधिक म्हणजे १८८ तलाव रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील आहेत. त्यापैकी यंदाच्या वर्षभरात ७५ तलांवांचे काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले हाते, प्रत्यक्षात ७६ तलावांचे काम तेही केवळ पाच महिन्यात पूर्ण करण्यात यश आले आहे. या कामात रायगड जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

तलावांचे जतन करण्यासाठी शासनाने सरोवर संवर्धन अभियान सुरू केले आहे. या सरोवर संवर्धन अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यातील १८८ तलावांची निवड करण्यात येऊन त्यातील ७५ तलावांतील तलावांमधील गाळ काढणे, सुशोभीकरण करणे, बळकटीकरण किंवा पुर्नजीवित करणे अशी कामे पूर्ण करण्याचे उद्दीष्ट रायगड जिल्हा परिषदेस देण्यात आले होते.

### झेंडावंदन करून तलावांच्या कामाचे उद्घाटन

वर्षभरात ७५ तलांवाचे काम पूर्ण होणे अपेक्षीत असताना प्रत्यक्षात ७६ तलांवांचे काम पूर्ण करण्यात आले आणि ते देखील १२ महिन्यांत नव्हे तर केवळ पाच महिन्यात पूर्ण करण्यात आले. १५ ऑगस्ट २०२२ रोजी या सर्व म्हणजे ७६ तलावांच्या ठिकाणी स्थानिक सरपंच लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांनी झेंडावंदन करुन आपणच श्रमदानातून केलेल्या कामाचे उद्धाटन केले आणि गांवाने आगळा सामुहीक आनंदोत्सव साजरा केला.

### शासनाच्या ४ कोटी ८१ लाखांची झाली बचत

लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, महिला बचत गट आणि ग्रामस्थांनी या अभियानात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. जिल्ह्यातील या ७६ तलावांच्या कामांकरिता प्रत्येक तलावावर सुमारे ३०० ग्रामस्थांनी दररोज आठ तास या प्रमाणे २४०० तास श्रमदान केले. असे श्रमदान सरासरी १० दिवस झाले, परिणामी एकुण २४ हजार तासांचे श्रमदान झाले. याप्रमाणे ७६ तलावांचे हे श्रमदान १८ लाख २४ हजार तास झाले असून हे मजुरी दिवस २ लाख २८ हजार दिवस होतात. रोजगार हमी योजनेतीस शासकीय मजुरीचा दर प्रतिदीन २११ रुपये आहे. त्यानुसार ही एकुण मजुरी ४ कोटी ८१ लाख ८ हजार रुपये होते. मात्र हे श्रमदान ग्रामस्थांनी शासकीय मजुरी न घेता स्वेच्छेने केले असल्याने शासनाच्या तब्बल ४ कोटी ८१ लाख ८ हजार रुपयांची बचत करुन ग्रामस्थांनी सामुहिक श्रमदानातून आगळा विक्रम प्रस्थापित केला आहे.

### कंपन्यांनीही दिला सीएसआर निधी

दरम्यान या अभियानांतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ७६ तलावांमधील गाळ काढणे, सुशोभीकरण करणे, बळकटीकरण किंवा पुर्नजीवित करणे अशी कामे पूर्ण करण्याकरिता स्थानिक पातळीवर कंत्राटदारांकडून जेसीबी,ट्रक आदि यंत्रणा उपलब्ध झाली. जवळच्या कंपन्यानी आपला सामाजिक उत्तर दायित्व (सीएसआर) निधी या लोकोपयोगी सामाजिक कार्यासाठी उपलब्ध करुन दिला. त्यांतून खर्च भागविण्यात आल्याने शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी घेण्यात आला नसल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. रायगडवासियांच्या श्रमदानांची राज्यभरात चर्चा सुरु झाली असून इतरही त्यापासून प्रेरणा घेण्याची शक्यता आहे.

# सोमवारी होणार सदनिकांची निश्चिती



**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे वरळी बीडीडी चाळीतील इमारत क्रमांक ३२, ३३, ३९,४० व सावली इमारतीमधील ३२२ पात्र गाळेधारकांना पुनर्विकासाअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्विकास इमारतीमध्ये यादृच्छिक पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे सदनिकांचा क्रमांक निश्चितीचा कार्यक्रम १४ नोव्हेंबरला दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

म्हाडा मुख्यालयातील गुलझारीलाल नंदा सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. सदनिका निश्चितीच्या कार्यक्रमासाठी उच्च स्तरीय देखरेख समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या उपस्थितीमध्ये पात्र गाळेधारकांकरिता सदनिका क्रमांक निश्चितीसाठी सोडत काढण्यात येणार आहे. या सदनिका निश्चितीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी संबंधित चाळींमधील प्रथम येणाऱ्या ५ सदस्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या गाळेधारकांनी संबंधित चाळीमधील गाळेधारक असल्याबाबत पुरावा सादर करणे आवश्यक आहे, असे आवाहन मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

# निराधार योजनेतील प्रकरणे मंजुर करा

धुळे, (वा.) संजय गांधी निराधार योजनेतील लाचखोर तलाठयाचे निलंबन करुन प्रलंबित ८ हजार प्रकरणे त्वरीत मंजुर करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात असा इशारा शिवसेनेने दिला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विधवा व वंचित महिला भगिनींना न्याय मिळावा, कुटुंबाचे चरितार्थ चालविण्यासाठी शासनाकडून हातभार लागावा याकरीता संजय गांधी व श्रावण बाळ योजना कार्यरत आहे. या योजनेत धुळे ग्रामीण व शहरात सावळा गोंधळ उडाला असून या योजनेचा स्वतंत्र कारभार सुरु असताना देखील या विभागासाठी धुळे शहराला अद्यापही स्वतंत्र कार्यभार असलेला तहसिलदार मिळालेला नाही. तहसिलदारांची या ठिकाणाहून सतत अदलाबदली मुळे दररोज दाखल असंख्य प्रकरणे निर्णयाअभावी प्रलंबित आहेत. या विभागात काम करणाऱ्या तहसिलदारांच्या अकार्यक्षमतेमुळे व तसेच लाचखोर तलाठ्यांच्या उपद्रव्यापामुळे या योजनेतील लाभार्थी महिला मेताकुटीला आल्या आहेत. एकूण दाखल प्रकरणात ८ हजार प्रकरणे ऑनलाईन पोर्टलवर मंजुरीसाठी प्रतिक्षेत आहेत.



### तलाठ्याने मागितली ५ ते १० हजारांची लाच

1 शहरी भागातील २ हजारच्यावर तर ग्रामीण भागातील ६ हजार प्रकरणांचा यात समावेश आहे. २०१९ ते २०२१ या तीनही वर्षातील दाखल प्रकरणे ऑनलाईन पोर्टलवरून उडालेली असून यात ५ हजार दाखल प्रकरणे जुनी आहेत, ३ हजार प्रकरण उडाली आहेत. सध्या १५०० प्रकरणे प्रभारी तहसिलदारांकडे मंजुरीसाठी दाखल आहेत. जुन्या ५ हजार ऑनलाईन उडालेल्या प्रकरणासंबंधात वंचितांना कुठलीही माहिती दिली गेलेली नाही किंवा त्यांना नव्याने प्रकरणे सादर करावीत असेही सांगण्यात आलेले नाही. सदर विभागामार्फत वचितांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात असून विधवा व निराधार महिला या विभागाच्या कारभारामुळे मेताकुटीला आल्या आहेत. सदर लाभार्थींना न्याय देण्यासाठी त्यांचे पोर्टलवरुन उडालेले ५ हजार प्रकरणे शासनामार्फत नव्याने भरुन घेण्याकरीता उदासिनता दाखवित आहेत.

2 प्रकरणे मंजुर करण्यासाठी नियुक्त असलेल्या तलाठ्यांकडून ५ ते १० हजार रुपयांची लाच मागितली जात असून या संदर्भात अनेक वंचितांनी शिवसेनेकडे तक्रारी केल्या आहेत. तलाठी लाच घेण्याच्या कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातीलच कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग करीत आहेत. वंचितांमध्ये विधवा, एचआयव्ही ग्रस्त व इतर आजाराने त्रस्त महिलांचा समावेश आहे. तसेच काही ठिकाणी बोगस प्रकरणे मंजुर केली जात असून त्यासाठी बनावट आधार कार्ड, बनावट रहिवासी दाखला सादर केला जात आहे. त्यामुळे तातडीने संजय गांधी निराधार विभागाकरीता स्वतंत्र कायमस्वरुपी तहसिलदार नेमावा.

### ८ हजार प्रकरणे रखडल्याने नाराजी

२०१९ पासूनचे दाखल पण पोर्टलवरून उडालेले सर्व प्रकरणे नव्याने दाखल करून घ्यावीत व प्रलंबीत ८००० धुळे शहर व ग्रामीण प्रकरणे लवकरात लवकर मंजुर करुन वंचितांकडून पैशांची मागणी करणाऱ्या तलाठ्यांचे त्वरीत निलंबन करण्यात यावे व निराधार विधवा महिला भगिनींना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. याप्रसंगी सहसंपर्क प्रमुख महेश मिस्तरी, शिवसेना जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हा प्रमुख किरण जोंधळे, जिल्हा संघटक भगवान करनकाळ, मा.आ.प्रा.शरद पाटील, धीरज पाटील आदींची उपस्थिती होती.

# अंधारेंवर गुन्हा दाखल करा

## शबरी मातेविषयी आक्षेपार्ह वक्तव्य



भडगाव, (वा.) रामभक्त आदिवासींच्या शबरी माता यांच्याविषयी आक्षेपार्य वक्तव्य करून विटंबना केली आहे. यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल व्हावा अशी मागणी शबरी माता भिल्ल आदिवासी विकास संस्थेकडून करण्यात आली आहे. या आशयाचे निवेदन तहसीलदार मुकेश हिवाळे, व पो.नि. अशोक उत्तेकर यांना दिले.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यावर गुन्हा दाखल न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी समुदाय रस्त्यावर उतरेल. मोर्चे, आंदोलन व निदर्शने करतील, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी दयानंद बोरसे जिल्हाध्यक्ष, संजय बागूल भडगाव तालुकाध्यक्ष, जयवंत बागूल तालुका उपाध्यक्ष, संभाजी नारायण भिल, शहराध्यक्ष, रवींद्र कौतिक बागूल, शाखाध्यक्ष, (गुढे) गणेश सखाराम भिल, शाखाध्यक्ष (अमडदे) सोनू सखाराम भिल, किरण सोनवणे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

## # QUICK NEWS

### पिंप्राळा येथे शिवाजी स्मारकाचे काम रखडले

**जळगाव.** शहरातील पिंप्राळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम रखडल्याने आज महापौर जयश्री महाजन, उपमहापौर कुलभूषण पाटील आणि शिवसेना-उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक गजानन मालपुरे यांनी आज प्रशासनाला धारेवर धरले. शिवस्मारकाचे काम मार्गी न लागल्यास अजून आक्रमक भूमिका घेण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी आयुक्त डॉ. विद्या गायकवाड यांना दिला.शहरातील पिंप्राळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम अनेक दिवसांपासून रखडल्याची तक्रार आहे.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

## जळके येथील घटना : एमआयडीसीत नोंद

जळगाव, (वा.) तालुक्यातील जळके वसंतवाडी येथील ग्रामपंचायत सदस्यांने शेतातील झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याचे बुधवारी ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी उघडकीला आले आहे. आत्महत्या करण्याचे कारण समजू शकले नाही. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राजेंद्र भगवान ब्राह्मणे (वय ३६, रा. जळके, ता. जि.जळगाव ह.मु.जळगाव, ) असे मयत तरुण ग्रामपंचायत सदस्याचे नाव आहे. राजेंद्र ब्राम्हणे हा जळगाव शहरातील पांडे चौकातील एका हॉस्पिटलमध्ये जनसंपर्क अधिकारी



म्हणून कामाला होता. जळगाव येथेच तो स्थायिक होता. बुधवारी ९ नोव्हेंबर रोजी सांयकाळी ६ वाजेच्या सुमारास जळके येथील भगवान पुंडलिक पाटील यांच्या शेतात गेला व तिथे गळफास घेतला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस पाटील संजय चिमणकारे व प्रवीण पाटील यांनी घटनास्थळी धाव व घेतली. म्हसावद पोलीस दुरक्षेत्राचे स्वप्निल पाटील व प्रदीप पाटील यांनी पंचनामा करून मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रवाना केला.

## कारवाईची मागणी • आंबेडकर चौक, अमर हॉटेल चौफुली अतिक्रमणाच्या विळख्यात

# बोदवडला अतिक्रमण ठरतेय डोकेदुखी

बोदवड, (वा.) शहरातील वर्दळीच्या ठिकाणी अवैध वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांची मुजोरी मलकापूर रोडवरील अमर हॉटेल जवळ चौकामध्ये तसेच आंबेडकर पुतळा चौकामध्ये अतिक्रमण करून दुकाने लावून तसेच दुकानासमोर अस्त व्यस्त वाहने उभे करून रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या पदचाऱ्यांना आपला जीव मुठीत घेऊन चालावे लागते. एखाद्या नागरिकाने अतिक्रमण धारक किंवा अवैध वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाला सांगितले की, वाहन बाजूला करा तर ते उद्धटपणे नागरिकांच्या अंगावर धावून जातात, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे.



### शहरात वाहनधारक तसेच चाकरमान्यांना होतोय त्रास

- बोदवड शहरांमधील अमर हॉटेल जवळ अतिक्रमण हात गाड्यांचे तसेच अवैध वाहतूक करणाऱ्या वाहने भरपूर प्रमाणात उभे असतात.
- त्यामुळे एसटी महामंडळाच्या वाहनांना तसेच मोठ्या वाहनांना मलकापूर कडे जाताना व येताना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागतो.
- तसेच पायी चालणाऱ्या नागरिकांना सुध्दा अमर हॉटेल जवळील चौकातून व आंबेडकर पुतळा चौकातून आपला जीव मुठीत घेऊन चालावा लागतो.

तसेच हा रस्ता नेहमी वर्दळीचा मुख्य रस्ता असून या रस्त्यावरील अतिक्रमण व अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांना शिस्त लावावी. जेणेकरून बोदवड शहराची शांतता भंग होणार नाही, तरी या संदर्भात पोलीस प्रशासन व नगरपंचायत विभागाने कारवाई केली नाही तर बोदवड शहरामध्ये अनुचित प्रकार व अपघात घडू शकतात.

### कारवाईची मागणी

शहरात वाहतूक विभागातर्फे कुठल्याही प्रकारचे नियोजन नाही किंवा वाहतूक विभागाचे कर्मचारी कुठेही दिसत नाही. सकाळी आणि सायंकाळी रहदारीचा मोठा अडथळा निर्माण होतो. कुणाला काही महत्वाचे काम असल्यास त्या ठिकाणी जाण्यास विलंब होतो. याबाबत अतिक्रमण धारकास बोलले तर वाद वाढतात. याबाबत प्रशासनाने दखल घेतली तर ही वेळ येणार नाही. पोलिस प्रशासन व नगरपंचायत यांनी याकडे लक्ष देवून येथील अतिक्रमण हटवावे अशी मागणी जोर धरत आहे.

**जाहीर नोटीस**

मे. व्ही. व्ही. पाटील साहेब २ रे सह दि. न्या. क. स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २ बारामती यांचे न्यायालयातील

किरकोळ अर्ज क ६६८/२०२२

श्री दत्तू केरु बोडरे
रा. सोनगाव ता. बारामती जि. पुणे ....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ....जाबदेणार

याद्वारे जाहिर नोटीस काढण्यात येते की, वरील अर्जदार नमुद पत्त्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार वडील नामे कै. केरू आबा बोडरे यांचा मृत्यु दि ०२/०१/२००७ रोजी झाला असून सदर मृत्यू नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सोनगाव, ता. बारामती जि. पुणे यांचेकडील मृत्यू रेकार्डला नोंद होवुन व सदर मयत व्यक्ती यांच्या मृत्यू दाखल्यावर दोन आडव्या रेषा ओढलेल्या आहेत ते काढून दाखला देणेबाबतचा मे कोर्टाचा आदेश व्हावा.

असा किरकोळ अर्ज अर्जदाराने २ रे सह दि.न्या.क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २, बारामती येथे दाखल केला आहे व त्याचेवर मे. कोर्टाने दैनिक वृत्तपत्रात जाहिर नोटसी काढणेचा आदेश पारीत केला आहे. सदर घटनेबाबत कोणास आक्षेप अगर म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी दिनांक १२/१२/२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मे व्ही.व्ही. पाटील, २ रे सह दि.न्या. क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २, बारामती यांचे न्यायालयात हजर राहून म्हणणे मांडावे.

सही/-
शिक्का
हुकूमावरुन
सहा अधिक्षक
फौजदारी न्यायालय क्र. २, बारामती

**जाहीर नोटीस**

मे.पी.ए. आपटे कोर्ट, ५वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, क. स्तर, बारामती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र :- ६८६/२०२२

अतुल युवराज पन्हाळे
वय -२७ वर्षे, धंदा - शेती
रा. गणेश मंदिराजवळ म्हाडा कॉलनी,
रूम नं-३४, गुणवडी शेठ, बारामती, पुणे ..... अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ..... जाबदेणार

जन्ममृत्यू कायदा १९६९ व जन्ममृत्यू नियम १९७३ मधील कलम १३(२)(३) व नियम १० प्रमाणे अर्ज

याद्वारे जाहिर नोटीस काढण्यात येते की, वरील अर्जदार यांना / त्यांची पंजी नामे गंगुबाई सीताराम पन्हाळे हिचा जन्म/ मृत्यू दिनांक २७/०४/२००८ रोजी मौजे माळवाडी लाटे ता. बारामती, जि. पुणे येथे झालेला आहे. अर्जदार व त्यांच्या कुटुबियांकडून सदर मृत्यूची नोंद मौजे माळवाडी लाटे ग्रामपंचायत दप्तरी/ रेकॉर्डवर करावयाची राहून गेली असून, तशी ग्रामपंचायत दप्तरी / रेकॉर्डला नोंद व्हावी असा किरकोळ अर्ज ३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कनिष्ठ स्तर, बारामती येथे दाखल केला आहे. व त्यावर मे. न्यायालयाने सदरची नोटीस दैनिक वृत्तपत्रात जाहिर करणेचा आदेश पारीत केला आहे. सदर घटनेबाबत कोणास आक्षेस अगर म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे. ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कनिष्ठ स्तर, बारामती यांचे न्यायालयात स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे.

आज दिनांक ०९ माहे नोव्हेंबर २०२२ रोजी जाहिर नोटीस माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

सही/-
शिक्का
हुकूमावरून
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, बारामती, जि. पुणे

# जामनेरला शिवसेनेकडून सदस्य नोंदणी

## तालुक्यातून ४० हजार सदस्य नोंदणी करणार : मनोहर पाटील

जामनेर, (वा.) शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार गुरूवारी १० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जामनेर शहरात शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन आणि माल्यार्पण करुन शिवसेना रावेर लोकसभा सहसंपर्कप्रमुख डॉ.मनोहर पाटील, युवासेना विभागीय सचिव विराज कावडीया यांच्या हस्ते अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. विराज कावडीया यांनी युवासैनिकांना जास्तीत जास्त शिवसेना सभासद



नोंदणीवर भर द्या असे आवाहन केले तर डॉ.मनोहर पाटील यांनी सांगितले की जामनेर शहराच्या प्रत्येक छोट्या-मोठ्या चौकात शिवसैनिक बाक लाऊन सभासद नोंदणी करणार आहेत,जेणे करुन तळागाळातील सर्वसामान्य माणूस शिवसेनेला जोडला जाईल आणि उध्दव ठाकरे यांचे हात बळकट होतील.

### यांचे मिळाले सहकार्य

यावेळी युवासेना उपजिल्हायुवाधिकारी विश्वजित पाटील, तालुका युवा अधिकारी विशाल लामखेडे, उत्तर जामनेर शहर प्रमुख अतुल सोनवणे, दक्षिण जामनेर शहर प्रमुख ज्ञानेश्वर जंजाळ, उपतालुका संघटक सुधाकर सराफ, उपतालुका युवा अधिकारी रोहन राठोड, माजी उपजिल्हा युवा अधिकारी भरत पवार, जामनेर शहर चिटणीस आनस खान,विद्यापीठ युवा अधिकारी प्रितम शिंदे, उपशहरप्रमुख कैलास माळी, दिपक माळी, विभाग प्रमुख खुशाल जाधव, राहुल पाटील, शाखाप्रमुख सुनील गायकवाड, शिक्षकसेनेचे शांताराम माळी यांच्या शिवसैनिक-युवासैनिक उपस्थित होते.त्याचप्रमाणे शिवसेना सदस्य होण्यासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

# विवाहितेच्या छळ प्रकरणी गुन्हा दाखल

जळगाव, (वा.) शहरातील जुना खेडी रोड परिसरातील विवाहितेने माहेरुन पंधरा लाख रुपये आणावेत या कारणावरुन तिचा छळ करणाऱ्या पतीसह तीन जणांविरोधात शनिपेठ पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. शहरातील जुना खेडी रोड परिसरातील माहेर असलेल्या रुपाली सचिन शेंद्रे यांचा अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील सचिन रामेश्वर शेंद्रे यांच्याशी विवाह झाला आहे. लग्नानंतर २४ फेब्रुवारी २०२१ ते ८ नोव्हेंबर २०२२ या काळात रुपाली हिने माहेरुन पंधरा लाख रुपये आणावेत या कारणासाठी तिचा पतीसह सासरच्यांनी शिवीगाळ तसेच माहराण करत शारिरीक व मानसिक छळ केला, तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. छळाला कंटाळून रुपाली ह्या माहेरी निघून आल्या. मंगळवारी त्यांनी पोलिसांत तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत ही चंद्रकांत संदिपान थिटे यांचे खरेदी मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची आहे त्याप्रमाणे त्यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे सातबारा उतारा सदरी झालेली आहे. सदरील मिळकत त्यांनी आमचे अशिलांना कायम व खुष खरेदी देण्याचे ठरवून फायनल बोलणी करुन तसा व्यवहार ठरवून विसारपावती नोंदविलेली आहे.

सदर विद्यमान मालकाने सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, असल्याबद्दलची खात्री व भरवसा दिलेला असून सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, कर्ज, दान, वाटप, लीज, चोळी बांगडी, कुळ अधिकार, साठेखत, खरेदीखत व अन्य हितसंबंध असल्यास सदर नोटीस जाहीर झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आतमध्ये योग्य त्या कागदपत्रांनिशी खालील नमुद केलेल्या पत्त्यावर खात्री करुन देववावी अन्यथा तसे न केल्यास आमचे अशिल सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा जाणीवपुर्वक सोडून दिले असे समजून आमचे अशिल त्यापुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.

**मिळकतीचे वर्णन** : तुकडी पुणे, पोट तुकडी बारामती, मे.दुय्यम निबंधक सो., बारामती यांचे अधिकार कक्षेतील गाव मौजे तांदुळवाडी येथील गट नं. १७०/८ यांसी क्षेत्र ०१ हे.- २० आर यांसी चतु:सिमा मुळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे असत यापैकी विद्यमान मालकाचे समाईक अविभक्त हिश्श्याचे संपर्ण क्षेत्र ०० हे.-०२.५० आर (अडीच आर) (याचाच खाजगी प्लॉट नं. २८, क्षेत्र २३२.३४ चौ.मी.) बखळ जागा यांसी चतु:सिमा:- **पुर्व**- २० फुटी अंतर्गत रस्ता, **दक्षिण**- २० फुटी अंतर्गत रस्ता, **पश्चिम**- खाजगी प्लॉट नं. २७, **उत्तर**- खाजगी प्लॉट नं. २९ हा या जाहीर नोटीसीचा विषय असे.

बारामती, दिनांक:- ११/११/२०२२

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड.सागर संपत भापकर
रा. कारखेल, ता. बारामती, जि. पुणे.
मो.नं. ९८३४९९४२७९

### भरड धान्याच्या नोंदणीसाठी मुदत

धुळे. खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये केंद्र शासनाने किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेतंर्गत निश्चित केलेल्या हमीभावाने राज्यात भरडधान्य (मका, ज्वारी व बाजरी) खरेदीकरीता ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रियेसाठी १० नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु शेतकरी नोंदणीचा ओघ लक्षात घेता नोंदणी प्रकिया करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे, त्या शेतक-यांनी स्वतः नोंदणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतक-यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व मुदतीत नोंदणी करावी. असे आवाहन एस. बी. सोनवणे,यांनी केली आहे.

# बांभोरी पुलाजवळ लवकरच सीसीटीव्ही यंत्रणा

जळगाव, (वा.) शहराला लागूनच असलेल्या बांभोरी येथील गिरणा नदीवरील पूल वाळू उपशामुळे कमकुवत झाला आहे. आता नव्याने स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्यासंबंधी तयारी दर्शवली आहे. तर दुसऱ्या बाजूला जिल्हाधिकाऱ्यांनीही पुलालगत पाचशे मीटरपर्यंत वाळू उपशाला निर्बंध घालण्याच्या सूचना करत परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करण्यात येईल, असे स्पष्ट केले. गिरणा नदीपात्रातील अवैध वाळूउपशाचा विषय नेहमीच गाजत आला आहे. बेसुमार उपशामुळे नदीपात्र अक्षरशः ओरबाडले गेले आहे. त्यामुळे पर्यावरणाचीही हानी होत असून, दुसरीकडे नदीवर असलेल्या एकमेव बांभोरी पुलाचे फाउंडेशनही वाळूउपशाने कमकुवत होत आहे. सध्याच्या मोठ्या पुलाला झालेला धोका लक्षात घेता प्रशासनही खडबडून जागे झाले आहे. सध्या हा पूल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (न्हाई) अखत्यारित आहे. याआधी एकदा पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे, त्याचा अहवाल सकारात्मक आहे. मात्र, त्यालाही बरीच वर्षे झाली आणि त्यादरम्यान पुलालगत पात्रातून बेसुमार वाळू उपसा झाला आहे. त्यामुळे पुन्हा नव्याने त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे लागणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बंधारा-कम पुलाची प्रतीक्षा लागून पा ल क मं त्री





गुलाबराव पाटील यांच्या प्रयत्नाने निमखेडी-बांभोरीदरम्यान गिरणा नदीच्या डाऊन स्ट्रीमला बंधारा-कम पूल प्रस्तावित आहे. त्यासाठी राज्य शासनाने ४० कोटींचा निधी मंजूर केला आहे. मात्र, हा विषय अगदीच प्राथमिक स्तरावर आहे. हा पूल तयार झाल्यास जुन्या हायवेने पाळधी जाणे सोयीचे होईल. तसेच या पुलामुळे या ठिकाणी पाणी साचल्याने वाळू वाहतुकीला मोठा आळा बसेल. यामुळे बंधारा कम पूल लवकर व्हावा अशी मागणी जोर धरत आहे.

**PUBLIC NOTICE**

Date: 31/10/2022

Notice is hereby given to a public at large For Cancellation of the **Power Of Attorney And Agreement For Sale** that my client's **Mrs. Shobha Bhupesh Gupta & Mr. Yash Bhupesh Gupta** as a **Seller** who intend to sale their Land/Property particularly mentioned in the below schedule to **Purchaser Mr. Vikas Ramlakhan Patel,** vide Agreement For Sale Dated 26/05/2022 which is registered in the office o/o at Joint Sub Registrar Lonavala vide registration No. 3459/2022 Dated 26/05/2022 and registered power of Attorney which is registered in the office o/o at Joint Sub Registrar Lonawala vide its registration No. 3460/2022 Dated 26/05/2022. Now the deal is cancel and my client is **cancelling the above mention power of attorney** and Agreement for sale and also revokes all the power which is given in power of attorney, therefore notice to public not to deal, Purchase, mortgage, gift of below mention property through above mention power of attorney and you are hereby directed for not using the said Power of Attorney on my client's behalf and if you misused the said Power of Attorney then you will be liable for legal actions, criminal as well as civil prosecutions.

**SCHEDULE OF PROPERTY**

**Land/Property lying and being situated at Bearing Survey gut No. 153 village :- Pethshapur, Taluka :- Mulshi, District :- Pune admeasuring 00-H-32-R (Gunthas) out of land 01 H 20 Are, total area on 7/12 extract is 08 H 73 Are and its Assessed Rs. 04 and 50 Paise.**

**Adv. SiddharthVishram Jadhav**
**B.COM, LL.M.**
**Office: Shop No. 5, Baba Sadan Building,**
**Plot No. 19, Sector 4-A,**
**Near Kopar Khairne Railway Station,**
**Kopar Khairane, Navi Mumbai- 400709.**
**Mob. 9619947499/9223320333**

# हॉटलेच्या बिलावरून हाणामारी

## सामनेर येथील घटना : हाणामारीत एक गंभीर जखमी

पाचोरा, (वा.) तालुक्यातील सामनेर येथील हॉटेलमध्ये जेवणाच्या बिलावरून मारहाण झाल्याची घटना ६ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास घडली. दरम्यान, या मारामारीत एक जण गंभीर जखमी आहे. मुंबईतील के. ई. एम. रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. आज जखमी इसमाच्या वडिलांनी पाचोरा पोलिसात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पवनकुमार भागवत सूर्यवंशी (धोबी) व प्रमोद दिलीप पाटील रा. सामनेर ता. पाचोरा हे ५ रोजी रात्रीच्या सुमारास सामनेर गावानजिक असलेल्या एका हॉटेल मध्ये गेले. जेवण झाल्यानंतर हॉटेल चालक, पवनकुमार सुर्यवंशी व प्रमोद पाटील यांच्यात जेवणाच्या



बिलावरुन शाब्दिक चकमक होवुन भांडण झाले. ६ रोजी दुपारी दिड वाजेच्या सुमारास पवनकुमार सुर्यवंशी व प्रमोद पाटील हे जेवणाचे बिल देण्यास हॉटेलवर गेले असता आदल्या दिवसाच्या भांडणाचा वचपा काढत पवनकुमार सुर्यवंशी व प्रमोद पाटील यांना बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत पवनकुमार याचे डोक्यास गंभीर दुखापत झाल्याने त्यास जळगांव जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### मुंबई येथे उपचार

दरम्यान पवनकुमार यांची प्रकृती अधिकच खालावत असल्याने त्यास मुंबई येथील के. ई. एम. रुग्णालयात दाखल करण्यात आले असुन पवनकुमार यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

पवनकुमार सूर्यवंशी याचे वडिल भागवत सूर्यवंशी यांचे फिर्यादीवरून पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये आर्यन मोरे (पुर्ण नाव माहीत नाही) रा. हनुमान नगर, पाचोरा व गोकुळ नेरपगार रा. सामनेर ता. पाचोरा, ह. मु. पाचोरा या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असुन या घटनेचा पुढील तपास प्रभारी पोलिस निरीक्षक प्रताप इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी सहाय्यक पोलिस निरीक्षक जितेंद्र वल्टे हे करित आहे.

प्रपत्र-1
महाराष्ट्र शासन
**उप वनसंरक्षक पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय,**
पत्ता :- सेनापती बापट रोड, सिंम्बायोसिस कॉलेज समोर, पुणे-४११००४
ई - मेल पत्ता:- dycfpune@gmail.com दूरध्वनी / फॅक्स क्रमांक :- ०२०/२५६६०५९३

**ई-निविदा सूचना क्र. -- सन २०२२-२३**

उप वनसंरक्षक पुणे वन विभाग, पुणे महाराष्ट्र शासनाच्या वन खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता B-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपवनसंरक्षक पुणे यांनी राखून ठेवला आहे.

**कामाचे नाव;**

| Sr.No. | Work Name |
|---|---|
| 1 | CONSTRUCTION OF PROTECTION HUT (FRAMED STRUCTURE) AT WARJE SANJIVAN VAN SURVEY No. 120 IN BHAMBURDA RANGE OF PUNE FOREST DIVISION |
| 2 | CONSTRUCTION OF PROTECTION HUT (FRAMED STRUCTURE) AT BAVDHAN TTC CENTER SURVEY NO. 21 IN BHAMBURDA RANGE OF PUNE FOREST DIVISION |
| 3 | CONSTRUCTION OF PROTECTION HUT (FRAMED STRUCTURE) AT PASHAN SURVEY No. 38 IN BHAMBURDA RANGE OF PUNE FOREST DIVISION |
| 4 | CONSTRUCTION OF PROTECTION HUT (FRAMED STRUCTURE) AT KHADAKWASLA SURVEY No. 81 IN BHAMBURDA RANGE OF PUNE FOREST DIVISION |
| 5 | CONSTRUCTION OF PROTECTION HUT (FRAMED STRUCTURE) AT GHERASINHAGAD SURVEY No. 260, 262 IN BHAMBURDA RANGE OF PUNE FOREST DIVISION |

ई-निविदा रक्कम रुपये :- वेबसाईटवरती उपलब्ध आहे.
ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १०.११.२०२२ ते दिनांक २५.११.२०२२ रोजी दु. ०५.०० वाजे पर्यंत.
ई-निविदा उघडणे :- दिनांक २९.११.२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. http://mahatenders.gov.in.
(सदर निविदेसुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
2. उप वनसंरक्षक पुणे वन विभाग, पुणे. कार्यालयातील सूचना फलक
जा.क्र.अ- कक्ष-२(२)/कॅम्पा/ई-निविदा/144/2022-23 दि. १०.११.२०२२.
उप वनसंरक्षक पुणे वन विभाग, पुणे - ४११००४ यांचे कार्यालय.

सही/-
**उप वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे**

डीजीआयपीआर २०२२/२०२३/३९७५

**जाहिर नोटीस**

सर्व संबंधिताना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या/पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ठ करणेत आलेल्या मौजे डुडूळगाव येथील स. नं./सि. स. नं. २०१ पै. ता. हवेली, जि. पुणे मधील जागेचे वहिवाटीची मोजणी अ.ता.मो.र.नं./तातडीची मोजणी मो.र.नं. ३७४३८ दिनांक १५/०५/२०२२ अर्जदार **श्री संतोष रामराव बारोळे** यांनी मनपाकडे बांधकाम प्रस्ताव मंजूरीकामी सादर केलेली आहे. सदरील मोजणी निर्वेध व निर्जोखमी/तसेच खरी असल्याचा भरवसा सदर मिळकतीचे हितसंबंधित यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकाशिवाय अन्य कोणाचाही मोजणी संदर्भात अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षिस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध तसेच मोजणी विषयी हरकत/आक्षेप असल्यास संबंधिताने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत मा.कार्यकारी अभियंता, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, मुंबई-पुणे महामार्गालगत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रासह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क व हितसंबंध, मोजणी बाबत आक्षेप नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणून बुजून सोडून दिला आहे असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे संबंधित जागेचे अर्जदार यांना सदर ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** : तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे डुडूळगाव येथील स.नं./सि.स.नं. गट नं. २०१ पैकी, **श्री. संतोष रामराव बारोळे** यांच्या मालकीच्या मिळकतीतील जागेचे वहिवाटीची मोजणी अ.ता.मो.र.नं./ तातडीची मोजणी मो.र.नं. ३७४३८ दिनांक १५/०५/२०२२ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या/पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ठ करणेत आलेल्या भागातील मोजणी त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे.

**चतु:सिमा** : मौजे डुडूळगाव येथील गट.नं. २०१ पैकी, सि. स. नं. ------ पैकी, वहिवाटीची मोजणी अ.ता.मो.र.नं./तातडीची मोजणी मो.र.नं. ३७४३८ पुर्व : स.नं. १९६, पश्चिम : २० फूट रस्ता, उत्तर : प्लॉट नं. ८८ पै., दक्षिण : प्लॉट नं. ८७.

कायदा सल्लागार
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

जमिनीचे विकासक श्री. संतोष रामराव बारोळे
पत्ता : गट नं. २०१ पै., डुडूळगाव.

# किंग खानने केलं मराठमोळ्या श्रेयसचं कौतुक



'ओम शांती ओम' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १४९ कोटींचा गल्ला जमवला होता. मराठमोळा अभिनेता श्रेयस तळपदेही या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसला होता. शाहरुखच्या मित्राची भूमिका त्याने साकारली होती. 'ओम शांती ओम' या चित्रपटाला १५ वर्ष पूर्ण झाली आहेत. श्रेयस तळपदेने 'ओम शांती ओम' चित्रपटात काम करण्याअगोदर बॉलिवूडच्या दोन हिट चित्रपटातून त्याच्या अभिनयाचा ठसा उमटवला होता. 'अपना सपना मनी मनी' आणि 'इक्बाल' या चित्रपटातून त्याने अभिनयाची छाप पाडली होती. त्यामुळे फराह खानने 'ओम शांती ओम'साठी विचारल्यानंतर चित्रपटाची कथा ऐकण्यापूर्वीच त्याने होकार कळवला होता. बॉलिवूडच्या बादशहाबरोबर काम करण्याची संधी मिळणार असल्यामुळे तो खूश होता. श्रेयसने या चित्रपटाच्या निमित्ताने शाहरुख खानसह काम केल्याचा अनुभव एका मुलाखतीदरम्यान सांगितला. श्रेयस म्हणाला, "मी तेव्हा बॉलिवूडमध्ये नवीन होतो. या चित्रपटाच्या निमित्ताने मला दिग्दर्शक आणि कोरिओग्राफर फराह खान, शाहरुख आणि दीपिका पदुकोणसह काम करण्याची संधी मिळणार होती. हा अनुभव खूपच छान होता. आत्तापर्यंत मी काम केलेल्या सहकलाकारांपैकी शाहरुख खान हा बेस्ट आहे. त्यामुळेच तो सुपरस्टार आहे. शूटिंगच्या दुसऱ्याच दिवशी मी आणि शाहरुख चित्रपटातील सीनच्या शूटसाठी थांबलो होतो. तेव्हा शाहरुख मला म्हणाला की, श्रेयस खूप दिवसांनी मी एका चांगल्यासहकलाकाराबरोबर काम करत असल्याचं मला जाणवत आहे. मी घरी गेल्यावर गौरीलाही म्हणालो, या मुलाबरोबर काम करताना मला खरंच मजा आली". शाहरुखने श्रेयसचं केलेलं कौतुक श्रेयस आजही विसरलेला नाही. त्याच्यासाठी कुठल्याही पुरस्कारापेक्षा ही खूप मोठी बाब आहे.

# आमच्यात सारंकाही आलबेल






दोन अभिनेत्री एकमेकींच्या मैत्रिणी असू शकत नाही, असं म्हटलं जातं. अभिनेत्रींचं एकमेकींसोबत पटत नाही. बॉलिवूडमध्ये हे गॉसिपचे विषय ठरलेले असतात. बॉलिवूडमध्ये या कॅटफाइट्स काही नव्या नाहीत. करिना-बिपाशा, राणी- ऐश्वर्या यांची भांडणं सगळ्यांनाच माहित आहेत. पण आता कॅटफाइट्स मराठी सिनेसृष्टीतही असल्याच्या चर्चा सुरू आहेत. आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये टशन असल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र आमच्यात सारंकाही आलबेल असल्याचं या सोनालीची पाठोपाठ आता सईनेदेखील स्पष्ट केलं आहे. काही दिवसांपूर्वी एका गप्पांच्या कार्यक्रमात सोनाली कुलकर्णी हिनं अमृतासोबतच्या मैत्रीवर खुलासा केला होता. आता अभिनेत्री सई ताम्हणकर हिनं देखील अमृता आणि तिच्यातील मैत्रीवर भाष्य केलं आहे. मराठी सिनेसृष्टीत अशा चर्चा आहेत की, सई आणि अमृता यांच्यात सर्वकाही अलबेल नाही. अमृतालाकडं आलेल्या भूमिका नंतर तुझ्याकडं आल्या त्यामुळ ती तुझ्यावर नाराज आहे का?, असं सईला विचारण्यात आलं होतं. या प्रश्नावर सईनं तिला याबद्दल काहीच माहित नसल्याचं सांगितलं. पण असं तर होणारच ना की, एक भूमिका दोन जणांना विचारली जाते. हा आपल्या कामाचा भाग आहे. याकारणावरून मनात काही तिढी ठेवणं मला बरोबर वाटत नाही. पण मला वाटत नाही, की असं काही झालंही असेल, असं सईनं म्हटलं आहे. सईला पुढं विचारण्यात आलं की, तू आणि अमृता भेटता का? आणि तेव्हा सर्वकाही ठिक असतं का? यावर सईनं हो असं उत्तर दिलं. इतकंच नाही तर, आता सोशल मीडियावर ज्या चर्चा आहेत, त्याबद्दल लवकरच मी अमृताला फोन करून विचारणार असल्याचं सईने स्पष्ट केलं..

# चाहत्यांची भेट, काशीविश्वनाथाचं दर्शन आणि बरंच काही

**हप्पू की उलटन पलटन' या मालिकेमधील अत्यंत लोकप्रिय जोडी म्हणजे योगेश त्रिपाठी आणि कामना पाठक यांनी नुकतंच गंगा नदीच्याकाठी वसलेल्या काशी शहराला भेट दिली. याभेटी दरम्यान त्यांनी त्यांच्या चाहत्यांशी संवाद तर साधलाच पण याचबरोबर काशीशहराला भेट देऊन तिथल्या स्थानिक देवदिवाळीच्या उत्सवाचा आनंद लुटला. तसंच गंगानदीकाठी बोट राइडिंग करत, उत्कृष्ट स्ट्रीट फूडवर ताव मारत मनसोक्त शॉपिंगही केली. हा अविस्मरणीय अनुभव योगेश त्रिपाठी यांनी 'नवराष्ट्र'च्या प्रतिनिधीकडे शेअर केला. त्याचा हा सारांश...**





## वाराणसीच्या भेटीचा अनुभव

मी दुस-यांदा वाराणसीला भेट दिली. मी बालपणी पहिल्यांदा इथे आलो. तेव्हासुध्दा देवदिवाळीच होती. त्यावेळी 'अस्सी घाट' येथे देवदिवाळीचं सेलिब्रेशन मी खूप जवळून पाहिलं होतं. माझ्या जीवनातील तो संस्मरणीय आणि अद्भुत अनुभव होता. तेव्हा वाराणसी घाटची प्रत्येक पायरी हजारो दिव्यांसह चमकत होती. गंगा नदीकाठावरील लखलखाटाने तो परिसर उजळून गेला होता. आकाशातील दृश्यं चित्तथरारक होती. त्या दिवशी संपूर्ण शहर नयनरम्य दिसत होतं. त्यातून एक सकारात्मक उर्जा मिळत होती. डोळे दिपवून टाकणारा तो क्षण होता आणि असं वाटलं की, मी एका वेगळ्याच विश्वामध्ये आलो आहे आणि यंदादेखील मी तोच अनुभव घेतला.



## वाराणसीच्या भेटीमागील कारण

'हप्पू की उलटन पलटन' मालिकेचे उत्तरप्रदेशमध्ये खूप चाहते आहेत. त्यामुळे आम्ही वाराणसीला भेट देऊन येथील प्रेक्षकांसोबत संवाद साधण्याचं ठरवलं. वाराणसी हे भारतातील सर्वात जुन्या शहरांपैकी एक आहे. येथे जगप्रसिद्ध मंदिरे आहेत. ही मंदिरे लाखो भक्तांचं लक्ष वेधून घेतात. यावेळी आम्ही इथल्या प्रातीन मंदिरांचं दर्शन तर घेतलंच त्याचबरोबर या भेटीदरम्यान प्रेक्षकांसोबत संवाद साधत धमाल केली आणि देवदिवाळीचा आनंदही लुटला. प्रेक्षकांशी संवाद साधताना मजा आली. त्यांनी तोंडभरून मालिकेचं कौतुक केलं. त्यांच्याशी संवाद साधताना त्यांना ही मालिका का आवडते? तसंच अजून या मालिकेत काय ट्विस्ट आणता येतील? याचीही जाणीव आम्हाला झाली. त्यामुळे आगामी भागात प्रेक्षकांना अधिकाधिक विनोदी एपिसोड पाहायला मिळतील.

## भूमिकेबाबत

'हप्पू की उलटन पलटन' ही कौटुंबिक कॉमेडी मालिका आहे. ही मालिका हप्पू सिंग, त्याची 'दबंग पत्नी' राजेश, हट्टी आई 'कटोरी अम्मा' आणि त्यांच्या नऊ खोडकर मुलांच्या गमतीजमतीवर आधारित आहे. माझी भूमिका या मालिकेत एका भ्रष्ट पोलिस अधिका-याची आहे.

## माझा लूक

मालिकेमध्ये माझा लूक खूपच हटके आहे. कपाळावर तेलाने चपचपीत झालेले केस, तोंडामध्ये सतत चघळणारे पान, वैशिष्ट्यपूर्ण मिशी आणि ढेरपोट्या असा लूक मला दिला आहे. मालिकेत मी प्रेक्षकांना हसवून-हसवून लोटपोट करतो. माझी भूमिका प्रेक्षकांमध्ये खूपच लोकप्रिय आहे. मी जेथे जातो, तेथे लोक मला योगेश ऐवजी 'हप्पू सिंग' म्हणून हाक मारतात. त्यानंतर ते आवडीने माझे हावभाव व्यक्त करण्याचा आणि माझा लोकप्रिय संवाद 'अरे दादा!' म्हणण्याचा प्रयत्न देखील करतात. चाहत्यांचं प्रेम आणि आपुलकी पाहून मला आनंद वाटतो.







## माझी खवय्येगिरी

कुठल्याही नव्या शहराला भेट देताना मी तिथली खाद्यसंस्कृती जाणून घेण्यास अधिक उत्सुक असतो. वाराणसीमध्ये मी आल्यापासून तिथल्या स्थानिक पाककलांचा आस्वाद घेतला आहे. माझ्या तोंडावर त्या पाककलांची चव अजूनही रेंगाळत आहे. तिथल्या लज्जदार 'स्ट्रिट फूड'चा मी मनसोक्त आनंद घेतला. टॉमेटो चाट, लिट्टी चोखा, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अनेक प्रकारचे गोड पदार्थांवर मी इथे ताव मारला. इथली राजभोग, खीर कदम आणि जलेबी मी कधीच विसरू शकत नाही. मी याच राज्यामधला असल्यामुळे या गोड पदार्थांचा आस्वाद घेत मोठा झालो आहे आणि अनेक वेळा या शहराला भेट दिली आहे. पण प्रत्येकवेळी इथली खाद्यासंस्कृती जाणून घेताना मला वेगळाच आनंद मिळतो.

## काशी विश्वनाथबद्दल

जगात असं कोण आहे, जो काशीला येईल आणि विश्वनाथांचे दर्शन घेतल्याशिवाय जाईल? कामना, आमची टीम आणि मी आमच्या नियोजित ट्रिपमधून काल भैरव आणि काशी विश्वनाथचा आशीर्वाद घेण्यास उत्सुक होतो. मी वाराणसीला येतो तेव्हा काशी विश्वनाथ मंदिराचं नक्की दर्शन घेतो. यंदाही इथे आवर्जून गेलो. हे मंदिर भव्य आहे आणि यंदा देवदिवाळीच्या दरम्यान इथे गेल्यामुळे हे मंदिर फुलांसह अधिक आकर्षकरित्या सजवण्यात आलं होतं. यावेळचा अनुभव खूपच वेगळा होता.

## अविस्मरणीय आठवणी



या शहरामधील माझ्या खूप अविस्मरणीय आठवणी आहेत. माझे अनेक नातेवाईक याच शहरामध्ये राहतात आणि मी बालपणी सुट्टीदरम्यान माझ्या चुलत भावंडांना भेटण्यासाठी येथे वारंवार यायचो. इथे आल्यावर घाटवर बोट रायडिंग करणं, प्राचीन मंदिरांना भेटी देणं आणि आमच्या आवडत्या लज्जदार पदार्थांचा मनसोक्त आस्वाद घ्यायचो. मला आजही आठवते की, कमी पैशांमध्ये देखील माझा चुलत भाऊ, त्याचे मित्र आणि मी चित्रपट पाहायला जायचो आणि नदीकाळी तासनतास बसून राहायचो. या भेटीदरम्यान त्या सर्व आठवणी ताज्या झाल्या. यंदादेखील मी इथून खूप काही घेऊन जात आहे. काशीमधील लोकांचं प्रेम आणि आपुलकी, देवदिवाळीचं नयनरम्य दृश्यं आणि काही प्रसिद्ध मंदिरांना भेटींमुळे मिळालेला आनंद या संस्मरणीय आठवणी माझ्यासोबत घेऊन जात आहे. तसंच मी कृतज्ञ आहे की, मला 'हप्पू की उलटन पलटन' या मालिकेमुळे प्रेक्षकांना हसवण्याची आणि त्यांचं मनोरंजन करण्याची संधी दिली. या मालिकेमुळे मला प्रेक्षकांचं अपार प्रेम मिळालं.

# ॲक्शिन हिरो एकत्र



उ संजय दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॅकी श्रॉफ आणि सनी देओल यांच्या आगामी चित्रपटाची नुकतीच घोषणा करण्यात आली. या चित्रपटाच्या निमित्ताने ऐंशी-नव्वदच्या दशकातील ॲकक्शन हिरो एकत्र येणार आहेत. हा चित्रपट हॉलिवूडच्या 'द एक्सपेंडेबल्स' या चित्रपटाचा हिंदी रिमेक आहे अशी शक्यता वर्तवली जात आहे. या चित्रपटाद्वारे अभिनेता सनी देओल एका नव्या अवतारामध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये सनी देओलचा 'चूप : रिव्हेन्ज ऑफ द आर्टिस्ट' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटामध्ये त्याने एका पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. त्याच्या या भूमिकेचं खूप कौतुक झालं होतं. तो सध्यात्याच्या मुलासह 'अपने २' या चित्रपटाची तयारी करत आहेत. येत्या एक-दोन वर्षांमध्ये त्याचे 'सूर्या', 'अपने २'असे चित्रपट बॉक्स ऑफिसवर दाखल होणार आहेत. त्याचा 'गदर' सुपरहिट चित्रपटाचा रिमेक येणार आहे असंहीम्हटलं जात आहे.गेल्या काही वर्षांमध्ये सनी देओलचे चित्रपट फ्लॉप होत आहेत. एक काळ असा होता, जेव्हा त्याच्या नावावर चित्रपट चालायचे. आता त्याने या आगामी चित्रपटांच्या मदतीने बॉलिवूडमध्ये पुन्हा कमबॅक करण्याचा निर्धार केला आहे. एका मुलाखतीमध्ये सनी देओलने त्याच्या पुढील वाटचालीबद्दल माहिती दिली. एका मुलाखतीमध्ये तो म्हणाला, "मी सध्या माझ्या कारकीर्दीच्या सर्वात सुखकर टप्प्यावर आहे. ओटीटीसारख्या माध्यमांमुळे कलाकारांना कोणत्याही प्रकारच्या व्यक्तिरेखा साकारायची मुभा मिळत आहे. अभिनेत्यांना बॉक्स ऑफिस कलेक्शनचा ताण नसतो. त्यामुळे स्क्रीप्ट वाचून हा चित्रपट हिट होईल की नाही? हा विचार मनात न आणता त्याबाबत तुम्ही निर्णय घेऊ शकता." तो पुढे म्हणाला, "मला नेहमी टाइपकास्ट केलं गेलं. काही भूमिका माझ्यावर लादल्या गेल्या. 'ढाई किलो का हाथ' या संवादामुळे आणि तेव्हाच्या ॲक्शन हिरोच्या इमेजमुळे मला कधीही वेगळ्या भूमिकांसाठी विचारलं गेलं नाही. लोक माझ्याकडे एकाच साच्यातल्या व्यक्तिरेखा घेऊन यायचे. पण आता मी नवनवे प्रयोग करुन पाहणार आहे. एक अभिनेता म्हणून मी नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. कोणतीही इमेज जपण्याचा प्रयत्न करावा लागणार नसल्यामुळे मी खूप आनंदी आहे."

# मंजुळेने केलं 'गोदावरी'चं कौतुक






राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये आपलं स्थान मिळवणारा जितेंद्र जोशी निर्मित आणि अभिनीत 'गोदावरी' चित्रपटाचा प्रीमियर नुकताच पार पडला आहे. या प्रीमियरला अनेक मराठीतले कलाकार उपस्थित होते. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकरांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. यात आता प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांची भर पडली आहे. नागराज मंजुळे यांनी फेसबुकवर याबाबत पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिलं, "'गोदावरी' प्रदर्शित झाला. निखिल महाजनचा दिग्दर्शक म्हणून सर्वोत्तम चित्रपट. माझ्या मते जितेंद्र जोशीचं आजवरचं सर्वोत्कृष्ट काम ए व्ही प्रफुल्लचंद् यांचं संगीत आणि पार्श्वसंगीतही खूप अर्थवाही! 'गोदावरी'ची खळखळ वाहणारी अस्वस्थता आपल्यालाही ग्रासून घेते. हा सिनेमा आवर्जून बघा असं आवाहनही या पोस्टमध्ये नागराज मंजुळे यांनी प्रेक्षकांना केलं आहे.

# कीर्ती नागपुरेचं तांडव नृत्य

रा 'प्यार का पहला नाम राधा मोहन' या मालिकेत अनेक नाट्यमय प्रसंग पाहायला मिळतात. नुकतंच दामिनी ही गुनगुनच्या स्कूल बसमध्ये बॉम्ब ठेऊन राधा आणि गुनगुन यांना ठार मारण्याचा प्रयत्न करते. जखमी गुनगुन ही धोक्याच्या स्थितीतून बाहेर येईपर्यंत तांडव नृत्य करण्याचा निर्णय तुलसी घेते. या मालिकेत तुलसीची भूमिका कीर्ती नागपूरेने केली आहे. या आधी किर्तीने कधीच तांडव नृत्य केलेलं नव्हतं. त्यामुळे तिच्यासाठी तांडव नृत्य करणं आव्हानात्मक होतं. यानृत्याबाबत कीर्ती नागपुरे म्हणाली, "मी आयुष्यात प्रथमच तांडव नृत्य करणार होते. मला पहिल्यांदा जेव्हा या प्रसंगाची माहिती सांगण्यात आली, तेव्हा मी मनातून थोडी धास्तावले. कारण मला या नृत्याची फारशी काही माहिती नव्हती. तांडव हे सर्वात कठीण नृत्यांपैकी एक आहे आणि अनेक वर्षांच्या सरावानंतरच ते नृत्य योग्य प्रकारे साकारता येतं. पण हे नृत्य साकारण्यासाठी मला केवळ एक दिवसच मिळाला. तेव्हा मी त्यासाठी माझं सर्वस्व देण्याचा निर्धार केला. त्याबद्दल जितकं शिकता आलं, तितकं शिकून घेतलं. पण कसं कुणाला ठाऊक, मी केवळ एकाच टेकमध्ये या नृत्याचा प्रसंग चित्रीत केला. आणि मी प्रेक्षकांना सांगू इच्छिते की, नृत्य करण्यासाठी तुमच्या अंगात भरपूर शक्ती हवी, तोल सांभाळता यायला हवा आणि योग्य वेळी अचूक भावभावना दर्शवायला हव्यात. प्रेक्षकांना माझं हे नृत्य पसंत पडेल, अशी मी आशा करते."




**विंगेतून**

संजय डहाळे

# एकाकी महिलेची शोकांतिका!



**आवर्त (एकपात्री दीर्घांक)**

लेखन - सुचरिता
दिग्दर्शन - रमा नाडगौडा
संगीत - दादा परसनाईक
सूत्रधार - गोट्या सावंत
सादरकर्ता - भारत गणेशपुरे
निर्मिती - व्ही. आर. प्रोडक्शन्स

का एका विवाहित तरुणीची गोष्ट. जी शारीरिक - मानसिक दृष्ट्या तशी एकाकी जगतेय. लग्न झालेली पण नवऱ्यापासून शेकडो मैल दूरच. तिची सर्वार्थाने कोंडी झालीय. तिच्या वेदना या जाणून घेण्यासाठी कुणी नाही. सारी दारं बंद झालीत. जन्मापासून ते अगदी लग्नापर्यंतच्या आठवणीभोवती फिरतेय. एकेक करून त्या तिला भोवऱ्यात फिरवताहेत. आणि 'अपत्यहिन पत्नी' म्हणून वांझपणा तिला हैराण करतोय. जगायचं कसं? कुणासाठी आणि का? हा प्रश्न तिच्याभोवती आहे. त्याचं उत्तर ती शोधण्याचा प्रयत्न करतेय पण तिची या कोंडीतून सुटका होणार का? समाज त्याला मान्यता देणार काय? पती-पत्नीचं नातं संपणार का? असे प्रश्न उभे आहेत

-अभिनेत्री रमा नाडगौडा यांनी सुचरिता या टोपणनावाने 'आवर्त' या एका दीर्घांकाचं लेखन केलंय. त्यांनीच याचं दिग्दर्शन, नेपथ्य, वेशभूषा आणि निर्मितीची जबाबदारी सांभाळलीय. सरी नावाची एक मध्यमवर्गीय गृहीणी शब्दातून आणि सादरीकरणातून त्यांनी समर्थपणे उभी केलीय. एकपात्री नाट्य असूनही ते वैशिष्ट्यपूर्ण आणि पकड घेणारं होतय. बऱ्याच दिवसानंतर एक 'हटके' अनुभव यातून प्रकाशात येतोय आणि जो विचार करायला भाग पाडतो.

अभिनेत्री रमा नाडगौडा यांनी आपल्या चंदेरी - रुपेरी दुनियेतील अनुभवांच्या जोरावर हे नाट्य पडद्यामागेही आकर्षित ठेवण्याचा प्रयत्न केलाय तो नोंद घेण्याजोगाच. शिवकांता सुतार हिने मध्यवर्ती भूमिका केलीय. एका विवाहित एकाकी महिलेचा कोंडमारा तिने तपशिलांस सादर केलाय. देहबोली शोभून दिसते. सलग दीडएक तास संवाद असूनही ते कुठेही अडथळ्यांची वाट बनत नाहीत. संवादातील काव्यात्मकता तसेच प्रसंग हे एका उंचीवर नाट्याला घेऊन जातात. एक समर्थ अभिनेत्रीचे दर्शन शिवकांता सुतार हिच्यातून होतेय. वांझ ठरल्यानंतर संवाद तसेच शेवटचा निर्णय यातून 'सरी' नजरेत भरते. मनातील वादळे ही हेलावून सोडतात.







काही सत्यघटनांचा आधार हा नाट्याला घेण्यात आलाय. हे पुरेपूर पटते. कारण बदलत्या काळात अशा घटना मोठ्या प्रमाणात दिसू लागल्या आहेत. अपत्यहिन पत्नीचा विषय यापूर्वीही अनेकदा नाटकातून रंगभूमीवर आलाय. पण इथे एकपात्रीतून रसिकांशी थेट संवादातून नाट्य उलगडत जाते. संगीताचे काही तुकडे हे नाट्य अधिक रंगतदार होण्यास मदत करते. दादा परसनाईक यांनी संगीताची जबाबदारी पार पाडली आहे, तर अभिनेते भारत गणेशपुरे यांनी नाटकाचे निवेदन व सादरीकरण केलय. अनिल नगरकर यांनी पडद्यामागून पतीचे संवाद दिलेत. जे काही प्रसंगात पकड घेतात. प्रकाशयोजना तसेच नेपथ्यही नाट्याला पूरक आहे. मध्यमवर्गीय दांपत्याचं घर तपशिलांसह उभ केलय. तांत्रिकबाजूंमध्ये नेमकेपणा दिसतोय.



मध्यमवर्गीय बायका या एका चौकटीत आजही जगत आहेत. त्या चौकटीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न जरी करीत असल्या तरीही समाज त्याला कितपत मान्यता देईल, हे साशंकच. बुरसटलेल्या कालबाह्य विचारांनी बायकांचा आजच्या संगणक युगातही कोंडमारा केलाय. यातून सुटका करण्याचा प्रयत्न ही काळाची गरज आहे. 'आवर्त' हे नाट्य खूपकाही सांगू इच्छिते. एक बिंब - प्रतिबिंब एका विवाहित महिलेचं यातून नजरेत भरतं. बालपणी आई - वडीलांच्या धाकात, तारुण्यात नजरा चुकवत पळ काढण्याच्या तयारीत, लग्नानंतर नवरोजीच्या धाकात त्याच्या नियंत्रणात - असा हा प्रवास. एका महिलेचं हे तसे आत्मचिंतन. इटालियन दिग्दर्शक फेडरिको फेलिनी यांनी एके ठिकाणी म्हटलं होतं, 'असत्य हे फार मनोरंजक असतं. कारण खोटं बोलणाऱ्याबद्दल अनेकदा ते खरीखुरी माहिती देते!' यातलं असत्यही त्याच वाटेवरलं. जे असत्य अनेक महिलांची खरीखुरी माहिती देते. विचार करण्यास प्रवृत्त करते. लेखिका, दिग्दर्शिका, अभिनेत्री रमा नाडगौडा आणि रंगभूमीवर प्रतिनिधित्व करणाऱ्या शिवकांता सुतार यांचे या निर्मितीबद्दल कौतुक. अभिनंदन करावे तेवढे कमीच ठरतील. प्रायोगिक नाटकांचा वसा चढविणारी अशी नाटके एक दिशा देणारी ठरतात.

प्रायोगिक शैलीतलं असं एकपात्री नाट्य सादर करणं तसं आव्हानात्मक असलं, तरी हे आव्हान या टिमने पेललं आहे. नेहमीचे स्त्रीयांचे प्रश्न किंवा बायकांचं रडगाणं - अशा नजरेतून न बघता 'प्रसंगी निर्णय घेण्याची क्षमता असलेली कणखर स्त्री' या दृष्टीने बघणं जरुरीचे आहे. काळ बदलला एकत्र कुटुंबपद्धती संपली. रक्ताची नातीही एक उपचार म्हणून शिल्लक उरलीय. या आजच्या परिस्थितीत एकाकी महिलेची शोकांतिका म्हणून 'आवर्त' लक्षवेधी नाट्य झालय. या वेगळ्या वाटेवरल्या सत्यघटनांवरल्या नाट्याकडेही रसिकांनी वळावे, ही अपेक्षा!

sanjaydahale33@gmail.com

# जगातील अर्धी संपत्ती चीन, अमेरिकेकडे

## भारत सातव्या क्रमांकावर

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** जगभरातील देशाची वाढ आणि समृद्धी बहुतेक वेळा सकल देशांतर्गत उत्पादन किंवा जीडीपीशी जोडलेली असते. एकूण संपत्ती आणि अर्थव्यवस्थेचा आकार समजून घेण्यासाठी जीडीपीसारखे उपाय सामान्यतः वापरले जातात. तथापि, एखाद्या देशातील लोकांच्या संपत्तीचा अंदाज घेण्यासाठी जीडीपीपेक्षा त्याच्या घरगुती संपत्तीचे आकडे गोळा करणे महत्त्वाचे आहे. घरगुती संपत्तीची आकडेवारीतूनच कळते की कोणत्या देशाचे नागरिक जगात सर्वाधिक संपत्ती कमावतात. क्रेडिट सुईसच्या वार्षिक ग्लोबल वेल्थ रिपोर्टमध्ये जगातील निम्म्या घरगुती संपत्तीचे मालक म्हणून दोन देशांना स्थान देण्यात आले आहे. ग्लोबल वेल्थ रिपोर्टनुसार जगातील निम्मी घरगुती संपत्ती अमेरिका आणि चीन खात्यात आहे. एकूण घरगुती संपत्तीपैकी 31.5 टक्के एकट्या अमेरिकेकडे आणि 18.4 टक्के चीनकडे आहे. यानंतर 5 टक्के देशांतर्गत मालमत्ता जपानकडे आणि सुमारे 4 टक्के जर्मनीकडे आहे.

### भारताकडे १४.२ ट्रिलियन डॉलर्सची संपत्ती

या अहवालात, भारत 14.2 ट्रिलियन डॉलर्सच्या घरगुती संपत्तीसह सातव्या क्रमांकावर आहे, जे जगातील एकूण घरगुती संपत्तीच्या तीन टक्के आहे. जगातील एकूण घरगुती संपत्ती 463 ट्रिलियन एवढी आहे. तसेच बहुतांश संपत्ती चीन आणि अमेरिकेसह सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये केंद्रित आहे. 10 देशांकडे एकूण घरगुती संपत्तीपैकी 75% आहे.

### चीनची वाढ धक्कादायक



अलिकडच्या वर्षांत सर्वात मोठा बदल म्हणजे चीनमधील संपत्तीची वाढ. एका दशकापूर्वी, चिनी नागरिकांकडे जगातील केवळ 9% संपत्ती असल्याचा अंदाज होता. हा आकडा आता दुप्पट झाला आहे, तर देशातील सरासरी संपत्ती 2000 ते 2021 दरम्यान 3,111 वरून 26,752 डॉलरपर्यंत वाढली आहे.

# ५५,५७५ कोटींची जीएसटी चोरी



**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** गेल्या दोन वर्षात तब्बल 55 हजार 575 कोटी रुपायांची जीएसटी चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. जीएसटी अधिकाऱ्यांनी गेल्या दोन वर्षांत 55,575 कोटी रुपयांची जीएसटी फसवणूक शोधून काढली आहे आणि सरकारी तिजोरीचे नुकसान केल्याबद्दल 700 हून अधिक लोकांना अटक केली आहे. यामध्ये 22 हजार 300 हून अधिक बनावट जीएसटी ओळख क्रमांक जीएसटी महासंचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी शोधून काढली आहे. सरकारने 9 नोव्हेंबर 2020 रोजी बनावट/बोगस इनव्हॉइस जारी करून फसवणूक करून इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवणे आणि पास करणे यासाठी अनैतिक संस्थांविरुद्ध देशव्यापी विशेष मोहीम सुरू केली, ज्यामुळे वस्तू आणि सेवा कर चुकला होता आणि सरकारचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. या विशेष मोहिमेच्या दोन वर्षांत 55,575 कोटी रुपयांची जीएसटी/आयटीसी फसवणूक आढळून आली आहे आणि 719 लोकांना अटक करण्यात आली आहे, ज्यात 20 सीए/सीएस व्यावसायिकांचा समावेश आहे अशी माहिती एका अधिकाऱ्याने पीटीआय या वृत्तसंस्थेला दिली आहे. या कालावधीत 3,050 कोटी रुपयांच्या वस्तू आणि सेवा कराच्या ऐच्छिक ठेवी करण्यात आल्या आहेत. अधिकाऱ्याने या प्रकरणांमध्ये वसुलीची रक्कम उघड केली नाही.

## # QUICK NEWS

### ९ वर्षानंतर रुपयाला 'अच्छे दिन'

**दिल्ली.** आठवड्याच्या शेवटच्या दिवशी रुपया 80.6888 वर उघडला, तर मागील सत्रात तो 81.8112 अंकांवर बंद झाला होता. आज डॉलरच्या तुलनेत रुपया 10 पैशांच्या तेजीसह उघडला. भारतीय रुपयाने आज मोठी झेप घेतली आहे. अमेरिकेत अपेक्षेपेक्षा कमी महागाईच्या आकडेवारीमुळे डॉलर घसरला आहे आणि त्यामुळे रुपया मजबूत झाला आहे. शुक्रवारी सकाळच्या सत्रात भारतीय रुपया 80.75 रुपये प्रति डॉलरवर व्यवहार करत होता. आठवड्यातील शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी रुपया 80.6888 च्या पातळीवर उघडला, तर मागील सत्रात तो 81.8112 अंकांवर बंद झाला होता. आज डॉलरच्या तुलनेत रुपया 10 पैशांच्या मजबूतीसह उघडला. रुपयात गेल्या नऊ वर्षांतील ही सर्वात मोठी ओपनिंग आहे. सप्टेंबर 2013 पासून रुपया शुक्रवारी (11 नोव्हेंबर) सर्वात मोठ्या वाढीसह उघडला आहे आणि सात आठवड्यांच्या उच्चांकावर व्यवहार करत होता. सुरुवातीच्या सत्रात रुपयाने 80.6788 ते 80.7525 रुपयांपर्यंत व्यापार केला आणि तो सातत्याने 81 रुपये प्रति डॉलरच्या खाली राहिला. बाजारातील जाणकारांच्या मते, अमेरिकन डॉलरने 81.91 पर्यंत वाढल्यानंतर रुपया वधारण्याचा मार्ग मोकळा केला आहे. अमेरिकेत ऑक्टोबर महिन्यातील चलनवाढीचे आकडे बाजाराच्या अंदाजापेक्षा कमी आहेत, त्यामुळे जागतिक शेअर बाजारात चांगला प्रतिसाद दिसून येत आहे.

# बँका करणार ई-लिलाव

## स्वस्तात प्रॉपर्टी खरेदी करण्याची सुवर्णसंधी

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** जर तुम्ही स्वस्त घर किंवा कोणत्याही प्रकारची प्रॉपर्टी खरेदी करण्याचा विचार करत असाल तर देशातील सरकारी बँका तुम्हाला ही खास संधी देत आहेत. बँक ऑफ बडोदा आणि इंडियन बँककडून तुम्हाला स्वस्तात प्रॉपर्टी खरेदी करण्याची संधी दिली जात आहे. यामध्ये रेसिडेंशिअल, कमर्शिअल आणि इंडस्ट्रिअल सर्व प्रकारच्या प्रॉपर्टीचा समावेश आहे. याबाबतची माहिती आयबीएपीएलद्वारे देण्यात आली आहे. इंडियन बँकेनेही ट्विट करून याबाबत माहिती दिली आहे. इंडियन बँकेने आपल्या अधिकृत ट्विटमध्ये लिहिले आहे की, तुमच्या स्वप्नातील प्रॉपर्टी थोड्याच अंतरावर आहे. तुम्ही इंडियन बँकेच्या मेगा लिलावात सहभागी होऊ शकता. हा ई-लिलाव 15 आणि 16 नोव्हेंबर 2022 रोजी केला जाईल. पॉपर्टीच्या लिलावाबद्दल अधिक माहितीसाठी तुम्ही https://ibapi.in/Sale_Info_Home_ib.aspx या लिंकला भेट देऊ शकता. याशिवाय 30 नोव्हेंबर रोजी बँक ऑफ बडोदाद्वारे मेगा ई-लिलाव आयोजित करण्यात येणार आहे.

### कोणत्या प्रॉपर्टीचा होणार लिलाव?

देशातील सर्व बँका वेळोवेळी प्रॉपर्टीचा लिलाव करीत असतात. बँकेच्या वतीने ई-लिलावात एनपीएच्या यादीत आलेल्या प्रॉपर्टीची विक्री केली जाते. म्हणजेच ज्या प्रॉपर्टीवर त्यांच्या मालकांनी कर्ज घेतल्यानंतर बँकेची थकबाकी भरली नाही. बँक अशा लोकांच्या प्रॉपर्टी आपल्या ताब्यात घेऊन तिचा लिलाव करते.



### ई-लिलावात प्रॉपर्टी खरेदीचे फायदे


- याद्वारे तुम्हाला क्लिअर टायटलची सुविधा मिळेल.
- खरेदीदाराला प्रॉपर्टीचा तात्काळ ताबा दिला जाईल.
- बँक खरेदीदाराला कर्जाची सुविधा देखील सहज देऊ शकते.

## 'केफिन टेक्नॉलॉजी' येणार आयपीओ

**मुंबई.** वित्तीय सेवा प्लॅटफॉर्म केफिन टेक्नॉलॉजी आयपीओ बाजारात आणणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. या कंपनीच्या आयपीओला बाजार नियामक सेबीची मंजुरी मिळाली आहे. कंपनीला या आयपीओच्या माध्यमातून 2400 कोटी रुपये उभे करायचे आहेत. कंपनीने या वर्षी 31 मार्च रोजी सेबीकडे आयपीओ कागदपत्रे दाखल केली होती. ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसनुसार, हा आयपीओ पूर्णपणे ऑफर फॉर सेलवर आधारित आहे. ऑपर फॉर सेलचा भाग म्हणून प्रवर्तक जनरल अटलांटिक सिंगापूर फंडचे शेअर्स विकतील. या आयपीओमधून कंपनीला कोणतेही उत्पन्न मिळणार नाही कारण ते सर्व प्रवर्तकाला विकणाऱ्या भागधारकाकडे जाईल. सेबीने केफिन टेक्नॉलॉजीजच्या प्रारंभिक शेअर विक्रीला मान्यता दिली आहे .

# ट्विटरकडून भारतात ब्ल्यू सबस्क्रिप्शन सुरू

## अमेरिकेपेक्षा जास्त शुल्क आकारले



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्विटरने भारतात पैशासाठी ब्लू टिक ॲक्सेस देणे सुरू केले आहे. कंपनी अमेरिकेत यासाठी महिन्याला आठ डॉलर्स आकारत आहे. मात्र भारतात यासाठी युजर्सकडून जास्त शुल्क आकारले जात आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, भारतातील काही लोकांना ब्लू टिक ॲक्सेस मिळू लागला आहे. यासाठी युजर्सकडून अमेरिकेच्या तुलनेत अधिक पैसे आकारले जात आहेत.

ट्विटर ब्लू सदस्यांना रिप्लाय, मेन्शन आणि सर्चमध्ये प्राधान्य मिळेल आणि ते मोठे व्हीडिओ पोस्ट करू शकतात. याव्यतिरिक्त, त्यांना फक्त अर्ध्या जाहिराती दिसतील आणि काही निवडक लेखांवर पेवॉल बायपास करण्याचा पर्याय देखील असेल. यूएस, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युके मधील ॲपल वापरकर्त्यांसाठी आठ डॉलर सबस्क्रिप्शनसह ट्विटर ब्लू आधीच आणले गेले आहे. याआधी मस्क यांनी सांगितले होते की, ही सेवा भारतात महिनाभरात सुरू होईल.

# ॲमेझॉनला एक ट्रिलियन डॉलरचा झाला तोटा



**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** ॲमेझॉन ही जगातील सर्वात मोठी कंपनी आहे. कंपनीने 1 ट्रिलियन डॉलर गमावले आहेत. सप्टेंबर 2022 च्या अखेरीस फ्लिपकार्टला 3.7 बिलियन डॉलर म्हणजेच 30,000 कोटी रुपयांचा तोटा झाला होता. एवढा मोठा तोटा होण्याचे कारण म्हणजे शेअर बाजारातील बदललेली परिस्थिती. ॲमेझॉन ई-कॉमर्स कंपनीचे शेअर्स 4.3 टक्क्यांनी घसरले, त्यानंतर कंपनीचे बाजार मूल्य 879 अब्ज डॉलर झाले. जे जुलै 2021 पर्यंत 1.88 ट्रिलियन डॉलरच्या जवळ होते. याचा अर्थ वर्षभरात कंपनीचे बाजार मूल्य 1 ट्रिलियन डॉलरपेक्षा कमी झाले आहे. जगातील सर्वात मोठ्या ऑनलाईन कंपन्यांच्या वाढीमध्ये तीव्र मंदी दिसत आहे. कमी विक्री, वाढता खर्च आणि व्याजदरात झालेली वाढ यामुळे कंपन्यांचे शेअर्स जवळपास 50 टक्क्यांनी घसरले आहेत. ब्लूमबर्गच्या आकडेवारीनुसार, वर्षाच्या सुरुवातीपासून सह-संस्थापक जेफ बेझोस यांची संपत्ती सुमारे 109 अब्ज डॉलर इतकी कमी झाली आहे. ॲमेझॉन कंपनीची बाजारातील किंमत 1 ट्रिलियन डॉलरच्या खाली घसरण्याची ही पहिलीच वेळ आहे. जुलै 2021 मध्ये, फ्लिपकार्टकडे 1 अब्ज डॉलर रोख होती, जी सप्टेंबर 2022 पर्यंत घसरून 887 दशलक्ष डॉलर झाली. फ्लिपकार्ट आणि वॉलमार्टच्या नियामक फाइलिंगनुसार, कंपनीने जुलै 2021 मध्ये 3.6 अब्ज डॉलर म्हणजेच सुमारे 29,000 कोटी रुपये उभारले होते. जे नंतर तोट्यात गेले.

## फ्युचर रिटेल खरेदीच्या शर्यतीत अदानी-अंबानी

**मुंबई.** आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती गौतम अदानी आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे मालक मुकेश अंबानी कर्जबाजारी फ्यूचर रिटेल लि.चे अधिग्रहण करण्याच्या शर्यतीत आहेत. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज आणि फ्लेमिंगो ग्रुप यांच्यातील संयुक्त उपक्रम मून रिटेल प्रायव्हेट लिमिटेड, रिलायन्स रिटेल व्हेंचर्स आणि अन्य 13 कंपन्यांनी फ्यूचर रिटेलसाठी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट सबमिट केले आहेत. ईओआय सादर करणाऱ्या इतर कंपन्यांमध्ये शालिमार कॉर्पोरेशन लिमिटेड, नलवा स्टील अँड पॉवर, युनायटेड बायोटेक, डब्ल्यूएचस्मिथ ट्रॅव्हल, कॅप्री ग्लोबल होल्डिंग्स यांचा समावेश आहे.

# राज्यात रेल्वे बोगीचा मेगा प्रोजेक्ट

## सीमेन्स पूर्ण केली तयारी

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यातून मोठे उद्योग गुजरातला पळविण्यात येत असल्याचा मुद्दा विरोधकांनी उचलून धरला आहे. राज्यात त्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांत घमासान सुरू असतानाच मराठवाड्यासाठी आणखी एक चांगली बातमी येऊन धडकली आहे. लातूरमध्ये रेल्वे कोच तयार करण्याचा कारखाना उभारण्यात आला असतानाच आता औरंगाबाद ही रेल्वेच्या नकाशावर आले आहे. या घडामोडीदरम्यान सीमेन्स या आघाडीच्या कंपनीने दिलासादायक बातमी दिली आहे. आशिया खंडातील मोठी औद्योगिक नगरी औरंगाबाद येथे रेल्वे बोगीचा मोठा प्रकल्प सुरू करण्याची घोषणा कंपनीने गेली आहे.




या रेल्वे बोगी प्रकल्पाचा उद्देश आणि हा प्रकल्प औरंगाबादलाच का सुरु करण्यात येत आहे, याचा खुलासाही कंपनीने केला आहे. जागतिक आणि देशातील मागणी पूर्ण करण्यासाठी हा प्रकल्प कंपनीने हाती घेतल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. सीमेन्स लिमिटेडने औरंगाबादेत रेल्वे बोगीचा कारखाना सुरू करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. लवकरच हा कारखाना सुरू करण्यात येईल. देशातील आणि जागतिक मागणी पूर्ण करण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

औरंगाबादचे भौगोलिक स्थान लक्षात घेता, रेल्वे बोगाचा कारखाना उभारण्यात येत आहे. या कारखान्यातून परदेशात 200 रेल्वे बोगी निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कंपनीने याविषयीची घोषणा केली आहे. या प्रकल्पातून तयार होणाऱ्या रेल्वे बोगीचे खास डिझाईन असेल. या बोगी रेल्वे प्रवास आरामदायी करण्याचा अनुभव देतील.

## विराट, रोहितवर साधला निशाणा

# अखेर गंभीरने केली धोनीची स्तुती



**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** इंग्लंडने सेमीफायनलमध्ये भारताचा 10 विकेट्सनी पराभव करीत टी 20 वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात आणले. त्यानंतर भारतीय संघ 2013 पासून एकही आयसीसी स्पर्धा जिंकू शकला नसल्याबद्दल संघावर टीका होत आहे. दरम्यान, भारताचा माजी सलामीवीर गौतम गंभीरने कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीवर टीका करताना चक्क महेंद्रसिंह धोनीचे कौतुक केले. सहसा गौतम गंभीर हा धोनीला सर्व श्रेय देण्यावरून टीका करीत असतो. मात्र आता त्याने कॅप्टन म्हणून धोनीचे कौतुक केल्याने सर्वांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे.

गौतम गंभीरने स्टार स्पोर्ट्सशी बोलताना कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीवर निशाना साधताना धोनीचा स्तुती केली. गौतम गंभीर म्हणाला की, 'एखादा खेळाडू येईल आणि रोहित शर्मापेक्षा जास्त द्विशतके आणि विराटपेक्षा जास्त शतके ठोकेल. मात्र मला नाही वाटत की कोणताही भारतीय कर्णधार तीन आयसीसी ट्रॉफी जिंकण्याची करामत करू शकेल. गौतम गंभीरच्या वक्तव्याचा रोख धोनीकडे होता. धोनीच्या नेतृत्वात भारतीय संघाने 2007 चा टी 20 वर्ल्डकप, 2011 चा वनडे वर्ल्डकप आणि 2013 ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. महेंद्रसिंह धोनी हा आयसीसीच्या तीनही ट्रॉफी जिंकणारा भारताचा पहिला कर्णधार आहे. याचबरोबर त्याने 2010, 2011, 2018 आणि 2021 अशी चार आयपीएल टायटल देखील पटकावली आहेत.

# ...तर पाक होणार मालामाल!

## विश्वचषक जिंकल्यास मिळणार १३.४ कोटी

**मेलबर्न, वृत्तसंस्था.** टी 20 विश्वचषकाचा महाअंतिम सामना हा 13 नोव्हेंबरला मेलबर्न क्रिकेट मैदानात रंगणार आहे. अनेक आश्चर्यकारक ट्विस्टने रंगलेला यंदाचा विश्वचषक हा क्रिकेटप्रेमींमध्ये हिट ठरला. प्रत्येक सामन्यात उत्साह वाढवणारा हाय व्होल्टेज ड्रामासहित पाहायला मिळाला. सुपर 12 च्या गटातून, सेमीफायनलचा टप्पा पार करून पाकिस्तान व इंग्लंड हे दोन संघ अंतिम सामन्यात आमनेसामने येणार आहेत. टी 20 विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पाकिस्तानने न्यूझीलंडला तर इंग्लंडने भारताला पराभूत करून आपले अंतिम फेरीतील स्थान निश्चित केले होते. अंतिम सामन्यात इंग्लंडला धूळ चारल्यास पाकिस्तानी क्रिकेट संघाला मालामाल होण्याची संधी आहे.

टी 20 विश्वचषक सुरू होण्यापूर्वीच आयसीसीने यंदाच्या बक्षिसाची रक्कम जाहीर केली होती. यंदा टी 20 विश्वचषकाचे विजेतेपद पटकावणाऱ्या संघाला 1.6 मिलियन यूएस डॉलर म्हणजेच जवळपास 13 कोटी 4 लाख रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत. तर अंतिम फेरीमध्ये हरणाऱ्या संघाला 8 लाख डॉलर्स म्हणजेच जवळपास 6 कोटी रुपये बक्षीस मिळणार आहे.

आयसीसीच्या घोषणेनुसार, टी 20 विश्वचषकाच्या उपांत्य फेरीतील चारही संघांना 4 लाख डॉलर म्हणजेच जवळपास 3 कोटी 25 लाख रुपये मिळणार आहे. यानुसार आता भारत व न्यूझीलंडला 3 कोटीच्या बक्षिसावर समाधान मानावे लागणार आहे.

### अंतिम सामन्यावर पावसाचे सावट



टी20 विश्वचषकाचा अंतिम सामना हा मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात खेळला जाणार आहे. पाकिस्तानने उपांत्य फेरीतील सामन्यात न्यूझीलंडला हरवत तर इंग्लंडने भारताला पराभूत करत अंतिम सामन्यात प्रवेश केला. पण या दोन्ही संघानाही पावसाची धास्ती वाटत आहे. कारण पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यातील आयसीसी टी20 विश्वचषक अंतिम सामन्यात पावसाचा धोका असून ऑस्ट्रेलियाच्या हवामानशास्त्र विभागाने शुक्रवारी 13 नोव्हेंबर रोजी मेलबर्नमध्ये 95 टक्के पावसाची शक्यता वर्तवली आहे. जगभरातील क्रिकेट चाहत्यांचा उत्साह हा आता शिगेला पोहचला असून टी20 विश्वचषक अंतिम टप्प्यात आहे. जर पावसामुळे सामना 13 तारखेला झाला नाही तर त्यासाठी आयसीसीने राखीव दिवस ठेवला आहे. त्यामुळे चाहत्यांना अजून एक दिवस वाट पाहावी लागणार आहे. चाहत्यांचा हिरमोड होऊ नये म्हणून आयसीसी देखील याची खबरदारी घेणार आहे. रविवारी 8 ते 20 मिमी दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता 95 टक्के आहे

# सट्टेबाजांचा ५०० कोटींचा चुराडा

## भारताच्या पराभवामुळे बिघडले गणित



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी 20 वर्ल्डकपमध्ये भारताने सेमी फायनलमध्ये धडक मारल्यानंतर आता वर्ल्डकप दूर नाही अशीच सर्व क्रिकेटप्रेमींची भावना होती. मात्र सेमी फायनलमध्ये इंग्लंडने भारताचा तब्बल 10 विकेट्सनी पराभव करीत सर्व भारतीय क्रिकेट चाहत्यांचे हिरमोड केला. मात्र या इंग्लंडने फक्त भारतीय क्रिकेट चाहत्यांचेच हृदय तोडले नाही तर सट्टेबाजांच्याही पैशाचा चुराडा करून टाकला. रोहितच्या विश्वासावर टीम इंडियावर पैसे लावणाऱ्या सट्टेबाजांना तब्बल 500 कोटी रुपयांचा फटका बसला आहे.

अहमदाबाद मिररच्या एका वृत्तानुसार सट्टेबाजांनी भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामन्यात 13 व्या षटकापासून सट्टा लावणे बंद केले होते. यावेळी इंग्लंडने बिनबाद 140 धावा ठोकल्या होत्या. ज्यावेळी सामना सुरू झाला त्यावेळी इंग्लंड हा सामना जिंकण्याची प्रबळ दावेदार नव्हती. सामन्यापूर्वी भारतावर 82 पैसे तर इंग्लंडवर 1.10 रुपये सट्टा लागला होता. मात्र 13 व्या षटकात सट्टेबाजीच्या बाजारात भारत 15 रूपये तर इंग्लंड 1 पैशावर होती. याबाबत बोलताना एका सट्टेबाजाने सांगितले की, इंग्लंड सुरुवातीपासून चांगली खेळत असून देखील सर्वांनीच 11 व्या षटकापर्यंत भारत पुनरागमन करेल या आशेवर भारतावर पैसे लावले. दरम्यान, 5 लाख रुपये गमावणाऱ्या एका सट्टेबाजाने सांगितले की, आम्ही सर्व काही गमवून बसलो.

## लक्ष्मण घेणार टीम इंडियाची सूत्रे

**मुंबई.** भारताचे वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात आल्यानंतर आता बीसीसीआयला आता न्यूझीलंडमध्ये होणाऱ्या वनडे आणि टी 20 सामन्यांच्या मालिकेचे वेध लागले आहेत. या दौऱ्यावर भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. वनडे संघाचे कर्णधारपद शिखर धवन तर टी 20 संघाचे नेतृत्व हार्दिक पांड्या करणार आहे. याचबरोबर या दौऱ्यासाठी प्रशिक्षकांची टीम देखील दुसरी असणार आहे. मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्यासह संपूर्ण प्रशिक्षक टीमला विश्रांती देण्यात आली असून द्रविडऐवजी एनसीएचा प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण न्यूझीलंड दौऱ्यावर प्रभारी मुख्य प्रशिक्षक म्हणून जाणार आहे.

भारतीय संघ 18 नोव्हेंबरपासून न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यावर भारतीय संघ 3 वनडे आणि 3 टी 20 सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, के.एल. राहुल आणि रविचंद्रन अश्विन यांना विश्रांती देण्यात आली आहे.

**रणनीती** • २५ एकदिवसीय सामने खेळणार, संघात होणार मोठे बदल

# टीम इंडियाचे आता मिशन वनडे वर्ल्डकप

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भारताचे टी-20 विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भंगले. आता भारतीय संघ पुढील वर्षी भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या रणनीतीवर काम करेल. वनडे विश्वचषक भारतातच होणार आहेत. त्यामुळे टीम इंडिया टी-20 विश्वचषकाच्या सेमीफायनलमधील पराभवाच्या कटू आठवणी बाजूला ठेवून नव्या जोमाने मैदानात उतरण्यास प्राधान्य देईल. विश्वचषक पुढील वर्षी ऑक्टोबर ते नोव्हेंबरदरम्यान होईल. तत्पूर्वी भारतीय संघ जवळपास 25 एकदिवसीय सामने खेळेल.

### जगज्जेता बनण्याचा प्रयत्न

भारतीय संघाने 1983 साली पहिल्यांदा इंग्लंडमध्ये जाऊन विश्वचषक जिंकला होता. कपिल देवच्या नेतृत्वात भारतीय संघाने इतिहास रचला होता. 1983 च्या वर्ल्डकपमध्ये टीम इंडियाने बलाढ्य वेस्ट इंडिजला अस्मान दाखवून अवघ्या जगाला आश्चर्याचा धक्का दिला होता. त्यानंतर तब्बल 28 वर्षांनी 2011 मध्ये भारताने महेंद्र सिंह धोनीच्या नेतृत्वात विश्वचषकावर आपले नाव कोरले होते. मुंबईत खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेला पराभूत करून विश्वचषक जिंकला. त्यानंतर 2019 च्या विश्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये भारताला न्यूझीलंडने पराभूत केले. आता 2023 च्या विश्वचषकात भारतीय संघ पुन्हा एकदा विश्वषचक जिंकण्याचा प्रयत्न करेल. भारताकडे श्रेयस अय्यर व संजू सॅमसन सारखे उत्कृष्ट फलंदाज आहेत.

### कर्णधार बदलणार?


टी-20 विश्वचषकातील मानहाणीकारक पराभवानंतर टीम इंडियात मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार रोहित शर्माच्या कर्णधारपदावरही गडांतर येण्याची चर्चा आहे. वनडेमध्ये भारताकडे शिखर धवनसारखा मजबूत पर्याय उपलब्ध आहे. त्यातच सुनील गावस्कर यांनी हार्दिक पंड्याला टी-20चे कर्णधारपद सोपवण्याची मागणी केली आहे. याचा अर्थ आगामी विश्वचषकापूर्वी टीम इंडियात मोठे फेरबदल दिसून येतील.



### के.एल. राहुलच्या डोक्यावर टांगती तलवार

एकदिवसीय सामन्यात शिखर धवन कर्णधार रोहित शर्मासोबत सलामीला येऊ शकतो. दुसरीकडे, टी-20 विश्वचषकात केएल राहुलची कामगिरी अत्यंत सुमार झाली. त्यामुळे टीम मॅनेजमेंट विश्वचषकाचे आव्हान लक्षात घेऊन नव्याने रणनीती तयार करू शकते. त्यात ओपनिंग स्लॉटमध्ये राहुलला संधी मिळेल किंवा नाही हे सांगता येत नाही. या प्रश्नाचे उत्तर येत्या काही दिवसांत मिळण्याची शक्यता आहे.

### प्रशिक्षकपदाच्या शर्यतीत नेहरा



भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंगने थेट संघाच्या प्रशिक्षक टीममध्येच मोठे बदल करण्याची मागणी केली आहे. त्याने राहुल द्रविड ऐवजी एखादा तुलनेने तरुण आणि नुकताच टी 20 मधून निवृत्त झालेला प्रशिक्षक हवा असे मत नोंदवले. टी 20 क्रिकेटमध्ये तुम्ही नुकताच निवृत्त झालेला प्रशिक्षक घेतला पाहिजे. यासाठी आशिष नेहराचा पर्याय देखील चांगला आहे. तर कर्णधार म्हणून हार्दिक पांड्या ही माझी पसंती असेल. गेल्या आयपीएल हंगामात हार्दिक पांड्या आणि आशिष नेहरा या जोडीने गुजरात टायटन्सला पदार्पणाच्याच हंगामात विजेतेपद मिळवून दिले होते. आशिष नेहरा हा आयपीएल विजेतेपद मिळवून देणारा पहिला भारतीय प्रशिक्षक ठरला होता.

## प्लेयर ऑफ द टूर्नामेंटसाठी विराटसह ९ खेळाडूंचा समावेश

**दिल्ली.** आयसीसीकडून दोन भारतीय खेळाडूंना प्लेअर ऑफ द टूर्नामेंटसाठी नामांकन मिळाले आहे. आयसीसीने शुक्रवारी 9 खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. जे टूर्नामेंटचे सर्वोत्तम खेळाडू बनू शकतात. या यादीत विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव या दोघांनाही स्थान मिळाले आहे.

त्याचबरोबर पाकिस्तानच्या दोन खेळाडूंचाही या यादीत समावेश आहे. याशिवाय इंग्लंडच्या तीन, झिम्बाब्वे आणि श्रीलंकेच्या प्रत्येकी एका खेळाडूला या यादीत स्थान मिळाले आहे. आयसीसी टी-20 विश्वचषक 2022 चा अंतिम सामना 13 नोव्हेंबर रोजी मेलबर्न क्रिकेट मैदानावर खेळवला जाणार आहे. त्यानंतरच या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचे नाव घोषित केले जाईल. 9 सदस्यीय समितीने 2022 च्या टी-20 विश्वचषकातील कामगिरीच्या आधारे 9 खेळाडूंची निवड केली आहे. आता चाहत्यांना या 9 खेळाडूंना मतदान करायचे आहे.

# पराभव होणारच होता!

## शोएब अख्तरने उधळली मुक्ताफळे

**कराची, वृत्तसंस्था.** भारताने इंग्लंडविरूद्धचा सामना वाईट पद्धतीने हरला. इंग्लंडने भारताचा तब्बल 10 विकेट्स राखून पराभव केला. भारतीय गोलंदाजांना इंग्लंडची साधी एक विकेट देखील घेता आली आहे. जॉस बटलर आणि ॲलेक्स हेल्सने 170 धावांची नाबाद सलामी देत भारताचे आव्हान 16 षटकातच पार केले. भारताचा सेमी फायनलमध्ये दारून पराभव झाल्यानंतर पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने भारताच्या पराभवाला गोलंदाजांना जबाबदार धरले.

भारत सेमी फायनलमध्ये इंग्लंडकडून पराभूत झाल्यानंतर शोएब अख्तरने सोशल मीडियावर एक व्हीडिओ शेअर करत भारतीय संघाला शेलक्या भाषेत फैलावर घेतले. भारतासाठी हा एक लाजीरवणा पराभव आहे. ते खूप घाणेरड्या पद्धतीने खेळले. त्यामुळे तुमचा पराभव होणारच होता. भारताची अतिंम फेरीसाठी पात्र होण्याची लायकी नव्हती. वातावरण वेगवान गोलंदाजांना पोषक होते. मात्र भारताकडे वेगाने चेंडू टाकणारा एकही गोलंदाज नाही. मला कळत नाही की त्यांनी युझवेंद्र चहलला का खेळवले नाही. संघ निवड गोंधळ निर्माण करणारी होती, असे तो म्हणाला.



### पाकच्या पंतप्रधानांकडून थट्टा

उपांत्यफेरीत टीम इंडियाचा पराभव झाल्यावर पाकचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी ट्विट करीत थट्टा केली आहे. शरीफ यांनी ट्वीट केले आणि म्हटले की, तर आता या रविवारी 152/0 आणि 170/0 या दोघांमध्ये फायनल होणार आहे. आता हे ट्वीट तुम्हाला गोंधळात टाकू शकते. गेल्यावर्षी युएईमध्ये टी-ट्वेंटी वर्ल्डकप पार पडला होता. यामध्ये कोणत्याही वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानने पहिल्यांदा भारताचा पराभव केला होता.

### सौरऊर्जेद्वारे वीजनिर्मिती; ९४ लाख टन कोळसा वाचविला

# भारताची ४ अब्ज डॉलरची इंधन बचत

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** सौरशक्तीद्वारे वीजनिर्मिती करून भारताने यंदाच्या वर्षी जानेवारी ते जून या कालावधीत इंधनावरील खर्चात 34 हजार कोटी रुपयांची म्हणजेच चार अब्ज डॉलरची, तसेच 19.4 कोटी टन कोळशाची बचत केली आहे. ऊर्जाक्षेत्रात काम करणाऱ्या तीन संस्थांनी तयार केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. जगभरातील दहा महत्त्वाच्या देशांपैकी भारत, जपान, चीन, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम हे पाच देश आशिया खंडात आहेत. सौरशक्तीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती करणाऱ्या सात आशियाई देशांमध्ये भारत, चीन, जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, फिलीपिन्स, थायलंड या देशांचा समावेश होतो. त्यांनी यंदाच्या वर्षी जानेवारी ते जून महिन्याच्या कालावधीत सौरशक्तीद्वारे वीजनिर्मिती करून जीवाश्म इंधनांवरील खर्चात 27 लाख कोटी रुपयांची बचत केली आहे.



**खर्चात बचत केलेले देश**

| व्हिएतनाम | दक्षिण कोरिया | फिलीपिन्स |
|---|---|---|
| 13000 कोटी | 12000 कोटी | 637 कोटी |

## चीन आघाडीवर

- भारतासह ज्या सात देशांनी सौरशक्तीद्वारे वीजनिर्मिती करून इंधनावरील खर्चात जी बचत केली त्यामध्ये चीनचा सर्वाधिक वाटा आहे.
- चीनमध्ये विजेच्या एकूण मागणीपैकी 5 टक्के वीज सौरशक्तीद्वारे तयार केली जाते. त्यामुळे कोळसा व वायूवर होणाऱ्या खर्चात यंदा चीनने 1 लाख 71 हजार कोटी रुपयांची बचत केली.
- सौरऊर्जेच्या माध्यमातून इंधन खर्चात कपात करण्यात जपानने दुसरा क्रमांक पटकाविला आहे.

## थायलंड, व्हिएतनामची कामगिरी उल्लेखनीय

सौरऊर्जा वापरात व्हिएतनामनेही उल्लेखनीय प्रगती केली असून या देशाने 1.7 अब्ज डॉलरचे जीवाश्म इंधन वाचविले आहे. व्हिएतनाममध्ये 2018 मध्ये जवळपास शून्य टेरावॅट असलेले सौर ऊर्जेचे उत्पादन 2022 मधील पहिल्या सहामाहीत 14 टेरावॅटवर पोचले. व्हिएतनाममध्ये एकूण ऊर्जेपैकी 11 टक्के गरज सौरऊर्जेच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. एकूण ऊर्जेपैकी पाच टक्के गरज सौर ऊर्जेच्या माध्यमातून भागविणाऱ्या दक्षिण कोरियाने 1.5 अब्ज डॉलरचे जीवाश्म इंधन वाचविले. त्याचप्रमाणे, सौरऊर्जेची नगण्य निर्मिती असलेल्या फिलिपाइन्स व थायलंडनेही यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. थायलंडने 20 कोटी तर फिलिपाइन्सने 8 कोटी डॉलरच्या इंधनाची बचत केली.

# पुरातन जगदंबा तलवार भारतात आणणार?

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष असणारी जगदंबा तलवार महाराष्ट्रात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ब्रिटनचे नवनिर्वाचित पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याकडे सरकारने पाठपुरावा सुरू केला आहे. राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत बोलताना सांगितले की, 2024 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला साडेतीनशे वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त राज्य शासनाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचा आराखडा करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जगदंबा तलवार इंग्लंडकडून मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आलेले आहेत. तसे झाले तर ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब ठरणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले.



### ब्रिटिश पंतप्रधानांशी बोलणी सुरू

दरम्यान, 1875-76मध्ये ही तलवार इंग्लंडला गेल्याचे सांगितले जाते. इंग्लंडचे प्रिन्स भारतात आल्यानंतर त्यांना काही भेटवस्तू देण्यात आल्या. त्यामध्ये जगदंबा तलवारदेखील भेट देण्यात आली होती. ही तलवार मिळावी, यासाठी अनेकवेळा आंदोलने झाली. मात्र आता भारतीय वंशाचे ऋषी सुनक हे पंतप्रधान झाल्याने त्यांच्याशी बोलणी सुरू झाली आहे. राज्य सरकारने केंद्रामार्फत जगदंबा तलवार महाराष्ट्राला देण्याची मागणी केल्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

### १० हून अधिक शाखा, तीन हजार लोकांची फसवणूक

# पैसे लुटण्यासाठी बनवली बनावट बँक

**चेन्नई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** तामिळनाडूमध्ये एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. एका 44 वर्षीय व्यक्तीने लोकांची फसवणूक करण्यासाठी संपूर्ण बनावट बँकच तयार केली. तामिळनाडू पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने चंद्र बोस यांना स्वतःची बँक उघडून लोकांकडून 2 कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक केली आहे. त्याच्याकडून एक आलिशान कार आणि 56 लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. मात्र, या फसवणुकीच्या प्रकरणात आरोपी एकटा नसल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याचे अनेक साथीदारही यामध्ये सामील असल्याचे पोलिस सांगत आहेत. गुन्हे शाखेचे विशेष तपास



पथक त्याचा शोध घेत आहे. चंद्रबोस यांनी कोणत्याही परवान्याशिवाय स्वतःची ग्रामीण आणि कृषी शेतकरी सहकारी बँक (आरएएफसी) स्थापन केली. आश्चर्याची बाब म्हणजे, राज्याच्या विविध भागात दहाहून अधिक शाखा उघडून सुमारे तीन हजार लोकांची फसवणूक केली. त्यांनी मदुराई, विरुदाचलम, कल्लाकुरिची, नमक्कल, पेरांबलूर, इरोड, सेलम आणि चेन्नई या शहरांमध्ये बँकेच्या दोन शाखा उघडल्या. तपासादरम्यान ग्रामीण व कृषी सहकारी बँकेच्या नावाने बनावट वेबसाइटद्वारे ग्राहकांना पासबुक, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, ज्वेलरी आणि ऑनलाइन मनी ट्रान्सफर आदी प्रिंट करून दिल्याचे आढळून आले.

**रिझर्व्ह बँकेची पोलिसांना माहिती**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) अंबत्तूर येथे परवान्याशिवाय बँके चालत असल्याची माहिती पोलिसांना दिल्यानंतर चेन्नई शहर पोलिसांनी आरएएफसी बँकेच्या कामकाजाची चौकशी सुरू केली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सहाय्यक महाव्यवस्थापकाने औपचारिक तक्रार देखील दाखल केली होती.

## पार्क, जिममध्ये जाण्यास मनाई

**दिल्ली(ए).** अफगाणिस्तानात तालिबानी राजवट आल्यापासून अनेक फतवे जारी करण्यात आले आहेत. आता अफगाणिस्तानात महिलांना पार्क आणि जिममध्ये जाण्यास मनाई करण्यात आली आहे. तालिबानी सरकारने महिलांवर अनेक निर्बंध लादले आहेत. आता तेथील महिलांना पार्क आणि जिममध्ये जाण्यासही मनाई करण्यात आली आहे. या फतव्याची अंमलबजावणी करण्यासोबतच आणखी काही फतवे निघण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तालिबानी सरकारकडून अद्याप याबाबतची घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र, महिलांना पार्क आणि जिममध्ये जाण्यास मनाई करण्यात येत आहे. महिलांना पार्कमध्ये जाण्यास काही निर्बंध घालण्यात येतील, असे सरकारच्या प्रवक्त्याने सांगितले.

**# QUICK NEWS**

## चॉकलेटद्वारे तयार केला टेलिस्कोप

**दिल्ली.** एखाद्या शेफला टेलिस्कोप तयार करताना पाहिले आहे का? सोशल मीडियावर सध्या एक व्हीडिओ व्हायरल होत असून यात एक शेफ टेलिस्कोप तयार करताना दिसून येतो. परंतु हा टेलिस्कोप चॉकलेटद्वारे तयार करण्यात आला आहे. स्वीस-फ्रेंच पेस्ट्री शेफ अमाउरी गुइचॉन हे चॉकलेटद्वारे अनोखी कलाकृती तयार करण्यासाठी सोशल मीडियावर प्रख्यात आहेत. वितळविण्यात आलेल्या चॉकलेटला गोठविल्यावर अमाउरी त्याला वेगवेगळा आकार देताना दिसून येतात. प्रथम ते टेलिस्कोपचा स्टँड तयार करतात आणि मग टेलिस्कोप निर्माण करताना दिसून येतात. टेलिस्कोपमध्ये त्यांनी विशेष काचही बसविली आहे.

## शूज चोरी; दोन राज्य पोलिसांकडून तपास

**मुझफ्फरपूर.** धावत्या ट्रेनमधून मोबाइल, पाकीट चोरी होणे अशा घटना घडत असतात. एक्स्प्रेस ट्रेनमधून प्रवास करताना चोर आपला हिसका दाखवतात आणि बॅग किंवा इतर वस्तूदेखील चोरतात. धावत या ट्रेनमधून एका प्रवाशाचे शूज चोरीला गेले. आता, या चोरीचा तपास करण्यासाठी दोन राज्यांचे पोलिस कामाला लागले आहेत. प्रवाशाने याची तक्रार रेल्वेच्या 'रेल मदद' ॲपवर केली होती. बिहारमधील मुझफ्फरपूर रेल्वे ठाण्यात एका प्रवाशाने एफआयआर नोंदवला आहे. सीतामढी येथील राहुल कुमार झा हे जयनगर क्लोन स्पेशल ट्रेन 04652 मधील बोगी क्रमांक बी-4 च्या 51 क्रमांकाच्या आसनावरून अंबाला थानकापासून प्रवास करत होते. या दरम्यान त्यांचे शूज चोरीला गेले. त्यांनी या तक्रार 'रेल मदद' ॲपवर तक्रार नोंदवली.

### डोईजड • खासगी हॉस्पिटलचा उपचार परवडेना, रोजचा खर्च ६,७८८ रुपये

# सरकारी रुग्णालयांच्या तुलनेत खर्च दुप्पट

**जोधपूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** खासगी रुग्णालयांत भरती होऊन उपचार घेण्याचा खर्च सरकारी रुग्णालयांपेक्षा सुमारे अडीच पट अधिक असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. जोधपूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने (आयआयटी) हे सर्वेक्षण केले आहे. अहवालात म्हटले आहे की, खासगी रुग्णालयात उपचार घेण्याचा प्रतिदिन सरासरी खर्च 6,788 रुपये आहे. तोच सरकारी रुग्णालयात 2,833 रुपये इतका आहे. याचाच अर्थ सरकारी रुग्णालयांच्या तुलनेत खासगी रुग्णालयातील उपचार खर्च प्रतिदिन 3,995 रुपयांनी अधिक आहे. परिवार सर्वेक्षण आणि सरकारी खर्चावरील आरोग्य विमा यांचा आधार त्यासाठी घेण्यात आला.



### असा होतो खर्च

उपचाराच्या बाबतीत पुरवठ्यावरील सरकारी खर्च हा एकूण खर्चाच्या 16 टक्के असून मागणीच्या बाजूने पीएफएचआयचा खर्च 16 टक्के, रोख प्रोत्साहन लाभ 1 टक्का आणि रुग्णांच्या खिशातून होणार खर्च 67 टक्के आहे. रुग्णांच्या खिशांतून खर्च होण्याचे सरकारी रुग्णालयांतील प्रमाण 31 टक्के, तर खासगी रुग्णालयांत 86 टक्के आहे.

## गुंतवणूक वाढविणे गरजेचे

- सहायक प्राध्यापक अलोक राजन यांनी सांगितले की, खासगी रुग्णालयांतील खर्च अधिक असल्यामुळे सार्वजनिक आरोग्य सुविधांत अधिकाधिक गुंतवणूक करण्याची गरज आहे.
- भारतीय आरोग्य क्षेत्रातील खर्चाचा अभ्यास करणारे हे पहिलेच सर्वेक्षण आहे. यात खासगी व सरकारी अशा दोन्ही रुग्णालयांत रुग्णांवर पडणाऱ्या भाराची तुलना केली आहे.

### उशाखाली कोटींचे सोने, २ लाख घेऊन झोपला

# चालत्या रेल्वेमध्ये चोरट्यांनी मारला डल्ला

**पाटणा, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** बिहारमध्ये रेल्वे पोलिसांची झोप उडवणारी चोरीची घटना समोर आली आहे. चालत्या रेल्वेमध्ये चोरट्यांनी सोने आणि पैशांवर डल्ला मारला आहे. बिहारच्या आरा-पाटणा दरम्यान कामाख्या एक्स्प्रेस धावत होती. या रेल्वेमध्ये राजस्थानचा एक व्यापारी 1 कोटींचे सोने घेऊन प्रवास करत होता. हा व्यापारी स्लीपिंग बॅग डोक्याखाली घेऊन झोपला होता. अचानक या व्यापाऱ्याचे सोने आणि दोन लाख रुपयांची रोकड गायब झाली. या घटनेनंतर या व्यापाऱ्याला धक्काच बसला. आपल्यासोबत असे काही घडेल याची त्याला जरा देखील



कल्पना नव्हती. त्यांनी याबाबतची माहिती रेल्वे पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तक्रार नोंदवून कारवाई सुरू केली. राजस्थानच्या नागौर जिल्ह्यात राहणाऱ्या मनोज कुमार जैन या व्यापाऱ्यासोबत ही घटना घडली आहे. या व्यापाऱ्याने सांगितले की, तो आसामच्या तपन नगरमध्ये व्यवसाय करतो. त्याच्याकडे दोन पिशव्या होत्या. एका पिशवीत दोन किलो सोने तर दुसऱ्या पिशवीत दोन लाख रुपये रोख होते. या प्रकरणाचा तपास रेल्वे पोलिस करत आहेत. हे प्रकरण संशयास्पद असल्याचे रेल्वे पोलिसांचे म्हणणे आहे. पाटणा प्रभारी रेल्वे एसपी अनिल कुमार यांनी सांगितले की, व्यापाऱ्याच्या माहितीच्या आधारे तपास करण्यात येत आहे. मात्र, सीसीटीव्ही कॅमेरा तपासला असता त्यात एकही संशयित आढळला नाही. पाटणा रेल्वे स्थानकात गुन्हा कसा दाखल होईल? असेच ट्रेनमध्ये बॅगा डोक्याखाली ठेवल्या असताना व्यापारी जागा होता, मग हे सोने कसे चोरले असणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलिस शोधत आहेत.

### इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदविले नाव

# ट्रेडमिलवर १५ किमी धावून विश्वविक्रम

**कुरुक्षेत्र, वृत्तसंस्था.** येथे राहणारे व्यापारी दीपक गर्ग यांनी ट्रेड मिलमध्ये सलग 15 किलोमीटर धावत विक्रम केला. या कामगिरीबद्दल त्याचे नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवण्यात आले आहे. हरयाणाचे क्रीडा मंत्री संदीप सिंग यांनी दीपकला त्याच्या या कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरविले आहे. पेहोवा शहरातील व्यापारी दीपक गर्ग ट्रेड मिलवर सातत्याने 1 तास 40 मिनिटे धावले. यादरम्यान त्याने 15 किलोमीटरचे अंतर कापले. हा एक विक्रम आहे. यानंतर त्यांचे नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. ही माहिती इंडिया बुकनेही आपल्या खात्यांवर शेअर केली आहे. दीपक गर्गसारखे युवक सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे क्रीडा मंत्री संदीप सिंह यांनी म्हटले आहे. व्यवसायाच्या व्यस्त वेळेतून आरोग्यासाठी वेळ काढून त्यांनी स्वतःला तंदुरुस्त ठेवले आहे. त्याच्या या कामगिरीने संपूर्ण क्षेत्राचा गौरव केला आहे.



### सुवर्णपदकासह प्रशस्तीपत्र मिळाले

दीपकने सांगितले की, नुकतीच इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने धावण्याची स्पर्धा आयोजित केली होती. ज्यामध्ये त्याला हे यश मिळाले आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने आयोजित केलेल्या या स्पर्धेत देशातील इतर राज्यातील लोकही सहभागी झाले होते. यामध्ये दीपकने प्रथम क्रमांक मिळवून नवा विक्रम केला आहे. दीपकच्या या कामगिरीबद्दल इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने प्रशस्तीपत्र आणि सुवर्णपदक पाठवले आहे.

# इस्त्रोचे 'बाहुबली' परीक्षणात उत्तीर्ण

**बंगळुरू, वृत्तसंस्था.** भारतीय अंतराळ संशोधन संस्था एकाचवेळी अनेक उपग्रहांना अंतराळात प्रक्षेपित करत भारताचे नाव उंचावत आहे. पाश्चिमात्य जगतातील विकसित देशदेखील अंतराळात स्वतःचे उपग्रह पाठविण्यासाठी भारताची मदत घेत आहेत. उपग्रह प्रक्षेपणाच्या क्षेत्रात भारताची हिस्सेदारी वाढण्यासह चांगली कमाईही प्राप्त होत आहे. इस्त्रोने या दिशेने एक मोठे पाऊल टाकत अत्यंत शक्तिशाली



क्रायोजेनिक इंजिनाचे यशस्वी परीक्षण केले आहे. या क्रायोजेनिक इंजिनाच्या यशस्वी परीक्षणासह भारताच्या सर्वांत वजनी रॉकेट एलव्हीइम 3 ची पेलोड क्षमता 450 किलोग्रॅमपर्यंत वाढली आहे. एलव्हीएम 3 (लाँच व्हेईकल मार्क 3)साठी देशात विकसित सीई20 क्रायोजेनिक इंजिनाचे 9 नोव्हेंबर रोजी पहिल्यांदा 21.8 टनाच्या अपरेटेड थ्रस्ट स्तरावर एक यशस्वी परीक्षण करण्यात आले होते. यामुळे अतिरिक्त प्रणोदकाच्या वजनासह एलव्हीएम 3 पेलोडची क्षमता 450 किलोग्रॅमपर्यंत वाढणार असल्याचे इस्त्रोकडून म्हटले आहे.

## ३७०० वर्षांपूर्वीचा हस्तदंती कंगवा

**तेल अवीव(ए).** इस्रायल आणि अमेरिकेच्या पुरातत्त्व संशोधकांनी दक्षिण इस्रायलमध्ये एका हस्तिदंती कंगव्याचा शोध लावला आहे. हा कंगवा तब्बल 3700 वर्षांपूर्वीचा असून त्यावर कनानी लिपीत एक वाक्य कोरलेले आहे. लोकांना उवांपासून बचाव करून घेण्यासाठी आपले केस व दाढीमध्ये कंगवा फिरवण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आल्याचा मजकूर या वाक्यात आहे. या वाक्यात 17 अक्षरे आहेत.

# उत्खननात मिळाल्या दोन हजार वर्षे पुरातन मूर्ती

**दिल्ली, वृत्तसंस्था.** पुरातत्त्व तज्ज्ञांनी पाण्यात अत्यंत चांगल्या स्थितीत 24 हून अधिक कांस्य धातूच्या ग्रीक-रोमन देवतांच्या मूर्ती शोधून काढल्या आहेत. या मूर्ती 2 हजार वर्षांपेक्षा अधिक पुरातन असल्याचे सांगण्यात येत आहे. उत्खननात मिळालेल्या या मूर्तींना तज्ज्ञ खळबळजनक शोध ठरवत आहेत.
या मूर्ती इटलीच्या सिएना प्रांतातील टस्कनी भागात मिळाल्या आहेत. हे शहर रोमपासून सुमारे 160 किलोमीटर अंतरावर उत्तर दिशेला आहे. या भागात 2019 पासूनच एका प्राचीन स्नानगृहाच्या अवशेषांमध्ये पुरातत्त्व तज्ज्ञ शोधकार्य करत आहेत.






### चिंताजनक • साक्षरता दर ७७.७ टक्के, दहा वर्षांत शिक्षित लोकसंख्येत ५टक्केने वाढ

# साक्षरतेत महाराष्ट्र पिछाडीवर

**दिल्ली, वृत्तसंस्था.** आज टेक्नोलॉजी इतकी पुढे गेली आहे की प्रत्येकजण आपआपल्या योग्यतेनुसार समाजात योगदान देतोय. यात समाज साक्षर करणे ही प्रत्येक राष्ट्राची महत्त्वाची भूमिका आहे. आपला भारत देश स्वातंत्र्य होताना फक्त 18 टक्के लोक साक्षर होते. भारतीय राष्ट्रीय सर्वेक्षणच्या रिपोर्टनुसार वर्ष 2011 पर्यंत भारतातील साक्षरता दर 73% होता तर आता दहा वर्षांनंतर 5 टक्के वाढत 2022 मध्ये हा साक्षरता दर 77.7% आहे. परंतु साक्षरतेत महाराष्ट्र मात्र पिछाडीवर असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे राज्य विकासाच्या दिशेने पाऊल टाकत असताना साक्षरतेतील प्रगती न होणे ही चिंतेची बाब आहेत.

**राज्याचा नववा क्रमांक** : मागील वर्षी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) भारतातील शिक्षित लोकांचा आकडा जाहीर केला होता. या आकड्यानुसार भारतातील 28 राज्यांमध्ये केरळमध्ये सर्वांत जास्त (96.2%) लोक शिक्षित आहे तर सर्वांत कमी साक्षर लोक हे आंध्र प्रदेशमध्ये आहे. केंद्र शासित प्रदेशांमध्ये लक्षद्वीप सर्वांत समोर आहे. 91.8% साक्षरता दर येथे आहे तर जम्मू -काश्मीरमध्ये सर्वांत कमी साक्षरता दर 68.7% आहे. एवढेच काय तर दिल्लीत 86.2% लोक साक्षर आहेत. महाराष्ट्र मात्र शिक्षणाच्या बाबतील पिछाडीवर आहे. तरुणाईचे भविष्य घडविण्यामध्ये महाराष्ट्र मागे पडला आहे. पहिल्या पाचमध्ये महाराष्ट्र नाहीच. धक्कादायक म्हणजे टॉप साक्षर राज्यांमध्ये महाराष्ट्र चक्क नवव्या क्रमांकावर आहे.



### महिलांमध्ये साक्षरतेचा अभाव

जगभरातील 771 मिलियन निरक्षर लोकांसमोर साक्षरतेची आव्हाने कायम आहेत, त्यापैकी बहुतांश महिला आहेत, ज्यांच्याकडे अजूनही मूलभूत वाचन आणि लेखन कौशल्य नाही आहे. त्यांना अतिसंवेदनशीलतेचा सामना करावा लागतो. दुसरीकडे, हितचिंतकांचे म्हणणे असे की, साक्षरतेच्या माध्यमातून केवळ गरिबी, बेरोजगारी आणि लैंगिक असमानता हळूहळू नष्ट केली जाऊ शकत नाही तर त्यांच्या क्षेत्रांमध्ये आणि समाजांमध्ये मानवी हक्कांना चालना देण्यासाठी देखील मदत करू शकतात. जे आपल्या अधिकाऱ्यांच्या ज्ञानाच्या कमतरतेमुळे पीडित आहेत.

### टॉप दहा साक्षर राज्ये

- केरळ - 96.2%
- मिझोरम - 91.58%
- दिल्ली - 88.7%
- त्रिपुरा - 87.75%
- उत्तराखंड - 87.6%
- गोवा - 87.4%
- हिमाचल प्रदेश - 86.6%
- आसाम - 85.9%
- महाराष्ट्र - 84.8%
- पंजाब - 83.7%

रत्नागिरी नवराष्ट्र प्लस
मुंबई, शनिवार,१२ नोव्हेंबर २०२२ | www.navarashtra.com | /navarashtra

## बॅनर काढल्याच्या रागातून हाणामारी

**कणकवली,** (वा.) नांदगाव तिठा येथे असलदे सरपंच गुरुप्रसाद गणपत वायंगणकर यांचा लावलेला बॅनर काढल्याच्या रागातून गुरुवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास हायवे ब्रीजच्या बाजूला सर्व्हिस रोडवर हाणामारीची घटना घडली. या प्रकरणी असलदे सरपंच गुरुप्रसाद वायंगणकर(३९)यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कमलेश सुरेश मोरये(३८, रा. नांदगाव) याच्या विरुध्द तर कमलेश मोरये याने दिलेल्या तक्रारीवरुन गुरुप्रसाद वायंगणकरसह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जागा बिनशेती करताना फसवणूक, गुन्हा दाखल करा: किरीट सोमय्या

# रिसॉर्टवर दहा दिवसांत हातोडा!

**रत्नागिरी,** (वा.) रिसॉर्ट बांधताना परब यांनी बिनशेती करताना फसवणूक केली होती. त्यामुळे या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तसा गुन्हा त्यांच्यावर दाखल करायला हवा होता. मात्र, तो दाखल झालेला नाही. मी त्यांच्याकडे हा मुद्दा मांडून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मी रत्नागिरीचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्याशी ॲड. अनिल परब यांच्या अनधिकृत रिसॉर्टप्रकरणी तपशीलवार चर्चा केली आहे. याबाबत योग्य कायदेशीर तपास करून कार्यवाही करू, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले आहे. येत्या दहा दिवसांत साई रिसॉर्ट पाडण्याचे काम सुरू होईल. त्यावेळी मी स्वतः उपस्थित राहणार आहे, अशी माहिती भाजपाचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

### पुढील दोन दिवसांत ठेकेदाराची नियुक्ती



दापोलीतील वादग्रस्त साई रिसॉर्ट पाडण्यासाठी निविदा भरण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. आता पुढील दोन ते तीन दिवसांत ज्या काही निविदा आहेत, त्यातून हे काम कोणाकडे द्यायचे, याचा निर्णय होणार आहे. यासाठी पुढील दोन ते तीन दिवसांत ठेकेदाराची नियुक्ती होणार आहे, असे अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले असून १४ तारखेनंतर रिसॉर्ट पाडकामासाठी प्रत्यक्ष हालचाल सुरू होणार आहे, असे यावेळी सोमय्या यांनी स्पष्ट केले.



### आता पुढील नंबर कोणाचा?



ॲड. अनिल परब यांच्यानंतर आता आपल्या ४० जणांच्या यादीतील नेमका कोणाचा नंबर आहे, असे विचारता, याबाबत उत्तर न देता शांत राहणे पसंत केले. त्याने समाधान ना झाल्याने पत्रकारांनी आणखी प्रश्नांची सरबत्ती केली.

### दबावाखाली अटक करण्यास टाळाटाळ

आव्हाडांना अटक त्यांच्या वैचारिक मतभेदांमुळे झालेली नाही तर रात्री अपरात्री घरात घुसतात, थिएटरमध्ये घुसतात. पत्निसमोर तिच्या पतीला मारहाण करतात. हे सर्व त्यांना नडले आहे. कोणाच्याही दबावाखाली त्यांच्या अटकेची कारवाई झालेली नाही, असे आपले मत असल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले.

### रडारवरील 'त्या' नेत्यांचे काय?

शिंदे गटातील काही नेते यांच्यावर कारवाई व्हावी म्हणून त्या नेत्यांची नावे आपल्या रडारवर होती. आता ते नेते शिंदे गटात गेले आहेत.
त्यामुळे आपण शांत आहात की, त्यांच्यावर कारवाईसाठी शस्त्र उगरणार, असा सवाल प्रसार माध्यमांनी केला असता, सोमय्या म्हणाले, सर्व कामे मीच करावी असे नाही. विरोधकांनाही काही कामे करू द्या, असे सांगत मूळ प्रश्नाला त्यांनी बगल दिली.

### पोलीस अधिकाऱ्यांचा गैरवापर

आधीचे सरकार भ्रष्ट होते. अधिकारी पोलीस अधीक्षक यांचा माफिया म्हणून वापर करत होते. जे कोणी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जायचा प्रयत्न करीत त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न केला जात होता, असा आरोपही सोमय्या यांनी केला.
जितेंद्र आव्हाड असो किंवा तत्कालीन महविकास आघाडीचे आणखी काही नेते असोत. आणखी कोणी असोत. ते स्वतःला माफिया समजायचे. त्यांना आजही असे वाटते की त्यांचे माफिया सरकार आजही सुरू आहे. परंतु तसे आता राहिलेले नाही.

## देवरूख-मार्लेश्वर रस्त्यासाठी नाबार्डमधून निधी

**देवरूख,** (वा.) भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र मार्लेश्वर देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याची अनेक वर्षे अक्षरशः दुर्दशा झालेली असता, अनेक वर्षे सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते,नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. त्याच प्रमाणे उपोषण करण्यात आले होते. त्यातच संबंधित बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, संबंधित विभागाचे मंत्री यांना महाराष्ट्र समविचारी मंच रत्नागिरी, माहितीचा अधिकार कार्यकर्ता महासंघ मुंबईचे संगमेश्वर तालुका पदाधिकारी यांनी निवेदने दिलेली होती. त्याचप्रमाणे या रस्त्याची मीडियाद्वारे आवाज उठविण्यात आला होता. त्याचाच परिणाम म्हणून नाबार्ड बँकेने निधी मंजूर केला असून याचे श्रेय सर्व नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संघटना, उपोषणकर्ते यांना जात आहे. हा रस्ता देवस्थानाकडे जास्त असल्याने अनेक पर्यटक येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक होत आहे.

### पक्ष्याचा अबुधाबी ते पाकिस्तान प्रवास



## 'ऊबरा माळढोक' मुणगे गावात अडकला!

**देवगड,** (वा.) मुणगे गावामध्ये सापडलेल्या अबुधाबी येथून आलेल्या पक्षाचे गुढ उलगडले असून पक्षी हा ऊबरा माळढोक या जातीचा असून प्रजनन कालावधीतील प्रवास समजण्यासाठी त्याच्या पायात रिंग अडकवून त्याला सोडण्यात आले. याबाबतची माहिती मानद वन्य जीव संरक्षक प्राध्यापक नागेश दप्तरदार यांनी दिली आहे. हा पक्षी अबुधाबीतून राजस्थानमार्गे पाकिस्तानला जायचे असून वाटेत तो मुणगे येथे थांबला असताना सापडला.
मुणगे येथील माजी पंचायत समिती सदस्य संजीवनी बांबुळकर यांच्या घराजवळच्या बागेत गुरुवारी रात्री आठच्या सुमारास एक विदेशी पक्षी आढळून आला असून या पक्ष्यावर असलेल्या बिल्ल्यावरुन तो अबुधाबी येथून सोडण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. पक्षी निदर्शनास येताच संजीवनी बांबूळकर यांनी वनविभागाशी संपर्क साधून वनपाल सादिक फकीर, वनरक्षक निलेश साठे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तो राखाडी रंगाचा विदेशी पक्षी ताब्यात घेतला; परंतु त्याच्यावर असलेल्या बिल्ल्यावरून तो अबुधाबी येथून सोडलेला असल्याचे वनविभागाने सांगितले. मानद जीवरक्षक प्राध्यापक नागेश दप्तरदार यांनी या संदर्भात बॉम्बे नॅशनल हिस्टरी ऑफ सोसायटीशी संपर्क साधून या संदर्भात चर्चा केली आहे. येत्या दोन दिवसांत अधिक माहिती उपलब्ध होणार आहे.

### पुढील प्रवासाबाबत पत्रव्यवहार करणार

याबाबत राजस्थान राज्य सरकारकडे पत्रव्यवहार करून या पक्षाला पुढील प्रवासासाठी सोडायचे का? याबाबत निर्णय घेतल्या जाणार आहेत.

### # QUICK NEWS

### घातपातप्रकरणी जामीन अर्ज फेटाळला

**ओरोस, वा.** रेवतळे येथील खलाशी अंतोन सालू आल्मेडा मृत्यूप्रकरणी पसार असलेल्या अमित कामनाथ कोयंडे (५५) रा.मालवण यांचा अटकपूर्व जामीन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. जे. भारुका यांनी फेटाळून लावला. अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील नितीन कोंघे यांनी सरकारी पक्षाच्यावतीने काम पाहिले. मासेमारीस गेल्यावर समुद्रात बेपत्ता होऊन नंतर निवती समुद्रात मृतदेह सापडलेल्या रेवतळे येथील खलाशी अंतोन आल्मेडा यांच्या मृत्यूप्रकरणी त्यांच्या पत्नीने घातपाताचा संशय व्यक्त करत तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी संशयित पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी लहू जोशी, नंदकिशोर मोंडकर, डिसोझा, अमित पेडणेकर या चौघांना अटक केली होती. तर अमित कोयंडे फरार आहेत. त्यांनी अटक होवू नये, यासाठी जामीन केला होता.

### भातखरेदी • ऑनलाईन सातबारा मिळण्यात अडचणी

# नावनोंदणीला मुदतवाढ

**रत्नागिरी,** (वा.) उशिरापर्यंत सुरू असलेली भातकापणी आणि पिकपेरा नोंदणी असलेला ऑनलाईन सातबारा मिळण्यामध्ये असलेल्या अडचणींमुळे भातखरेदीच्या नोंदणीला शेतकऱ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे शेतकरी नोंदणीला मुदतवाढ मिळण्याची मागणी होत होती. या मागणीची दखल घेवून धान खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणीच्या कालावधीला शासनाकडून नोव्हेंबर महिनाअखेरपर्यंत (ता. ३०) मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे भातविक्रीच्या माध्यमातून उत्पन्न मिळवू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. धान खरेदी योजनेंतर्गत नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना सन २०२२-२३ या वर्षी पिकपेऱ्यामध्ये भाताची नोंद असलेल्या सातबारा उताऱ्याची आवश्यकता आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांनी तशा नोंदी केलेल्या नसल्याने अनेक सातबारा उताऱ्यांवर यावर्षीच्या पिकपेऱ्याची नोंदी झालेल्या दिसत नाहीत. त्यामुळे धान खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणीला शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली असली तरी, नोंदणीसाठी पिकपेरा नोंद असलेला सातबारा उतारा मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### शेतकरी भात कापणीत मग्न



शेतामध्ये पिकणारे भात शासनाकडून खरेदी केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये पिकणाऱ्या भातातून उत्पन्न मिळते. मात्र, अद्यापही भात कापणी सुरू आहे. पीकपेरा नोंदणी असलेला ऑनलाईन सातबारा उतारा मिळण्यामध्ये येत असलेल्या अडथळ्यांमुळे भातविक्रीसाठी नावनोंदणी करण्याला शेतकऱ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे नावनोंदणीसाठी शासनाकडून देण्यात आलेला कालावधीही अपुरा ठरत आहे. नावनोंदणीच्या कालावधीमध्ये वाढ व्हावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती. त्याची दखल घेत शासनाने ३० नोव्हेंबरपर्यंत नावनोंदणीसाठी मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

### महिनाअखेरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

दरम्यान, ज्या शेतकऱ्यांना भातविक्री करायची आहे, त्या शेतकऱ्यांना विहित कागदपत्रांसमवेत शासनाच्या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने महिनाअखेरपर्यंत नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावी, असे आवाहन राजापूर तालुका खरेदी-विक्री संघाकडून करण्यात आले आहे.

## महामार्गावरील खड्डे भरण्यास सुरुवात

**देवरूख,** (वा.) राष्ट्रीय महामार्ग हा खड्डेमय झाल्याचे चित्र होते. महामार्गावरील मोठमोठे खड्डे वाहन चालकांना जीवघेवे ठरत होते. यावरती वाहन चालवणे खूप कठीण झाले होते. याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते रमजान गोलंदाज यांनी रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे लेखी स्वरूपात केली असता त्यांनी तात्काळ खड्डे भरण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्ग अधिकारी आणि संबंधित कंपनीला दिले होते. त्याप्रमाणे बावनदीच्या पुढे खड्डे भरण्यास सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय महामार्गावरती दीड ते दोन फूट खड्डे पडले होते. सामाजिक कार्यकर्ते रमजान गोलंदाज यांनी याची तक्रार थेट रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती. त्या तक्रारीची दखल घेत पालकमंत्री उदय सामंत यांनी महामार्गाच्या अधिकारी आणि जे. एम मात्रे कंपनीच्या अधिकाऱ्यांना चांगलेच खडे बोल सुनावले होते. पालकमंत्री यांनी आदेश दिल्यानंतर खड्डे भरण्यास सुरुवात केली आहे.

### 'गाळमुक्त राजापूर' अभियान; सायबा धरणही होणार गाळमुक्त

# अर्जुना, कोदवलीतील गाळ काढणार

**राजापूर,** (वा.) नाम फाऊंडेशनसह राजापूर नगर पालिकेच्या पुढाकाराने आणि लोकसहभागातून शहरातील अर्जुना-कोदवली नदीपात्र आणि सायबाचे धरणातील गाळाचा उपसा करण्यासाठी लवकरच 'गाळमुक्त राजापूर अभियान' राबविण्यात येणार आहे. यामध्ये मोठ्यासंख्येने सहभागी होण्याचा निर्धार राजापूरकरांनी केला आहे. दरम्यान, या अभियानामध्ये राजापूरातील विविध सामाजिक संस्थांसह विविध संघटना, लोकांनी स्वयंस्फूर्तीने सर्वतोपरी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्याधिकारी प्रशांत भोसले यांनी केले. राजापूर शहराला दरवर्षी भेडसावणारी महापूराची समस्या आणि तीव्र पाणीटंचाईला अर्जुना-कोदवली नदीपात्रासह कोदवली येथील सायबाच्या धरणामध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे धरणासह नदीपात्रातील गाळाचा लोकसहभागातून उपसा करण्यासाठी नाम फाऊंडेशनने सकारात्मक प्रतिसाद दर्शविला आहे. नाम फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी सायबाचे धरण आणि नदीपात्राची गाळ उपशाच्यादृष्टीने पाहणी केली आहे. लोकसहभागाची आवश्यकता असून अभियानात सर्वांनी सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला.



### राजापूर नगरपरिषद, नाम फाऊंडेशनचा पुढाकार

नाम फाऊंडेशनच्या प्रतिनिधींसमवेत लवकरच विविध सामाजिक संस्थांसह विविध मंडळांच्या प्रतिनिधींची बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे श्री.भोसले यांनी यावेळी माहिती दिली. या अभियानाच्या अनुषंगाने या बैठकीमध्ये कोअर कमिटी गठीत करण्यात आली. या बैठकीला मुख्याधिकारी भोसले यांच्यासह ॲड. शशिकांत सुतार, व्यापारी संघाचे अध्यक्ष संदीप मालपेकर, रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संजय पवार, दिनानाथ कोळवणकर, विवेक गादीकर, राजेंद्र नवाळे, राजापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र मोहिते, महेश शिवलकर, मुख्य लिपीक जितेंद्र जाधव आदी उपस्थित होते.

## 'नायरी-निवळी रस्ता तातडीने दुरुस्त करा'

**संगमेश्वर,** (वा) नायरी- निवळी हा मुख्य रहदारीचा रस्ता असून या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. निवळी या दुर्गम भागात जाण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे. निवळी गावातील नागरिकांना दैनंदिन दळणवळणासाठी हा रस्ता महत्त्वाचा असल्याने सदर रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी निवळी गावचे ग्रामस्थ व गाव विकास समितीचे संगमेश्वर सरचिटणीस दैवत पवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. रत्नागिरी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दैवत पवार यांनी म्हटले आहे की, गावाच्या अलिकडे तीव्र चढ व उतार असणाऱ्या निवळी घाटात हा रस्ता अतिशय खराब झाला असून वाहनचालक जीव मुठीत घेऊन गाड्या चालवत असतात. खराब रस्त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण व्हावे, अशी निवळी गावातील ग्रामस्थांची मागणी आहे, असे दैवत पवार यांनी सांगितले.



### चाफवली ग्रामस्थांची तहसीलदारांकडे तक्रार

# रक्तचंदनाच्या झाडाची नासधूस

**संगमेश्वर,** (वा) तालुक्यातील चाफवली येथील दुर्मिळ रक्तचंदनाच्या झाडाची सोमवारी तहसीलदार सुहास थोरात पाहणी केली. तक्रारदार व ग्रामस्थांचे जबाब लिहून घेण्यात आले आहेत. याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती तहसीलदार सुहास थोरात यांनी दिली आहे. संगमेश्वर तालुक्यातील चाफवली येथे रक्त चंदनाचे दुर्मिळ झाड आहे. रक्तचंदनाचे झाड येथे कोणीही येतो, त्याच्या फांद्या तोडतो, झाडाची मुळे कापण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे हे वृक्ष चाफवलीतून नामशेष होण्याची भीती येथील ग्रामस्थांनी व्यक्त केली. या झाडाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी ग्रामस्थ एकवटले आहे. रक्तचंदनाचे हे झाड खुप वर्षांपूर्वीचे जुने असून, या वृक्षाचे संवर्धन आणि संरक्षण शासनाकडून व्हावे, यासाठी ग्रामस्थांनी पालकमंत्री उदय सामंत यांच्या नुकत्याच झालेल्या जनता दरबारात धाव घेतली. प्रशासनाने या झाडाचे संरक्षण करावे, अशी मागणी राजन बोडेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केली. याच पार्श्वभूमीवर चाफवली येथील दुर्मिळ रक्तचंदनाच्या झाडाची तहसीलदार सुहास थोरात पाहणी केली.



### कारवाई करणार

तक्रारदार राजन बोडेकर व काही ग्रामस्थांचे जबाब लिहून घेण्यात आले आहेत. याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती तहसीलदार सुहास थोरात यांनी दिली. वरीष्ठ स्तरावरून मिळणाऱ्या सूचनेनुसार, कार्यवाही करण्यात येईल, असे तहसीलदार थोरात यांनी नमूद केले आहे.

# डांबर ठेवलेल्या टाकीत घोरपड अडकली

### पाली वनविभाग कर्मचाऱ्यांकडून जीवदान

**रत्नागिरी ,** (वा) तालुक्यातील कारवांचीवाडी आदर्श वसाहत येथील रहिवासी सुहास रेवाळे यांच्या साई कृपा घराशेजारील डांबर असलेल्या टाकीत सुमारे तीन वर्षे वयाची घोरपड अडकली होती. रेवाळे यांनी याबाबत पाली वनविभाग कार्यालयास कळविले त्यानंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी डांबर टाकीत अडकलेल्या घोरपडीला टाकीतून सुरक्षित बाहेर काढले आणि तिच्या अंगाला चिकटलेले डांबर काढून नैसर्गिक अधिवासात तिला सुखरूप सोडले. शुक्रवारी सकाळी रत्नागिरी वन परिक्षेत्रातील परिमंडळ पाली नियतक्षेत्र रत्नागिरीमधील सचिन सुहास रेवाले, रा. साई कृपा, आदर्श वसाहत, कारवांचीवाडी यांच्या घराजवळ असलेल्या डांबराच्या टाकीमध्ये घोरपड अडकून पडल्याचे दिसून आल्याने सचिन रेवाले यांनी वनविभागास कळविले. त्यानुसार घटनास्थळी वनविभाग कर्मचाऱ्यांनी आले. घोरपडीला सुरक्षित बाहेर काढून तीच्यावर कोणत्याही प्रकारची जखम नसल्याची खात्री करून नैसर्गिक अधिवासात सोडले.

## उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू

**रत्नागिरी,** (वा.) शहरातील टीआरपी येथे घरी जाताना दुचाकीवरून पडलेल्या महिलेला उपचारांसाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान गुरूवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. आरती गणेश जाधव (५९, रा. बौद्धवाडी, ओरी, सध्या टीआरपी, रत्नागिरी) असे मृत महिलेचे नाव आहे. दुचाकीस्वार सिद्धेश विठ्ठल मटकर (२४, रा. पेंडखळे, ता. राजापूर, सध्या शिवाजीनगर, ) हे दुचाकीसोबत आरती जाधव यांना दुचाकीच्या मागे बसवून टीआरपी येथे त्यांच्याघरी जात असताना जाधव या दुचाकीवरून खाली पडल्या. त्यांच्या डोक्याला मार लागला. उपचारसाठी जिल्हा रूग्णालयात त्यांना दाखल केले होते.

### अभिमानास्पद • उस्मानाबादमध्ये २० नाव्हेंबरपासून राष्ट्रीय स्पर्धा; महाराष्ट्राचा १५ जणांचा संघ

# रत्नागिरीच्या खेळाडू राज्य खो-खो संघात

**रत्नागिरी,** (वा.) उस्मानाबाद येथे २० ते २४ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या ५५ व्या पुरुष-महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे दोन्ही संघ राज्य संघाचे सचिव ॲड. गोविंद शर्मा यांनी जाहीर केला. महिला संघामध्ये रत्नागिरी जिल्ह्याच्या अपेक्षा सुतार, आरती कांबळे, श्रेया सनगरे या तिघींचा समावेश आहे. हिंगोली येथे झालेल्या राज्यस्तरीय पुरुष-महिला खो-खो स्पर्धेतून महाराष्ट्राच्या १५ जणांच्या संघाची निवड करण्यात आली. या साठी राज्य खो-खो असोसिएशनने चार सदस्यीय निवड समिती नेमली होती. राज्य स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्याच्या तिघांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघातून रत्नागिरी जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली आहे. राज्य स्पर्धेत चार सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. उपउपांत्य फेरीच्या सामन्यात तिघींनीही संघाला विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. राज्याच्या संघात निवडल्या गेलेल्या खेळाडूंचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्य संघटनेचे अध्यक्ष संजीव नाईक निंबाळकर, फेडरेशनचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव, राज्याचे सचिव ॲड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. अरुण देशमुख, राष्ट्रीय प्रशिक्षक पंकज चवंडे, यांच्यासह जिल्हा खो-खो असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

### डॉ. चंद्रजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव शिबिराला सुरुवात





सराव शिबिर उस्मानाबाद येथे खो-खो फेडरेशनचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारपासून (ता. १०) सुरू झाले.
पुरुष संघ : अनिकेत पोटे, निहार दुबळे, अक्षय भांगरे, ऋषिकेश मुर्चावडे (मुंबई उपनगर), प्रतिक वाईकर, सुयश गरगटे, आदित्य गणपुले (पुणे), लक्ष्मण गवस, गजानन शेंगाळ (ठाणे), सुरज लांडे, अक्षय मासाळ (सांगली), रामजी कश्यप (सोलापूर), दिलीप खांडवी (नाशिक), सुरज शिंदे (हिंगोली), सनी नायकवडी (उस्मानाबाद). राखीव खेळाडू षभ वाघ (पुणे), अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर), वेदांत देसाई (मुंबई). प्रशिक्षक शिरीन गोडबोले (पुणे), व्यवस्थापक नरेंद्र रायलवार (हिंगोली), फिजीओ डॉ. किरण वाघ (अहमदनगर).
महिला संघ : प्रियांका इंगळे, काजल भोर, स्नेहल जाधव, दिपाली राठोड (पुणे), रुपाली बडे, पूजा फरगडे, रेश्मा राठाडे (ठाणे), संपदा मोरे, अश्विनी शिंदे, गौरी शिंदे (उस्मानाबाद), अपेक्षा सुतार, श्रेया सनगरे, आरती कांबळे (रत्नागिरी), प्रतिक्षा बिराजदार (सांगली), प्रिती काळे (सोलापूर). राखीव खेळाडू : सोनाली पवार (नाशिक), किरण शिंदे (उस्मानाबाद), स्नेहल चव्हाण (सांगली). प्रशिक्षक प्रविण बागल (उस्मानाबाद), व्यवस्थापिका माधुरी कोळी (ठाणे), सहाय्यक प्रशिक्षक प्राची वाईकर (पुणे).

## माभळेत बांधकामे हटविण्यास सुरुवात

**संगमेश्वर,** (वा.) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणात रखडलेल्या माभळे, संगमेश्वर येथील बांधकामे सर्व संबंधितांनी स्वतःहून हटविण्यास सुरूवात केली आहे. दुकानांच्या बांधकामांमुळे महामार्ग चौपदरीकरणात सातत्याने अडथळे येत होते.
ठेकेदार कंपनी व्यवस्थापनाने चौपदरीकरणात अडथळे ठरणारी हॉटेल्स, दुकाने, घरे आदी बांधकामे तत्काळ हटविण्याची नोटीस नागरिकांना दिली होती. नोटीसीत दिलेल्या मुदतीनुसार, नागरिकांनी स्वतःहून सुरूवात बांधकामे हटविण्यास केली आहे. लवकरच महामार्ग चौपदरीकरणाचे काम सुरू होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, पावसाळ्यानंतर मुंबई-गोवा महामार्गाचे काम आता वेगाने सुरू झाले आहे. त्यामुळे या मार्गावरुन प्रवास करणाऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

### संगमेश्वरातील मुलगा नेटफलिक्सवर झळकला

# 'छोटीसी बात' लघुपटात भूमिका

**संगमेश्वर,** (वा.) तालुक्यातील कोंड असुर्डे गावच्या १२ वर्षीय मुलाने छोटीशी बात या लघुचित्रपटात आपली चमक दाखवली आहे. सांगली येथे छोटीसी बात हा लघुपट नुकताच प्रदर्शित झाला. तसेच यु ट्युबवरही प्रसारीत झाला आहे.
या लघुपटात कोंड असुर्डेच्या अथर्वने शिवची भूमिका निभावली आहे. या लघुचित्रपटाचे हितांत देसाई यांनी दिग्दर्शन केले आहे. अथर्व पोवळे हा मूळ कोंड असुर्डे संगमेश्वर येथील आहे. सध्या तो सांगली येथे वास्तव्याला आहे. तिथे छोटीसी बात हा लघुचित्रपट प्रदर्शित करण्यात आला. अथर्व याने या लघुचित्रपटात खोडकर मुलाची (शिव) याची भूमिका निभावली आहे. शाळेमध्ये तो वर्गात बसलेला असतानाही खोड्या करतो. क्लास चालू असताना मित्रांवर कागदाचे बोळे करुन मारणे असा त्याचा खोडकर स्वभाव दाखवण्यात आला आहे. छोटीसी बात हा लघुचित्रपट नेट फ्लिक्स इंडिया आणि युट्युबवर प्रदर्शित झाला आहे.

### कौतुकाचा वर्षाव



मोठ्या घरातील मुलांसोबत वावरताना त्याला आपल्या गरीबीची लाज वाटते. घरातील साध जेवण त्याला आवडत नाही. घरी आलेल्या पाहुण्यांशी तो उद्धटपणे बोलतो. यावेळी त्याच्या आईने जोरात त्याच्या कानशिलात ठेवून दिली. मोठयांशी कसे वागावे, बोलावे याचे संस्कार आई मुलावर करताना दिसते, अशी या लघुपटाची कथा आहे.

## मत्स्यगंधा, नेत्रावतीचा प्रवास महिनाभरासाठी पनवेलपर्यंत

# एक्सप्रेस पनवेलपर्यंतच धावणार !

खेड/मुंबई, (वा.) मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनस स्टेशनजवळ रेल्वे मार्गावरील अपग्रेडेशनच्या कामामुळे कोकण रेल्वेमार्गे धावणाऱ्या मत्स्यगंधा तसेच नेत्रावती एक्स्प्रेसचा प्रवास पुढील जवळपास महिनाभर पनवेल स्थानकापर्यंतच करता येणार आहे. तिरुअनंतपुरम ते मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनसदरम्यान धावणारी नेत्रावती एक्स्प्रेस (१६३४५) तसेच मंगळूर सेंट्रल ते लोकमान्य टिळक टर्मिनस या ८ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रवास सुरू होणाऱ्या एक्स्प्रेस गाड्यांचा प्रवास मुंबईत येताना पनवेल स्थानकात संपणार आहे. याचबरोबर लोकमान्य टिळक टर्मिनस ते मंगळूर सेंट्रल मत्स्यगंधा एक्स्प्रेस ११ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर या कालावधीत पनवेल स्थानकातून सुटणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस ते तिरुअनंतपुरम सेंट्रल (१६३४५) नेत्रावती एक्स्प्रेस ही गाडी देखील दि. १० नोव्हेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत लोकमान्य टिळक टर्मिनसऐवजी पनवेल स्थानकातून सुटणार आहे.



### मध्य रेल्वेचा २७ तासांचा मेगाब्लॉक

मुख्य मार्गावर भायखळा ते सीएसएमटी आणि हार्बर मार्गावर वडाला रोड ते सीएसएमटी या मार्गावर लोकल बंद असतील. रविवारी २० नोव्हेंबर रोजी एसी लोकल बंद असतील. ब्लॉग कालावधीत मध्य मार्गावरील ट्रेन भायखळा येथून निघतील. तर हार्बर मार्गाच्या ट्रेन वडाला रोड येथून सुटतील. रविवारी चालणाऱ्या वातानुकूलित उपनगरी सेवा उपलब्ध नसतील. बृहन्मुंबई महानगर पालिकेला ब्लॉक प्रभावित भागात पुरेशा बसेस चालवण्याची विनंती केली आहे.



### उपनगरीय गाड्या कमी वारंवारतेने चालवणार

मध्य रेल्वेवर तब्बल २७ तासांचा मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. शनिवार आणि रविवारी (१९ ते २० नोव्हेंबर) या कालावधीत विविध रेल्वे लाईनच्या कामासाठी ब्लॉक घेण्यात येणार आहे. अप आणि डाउन धिम्या मार्गावर, अप आणि डाउन जलद मार्गांवर तसेच अप आणि डाउन हार्बर मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- मस्जिद स्टेशन दरम्यान किमी ०/१-२ येथे रोड क्रेन वापरून कर्नाक रोड ओव्हर ब्रिज हटवण्यासाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. याचा परिणाम रेल्वेच्या तीन मार्गावर होणार आहे. यामुळे मुंबईकरांना त्रास सहन करावा लागू शकतो. अप आणि डाऊन हार्बर मार्गावर : १९ नोव्हेंबर शनिवार २३:०० वाजता ते २० नोव्हेंबर रविवार सायंकाळी आठ वाजेपर्यंत असा २१ तासांचा मेगा ब्लॉग असेल. मुख्य मार्गावरील अप आणि डाउन उपनगरीय सेवा भायखळा, परळ, दादर आणि कुर्ला स्थानकांवर शॉर्ट टर्मिनेट/शॉर्ट ओरीजनेट होतील. भायखळा, परळ, दादर, कुर्ला ते ठाणे आणि त्यापलीकडे उपनगरीय गाड्या कमी वारंवारतेने चालवल्या जातील. हार्बर लाईनवरील अप आणि डाउन उपनगरीय सेवा वडाळा रोड स्थानकावर शॉर्ट टर्मिनेट/शॉर्ट ओरीजनेट केल्या जातील. वडाळा रोड ते कुर्ला आणि त्यापलीकडे उपनगरीय गाड्या कमी वारंवारतेने चालवल्या जातील.

## खोंडे गावात सांडपाण्याची डबकी

खेड, (वा.) खेड शहराला लागूनच असणाऱ्या भडगाव ग्रुप ग्रामपंचायतीमधील खोंडे गावात सांडपाण्याची डबकी जागोजागी दिसत आहेत. खेड शहराबरोबरच भरणे, भोस्ते, भडगाव व खोंडे ही लगतची गावे वेगाने विकसित होत आहेत. या गावांमध्ये मोठमोठी रहिवासी संकुले, बंगले आणि आरसीसी घरांची संख्या वाढली आहे. मात्र, झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या या गावांमध्ये मूलभूत सुविधांची वानवा आहे तालुक्यातील वेगाने विकसित होत आलेल्या भडगाव व खोंडे गावात आता समस्या ठळकपणे दिसू लागल्या आहेत. खोंडे येथे अनेक ठिकाणी सांडपाण्याचे तलाव साचले असून काही ठिकाणी कचऱ्याचे ढीग आहेत. भडगाव खोंडे ग्रुप ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न सुमारे बावीस लाख रुपये आहे. यामध्ये बारा लाख रुपयांची घरपट्टी तर उर्वरित सुमारे दहा लाख रुपयांची पाणीपट्टी जमा केली जाते. खेड शहराला लागून असलेली ग्रामपंचायत म्हणून ओळख असली तरी ग्रामपंचायतीकडे स्वतःचे इतर आर्थिक उत्पन्नाचे मार्ग नाहीत.

## घरगुती वापर खर्चाचे सर्वेक्षण

# जिल्ह्यातील ५ गावांची निवड

### कळंबस्ते, तिसंग, हरपुडे, हर्डीचा समावेश

गुहागर, (वा.) भारत सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातर्फे भारतात घरगुती अभोग खर्च सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. यासाठी जिल्ह्यातील ५ गावांची निवड झालेली असून अधिकाऱ्यांचे पथक या गावांमधील प्रत्येक घरोघरी जाऊन नागरिकांची माहिती घेणार आहेत. केंद्र सरकारच्या या सर्वेक्षणाचा कालावधी एक वर्षाचा असून सर्वेक्षण करण्यासाठी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सर्वेक्षण करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर कशी मात करायची याविषयीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या ग्रामीण आणि शहरी गटांमधून १८ कुटुंबांची माहिती ३ महिन्यात एकाच घराला ३ भेटी देऊन संकलित केली जाईल. या ३ भेटींमध्ये टॅब्लेट वापरुन घरगुती वैशिष्ट्ये, खाद्यपदार्थ, उपभोग्य वस्तू आणि सेवा व टिकाऊ वस्तूंवरील घरगुती खर्चाची माहिती संकलित केली जाणारआहे.

### सहकार्य करण्याचे आवाहन




सुरुवातीला घरोघरी भेट देऊन नागरिकांना याविषयी पटवून सांगणे कठीण जाणार आहे. नागरिकांनी मनात कोणतीही शंका न ठेवता व भीती न बाळगता सर्वतोपरी माहिती देऊन सर्वेक्षणाला सहकार्य करणे महत्वाचे आहे. राज्यात असंख्य शहरातून व ग्रामीण भागातून या सर्वेक्षणाला सुरुवात झालेली आहे. प्रत्येक तालुक्यातील पंचायत समिती प्रशासनाला याची माहिती देण्यात आलेली आहे.

## # QUICK NEWS

### दिव्यांग खेळाडूंसाठी मार्गदर्शन शिबिर

खेड, वा. रत्नागिरी जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व खेळाडूंसाठी खेड येथे क्रीडा मार्गदर्शन व सराव शिबिराचे आयोजन २० नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. क्रीड, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्य करणारे व दिव्यांग खेळाडूंना विविध दिव्यांग क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाची संधी उपलब्ध करून देणारे दिव्यांग युवा क्रीडा प्रतिष्ठान रत्नागिरी व दिव्यांग क्रिकेट असोसिएशन रत्नागिरी यांचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रशांत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग युवा क्रीडा प्रतिष्ठान, रत्नागिरी व दिव्यांग क्रिकेट असोसिएशन रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी होणाऱ्या राज्य राष्ट्रीय दिव्यांग क्रीडा स्पर्धांच्या दृष्टीने दिनांक २० नोव्हेंबर रोजी खेड येथे लेदर बॉल क्रिकेट सराव व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. I दिव्यांग खेळाडूंना या सराव शिबिरात सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## एमपीएससी • आमदार डावखरेंच्या प्रयत्नांना यश

# मुख्यालय अखेर मंजूर

चिपळूण, (वा.) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) मुख्यालयाच्या बेलापूर येथील स्वतंत्र इमारतीला जागा मिळविण्याबरोबरच राज्य सरकारकडून २८२ कोटी रुपयांच्या मंजुरीसाठी प्रयत्न केल्याबद्दल स्टूडंट्स राईट्स असोसिएशनने कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांचे आभार मानले आहेत. असोसिएशनचे पदाधिकारी महेश बडे यांनी डावखरे यांची शुक्रवारी भेट घेतली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमध्ये लाखो विद्यार्थी सहभागी होतात. मात्र, वर्षानुवर्षे लोकसेवा आयोगाच्या मुख्यालयासाठी स्वतंत्र जागा नव्हती. विक्रीकर विभागाच्या माझगाव येथील तीन मजल्यांवरून, तर फोर्ट येथील एका इमारतीच्या एका मजल्यावरून आयोगाचा कारभार सुरू होता. भाडेपट्ट्यावरील इमारतीतून सुरू असलेल्या या कारभारामुळे विस्कळितपणा होता. त्याचा लाखो विद्यार्थ्यांना फटका बसत होता. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्वतंत्र इमारत होण्याची गरज होती. आमदार निरंजन डावखरे यांच्याकडे २०१८ मध्ये संपर्क साधला होता. कोकण भवन येथील मुख्यालयाशेजारील मोकळ्या जागेचा विचार केला होता.

### स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणार : निरंजन डावखरे



स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यात येतील. त्याचबरोबर आगामी काळात होणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षांमध्ये पदांची संख्या वाढविण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन आमदार निरंजन डावखरे यांनी स्टूडंट्स राईट्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

### २८२ कोटी २५ लाख रुपये खर्चाला मान्यता

विधान परिषदेतील २०१८ मधील अधिवेशनात आमदार डावखरे यांनी एमपीएससीच्या मुख्यालयाचा प्रश्न मांडला होता. त्यानंतर राज्य सरकारकडून कार्यवाही सुरू करण्यात आली. मात्र, काही तांत्रिक बाबी व परिपूर्ण मुख्यालयासाठी वाढीव खर्चाची तरतूद अपेक्षित होती. त्यामुळे मुख्यालयाला सुधारीत मान्यता मिळाली नव्हती. अखेर राज्य सरकारने नुकताच मुख्यालयासाठी २८२ कोटी २५ लाख रुपये खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाबद्दल आमदार डावखरे यांचे असोसिएशनच्यावतीने आभार मानण्यात आले. त्याचबरोबर लिपिक वर्गाच्या परीक्षा लोकसेवा आयोगामार्फत घेण्याच्या मागणीबाबत यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार डावखरे यांचे आभार मानून, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले.

## 'कुणबी जोडो' अभियानची सभा

खेड, (वा.) कुणबी समाज बांधव विविध संघटना, गोष्टींमध्ये विखूरला गेला असल्याने कुणबी समाजोन्नती संघ मुंबई यांनी कोकणातील समाज एकत्रित करण्यासाठी कुणबी जोडो अभियानाची निर्मिती केलेली आहे. या अंतर्गत विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. याच उपक्रमाचा भाग म्हणून खेड तालुक्यातील कुणबी बांधवांची पहिली सभा कुणबी समाजोन्नती संघ आणि ११ गाव कुणबी समाज बांधव सुसेरी विभाग यांच्यात नुकतीच संपन्न झाली. या सभेला विविध समस्या आणि त्यांची उपाययोजना यावर सखोल चर्चा झाली. ११ गाव कुणबी समाज बांधव सुसेरी विभाग यांनी कुणबी जोडो अभियानात सक्रिय सहभाग घेऊ, अशी ग्वाही दिली. यावेळी ११ गाव कुणबी समाज बांधव सुसेरी विभागाचे अध्यक्ष बाबा पाटील, सेक्रेटरी वैराग, समाजनेते विजय राक्षे, अशोक घाणेकर, धाडवे शिरवली हायस्कूलचे मुख्याध्यापक टेमकर, सचिन गोवळकर, रवींद्र कोळंबे तसेच अशोक कोळंबे, अमित कदम आदी यावेळी हजर होते.

# स्वतंत्र अग्निशमन बंब द्या

### गुहागर मनसेचे पालकमंत्री उदय सामंत यांना निवेदन

वरवेली, (वा.) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी मुंबई येथील रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या मुक्तागिरी शासकीय बंगल्यावर भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, गुहागर तालुका हा मागील काही काळात पर्यटनासह बांधकाम आणि उद्योग क्षेत्रात दिवसांगिक वाढत असून तालुक्यातील गुहागर आणि शृंगारतळी शहरात होत असलेल्या भीषण आगीच्या दुर्घटना लक्षात घेता अशा प्रसंगात मदतीसाठी अग्निशमन दलाची नितांत गरज असते. नुकतीच शृंगारतळी येथे गादी कारखान्याला भीषण आग लागून मोठे नुकसान झाले होत. अग्निशमन दलाची गाडी तीन तासानंतर पोहेचल्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवता आले नव्हते. अशा आपत्ती काळात तालुक्याला कंपनीवर विसंबून राहावे लागते, शिवाय या कंपनीपासून घटनास्थळी येण्यासाठी खूप विलंब होत असल्याने अनेकदा मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी निवेदन दिले.



### वाढत्या शहरीकरणामुळे वारंवार आगीच्या घटना

सुदैवाने आजपर्यंत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. मात्र, वाढते शहरीकरण आणि भविष्यात होणाऱ्या आपत्तीपासून वेळेवर बचाव करण्यासाठी गुहागर नगरपंचायत अथवा तालुक्याच्या ठिकाणी योग्य शासकीय ठिकाणी अग्निशमन दलाचे वाहन सुसज्ज असावे, अशी मागणी आम्ही करत आहोत. याचा गांभीर्याने विचार करून आपण ही सुविधा गुहागर वासियांना मिळवून द्याल, असा विश्वास बाळगतो.

# माणीत बेकायदा डांबर प्लांट

### प्रकल्प हटवण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक



खेड, (वा.) खेडमधील माणी गावातील बेकायदेशीर डांबर प्लांट हटवण्यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली असून, या डांबर प्लांटला कोणत्याही प्रकारची आवश्यक परवानगी नसताना हा प्लांट सुरू आहे, ग्रामपंचायतीने या प्लांटला बंद केले असून हा प्लांट या गावातून बंद करावा. तसेच त्या ठिकाणी असणारे कर्मचारी उघड्यावर शौचालयाला बसतात. त्यामुळे हागणदारी मुक्त गावाला हे अशोभनीय असल्याचे मानी गावातील ग्रामस्थांनी यावेळी सांगितले आहे. तसेच हा डांबर प्लांट लवकरात-लवकर गावाबाहेर गेला नाही, तर २६ जानेवारीला आपण आंदोलन करणार असल्याचे मानवी गावचे ग्रामस्थ बंटी आमरे राजेंद्र सागवेकर अशोक आंब्रे अरविंद गमरे यांनी सांगितले.

### सध्या प्लांट बंद

संबंधित डांबर प्लांटला अनेक वर्षे झाली. मात्र, प्रदूषण नियंत्रण मंडळ आरोग्य अधिकाऱ्यांच्या परवान घ्या, तसेच आणखी आवश्यक असणाऱ्या इतर सर्व परवानगी या नाहीत, अशी माहिती ग्रामपंचायतीमधून देण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मात्र, असे असताना आपल्यात इतके वर्ष कसा सुरू होता, असाही प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. तसेच सद्यस्थितीत हा प्लांट बंद असून हा प्लांटच गावातून बाहेर जावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आले.

## श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचे ७५ व्या वर्षात पदार्पण

# अमृतमहोत्सव सोहळा उत्साहात

चिपळूण, (वा.) 'इवलेसे रोप लावियले द्वारी, त्याचा वेलू गेला गगनावरी' या जगतगुरु तुकाराम महाराज यांच्या अभांगच्या उक्तीप्रमाणे कलेकलेने वाढत असलेल श्री विठ्ठल रखुमाई मंदिर आज ७५ वर्षात पदार्पण करीत आहे. सन १९४७ साली तयार करण्यात आलेल्या या मंदिराचा अमृत महोत्सव सोहळा कळसवली चव्हाणवाडी येथे विठ्ठल नामाच्या जय घोषात संपन्न झाला.

या नयनरम्य सोहळ्यामध्ये राजापूर तालुक्यातून पाच हजार पेक्षा जास्त भाविकांनी वारकरी मंडळी दिंडीमध्ये सहभागी झाली होती. गंगाराम नारायण पांचाळ आणि निळू गनू चव्हाण यांच्या विचारतून एका दगडामध्ये विठ्ठलरखुमाई मूर्ती स्वतःच्या कलेतून विठ्ठल रखुमाईची मूर्ती गंगाराम पांचाळ यांनी घडविली आणि या मंदिराला चव्हाणवाडी ग्रामस्थ शंकर व रामचंद्र चव्हाण यांनी स्वतःच्या मालकीची जमीन मंदिर करता बक्षीसपत्र लिहून देऊन दिली. त्या जागेवर चव्हाणवाडीतील मुंबई ग्रामस्थांनी मंदिर उभे केले.




### चाकरमानी उत्सवासाठी गावी दाखल

मुंबई, पुणे या शहरांमध्ये नोकरी धंद्यानिमिताने गेलेले सारे चाकरमानी या उत्सवासाठी आपल्या गावच्या घरी येतात. या वेळी देखील चाकरमान्यांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्तिकी एकादशी मोठी एकादशी म्हणून देखील ओळखली जाते. या दिवशी वारकरी संप्रदायातील तसेच वैष्णव पंथीय एक दिवसाचे उपवासाचे व्रत करतात. चातुर्मास व्रताचा हा शेवटचा दिवस मानला जातो.

अमृत महोत्सव सोहळ्याची सुरुवात सकाळी विधियुक्त विठ्ठलरखुमाई मूर्तीचे पूजन हभप चंद्रकांत पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आली. सत्यनारायण महापूजा, होम हवन, महाप्रसाद करण्यात आला. महिलांकरीता हळदी कुंकू, संगीत खुर्ची सारखे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले. सायंकाळी पारंपारिक संगीत भजन महेंद्र पांचाळ बुवा यांनी केले. दुरऱ्या दिवशी म्हणजे कार्तिकी एकादशी उत्सव सोहळ्याची सुरुवात महाअभिषेक आणि विधियुक्त विठ्ठलरखुमाई मूर्तीचे पूजन करण्यात आले, स्थानिक भजन शेखर पांचाळ बुवा यांनी केले.

## भरणेत जुगार अड्डयावर धाड

खेड, (वा.) भरणे येथे पोलिसांनी जुगार अड्ड्यावर धाड टाकून २६६० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी चौघांवर येथील पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमेश सिताराम टेमकर (भरणे), रूपेश राजेंद्र शिंदे (सुकिवली ), अक्षय एकनाथ शिगवण दिनेश दिलीप (नातूनगर), रसाळ ( खोंडे मधलीवाडी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. शुभांक आकड्यावर पैसे लावून बेकायदेशीर जुगार खेळत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड टाकून २६६० रुपये व जुगार खेळतानाचे साहित्य जप्त केले.

## तरुणाची आत्महत्या

खेड, (वा.)खेड तालुक्यातील वेरळ प्रभुवाडी येथे एका तरुणाचा मृतदेह त्याच्या घरी गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. ही घटना ९ रोजी सकाळी ७.३० वाजता निदर्शनास आली. महेश भिवा मळेकर (वय ३२, रा. वेरळ प्रभुवाडी) असे मृत।तरुणाचे नाव आहे. या घटनेची माहिती भूषण अनंत जड्याळ (वय २३, रा. वेरळ प्रभुवाडी) यांनी पोलिसांना दिली.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात सहभाग

# विद्यालयाकडून शुभम रबसेचा सन्मान



राजापूर, (वा.) तालुक्याच्या पूर्व परीसरातील मनोहर हरी खापणे महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा विद्यार्थी शुभम रबसे याने विविध उपक्रमात मनाली येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या नॅशनल ॲडव्हेंचर कॅम्प मध्ये यशस्वी सहभाग घेत आपल्या नावाची मोहर उमटवली. रत्नागिरी जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत या कॅम्पसाठी खापणे महाविद्यालयाच्या राहुल रबसे याची निवड झाली होती. या निवडीत जिल्हा समन्वयक डॉ. राहुल मराठे यांचे मार्गदर्शन मिळाले.

### मनालीत पार पडले शिबिर

हिमाचल प्रदेशातील मनाली येथे हे शिबिर दिनांक १४ ते २३ ऑक्टोबर या कालावधीत संपन्न झाले.

या शिबिरातील विविध उपक्रम सुयश संपादन करत शुभम रबसे याने हे शिबिर यशस्वी केले. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मनोहर खापणे, सर्व संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.व्ही.एस.पाटील, प्रा.एम.डी.देवरुखकर, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आदी उपस्थित होते.

## जपणूक • हिंदू जनजागृती समितीची राज्य सरकारकडे मागणी; कबरीजवळील बांधकाम पाडले

# भव्य 'शिवप्रताप स्मारक' उभारा

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गेले अनेक वर्षे न्यायालयाने आदेश देऊनही अफझलखानाच्या कबरी भोवतीचे अनधिकृत बांधकाम पाडले गेले नाही. या ठिकाणी अनेक हिंदुत्वनिष्ठ आणि शिवप्रेमी यांची विविध आंदोलने झाली, शिवप्रेमींनी प्रसंगी लाठ्या खाल्ल्या, तुरुंगवास भोगला, तरी काँग्रेसी सरकारांनी याकडे दुर्लक्ष केले; मात्र शिंदे-फडणवीस सरकारने शिवप्रेमींच्या जिव्हाळ्याचा आणि अनेक वर्षे प्रलंबित असलेला अफझलखानाच्या कबरीजवळ झालेले अनधिकृत बांधकाम पाडण्यास आरंभ केला. अफजलखानाचा वधाच्या म्हणजेच 'शिवप्रतापदिना'च्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने हे अनधिकृत बांधकाम पाडण्यास घेतले, या निर्णयाबद्दल हिंदु जनजागृती समितीकडून सरकारचे अभिनंदन करण्यात आले आहे.



### छत्रपती शिवरायांचे सर्व गडकिल्ले अतिक्रमणमुक्त करावेत

छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाच्या ठिकाणी इस्लामिक अतिक्रमण होणे, हे मोगलांचे उदात्तिकरण आणि छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा अपमानच आहे. आज प्रतापगड पायथ्याचे अनधिकृत बांधकाम हटवले जात आहे, याचप्रकारे राज्यातील सर्वच गड-किल्ल्यांवर झालेले इस्लामी अतिक्रमण हटवावे, अशीही मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. हिंदु जनजागृती समिती गेली काही वर्षे या संदर्भात मोठ्या प्रमाणात आंदोलन करत आहे, जागृती करत आहे. कोल्हापूर येथील विशाळगडावर १०० हून अधिक आर्.सी.सी. पद्धतीची अनधिकृत बांधकामे झाली आहेत. तेथे रेहानबाबाचा दर्ग्याचे भव्य स्वरूपात नव्याने बांधकाम करण्यात आले आहे.



### 'कोथळा बाहेर काढला'

छत्रपती शिवरायांनी जसा जुलमी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढून महापराक्रम केला, याच प्रकारे छत्रपती शिवरायांचा पराक्रम दाबण्याचा आणि अल्पसंख्यांकांचे लांगूलचालन करणाऱ्या अनधिकृत बांधकामांचा शासनाने 'कोथळा बाहेर काढला' आहे. आत याच ठिकाणी भव्य 'शिवप्रताप स्मारक' उभारावे, अशी मागणी केली आहे.



### राज्य सरकारने मोहीम हाती घ्यावी

याचप्रकारे पुण्यातील लोहगडावर अनधिकृत थडगे बांधून उरूस साजरा केला जातो. ठाण्यातील मलंगगडावर झालेले अतिक्रमण असो वा किल्ले कुलाबा येथे बांधलेली अनधिकृत मजार असो, ज्या छत्रपती शिवरायांनी राज्यातील जुलमी इस्लामी पातशाह्या संपवून हिंदवी स्वराज्य स्थापले, त्यांच्या किल्ल्यांवर पुन्हा झालेले इस्लामी अतिक्रमणे ही छत्रपतींच्या पराक्रमाचा अपमान करणारीच आहेत. त्यामुळे छत्रपती शिवरायांच्या पराक्रमी इतिहासाचे साक्षी असणाऱ्या सर्वच किल्ल्यांवर झालेली अतिक्रमणे काढण्याची मोहिम राज्य सरकारने हाती घ्यावी.

# चिपळुणातील कार्यकर्ते सहभागी

### 'भारत जोडो' यात्रेला महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

चिपळूण, (वा.) काँग्रेस नेते, खासदार राहुल यांच्या नेतृत्वात कन्याकुमारीहून सुरू झालेल्या भारत जोडो यात्रेला दोन महिने पूर्ण होत असतानाच 'मुझे चलते जाना है; बस चलते जाना..!' म्हणत निघालेले भारतयात्रा नांदेड जिल्ह्यात दाखल झाले आहेत. या यात्रेला महाराष्ट्रात देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या यात्रेत चिपळूण काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत यादव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी महागाई, भ्रष्टाचार तसेच मोदी सरकारच्या मनमानी कारभाराविरोधात भारत जोडो यात्रा गेल्या दोन महिन्यांपूर्वी कन्याकुमारीपासून सुरू केली. या यात्रेला दोन महिने पूर्ण होत असतानाच ही यात्रा महाराष्ट्रात नांदेडमध्ये दाखल झाली आहे. संपूर्ण देशभरात यांच्या या यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



### काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

या यात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, ख़ासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री आणि काँग्रेस नेते आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, खासदार इम्रान प्रतापगडी आदी मान्यवरांसोबत या यात्रेत चिपळूण तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत यादव, चिपळूणचे माजी उपनगराध्यक्ष व शहर काँग्रेसचे अध्यक्ष लियाकत शाह, काँग्रेसच्या अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष अन्वर जबले, युवक काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष रुपेश आवले आदी नांदेड जिल्ह्यातील या पदयात्रेत सहभागी झाले आहेत. या यात्रेच्या निमित्ताने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. या यात्रेच्या निमित्ताने आपापल्या विभागात काँग्रेस मजबूत करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निर्धार व्यक्त केला आहे.

## उपसा बंद; मंडणगड तालुक्याला खेड, दापोलीतून पुरवठा

# वाळूअभावी बांधकामे रखडली

मंडणगड, (वा.) बांधकाम हंगामास सुरुवात होऊन दीड महिना लोटला आहे. अद्याप तालुक्यात स्थानिक पातळीवर विविध कारणांमुळे वाळु उपसा सुरू झालेला नसल्याने मंडणगड तालुक्याला वाळुकरिता खेड व दापोली तालुक्यांवर अवलंबून रहावे लागत आहे. पुरार- खेड राज्यमार्गावर मंडणगड तालुक्यातील वाळूच्या डंपरची वाहतूक लक्षणीयरित्या वाढलेली असल्याने रस्ता अनेक ठिकाणी खराब झालेला असल्याची कैफियत दस्तुरी येथील नागरीकांनी व्यक्त केली आहे. हा मार्ग खेड व दापोली तालुक्यांचा खेड जाणारा मुख्य रहदारीचा रस्ता असल्याने रस्ता नादुरुस्त होण्यास केवळ तालुक्यातून होणारी वाहतूक कारणीभूत नाही, हे वास्तव असले तरी आज अन्य तालुक्यांवर अवलंबून रहावे लागत आहे.



### दर वाढल्याने वाळू सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर

चाळीस किलोमीटर इतक्या लांबीचे अंतरामुळे वाळु दर वाढल्याने बांधकामाच्या किंमती वाढलेल्या असताना वाळु सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्याने छोटी घरे व शासनाच्या अनुदानातील घरांचे प्रकल्प रखडलेले आहेत. बिल्डिंगसाठी लागणारा सर्वप्रकारचा कच्चा माल महागल्यामुळे कोरोनापूर्वी अडीच हजार रुपये प्रति चौरस फूट इतका असणारा दर सध्या चार हजार रुपये चौरस फूट इतका वाढला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना घर बांधताना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे.



### वाळू व्यवसायातील अर्थकारण पूर्णपणे ठप्प

व्यवसायिक कारणांसाठी वापरात येणाऱ्या बांधकामांचा दर तर साते आठ हजार रुपये चौरस फूट इतका महागला आहे. वाळु व्यवसाय व त्यातून निर्माण होणारे अर्थकारण सध्या पूर्णपणे ठप्प असल्याने स्थानिक पातळीवर रोजगार व कमी

दराची वाळू सर्वसामान्यांना उपलब्ध व्हावी, या करिता अधिकृत वाळू उपशाला चालना देण्यासाठी शासनाने पावले उचलणे गरजेचे आहे.

याचबरोबर प्रशासनाचे धोरण कडक असतानाही म्हाप्रळमध्ये सध्या चोरट्या मार्गाने सुरू असलेल्या वाळु उपशाकडे महसूल विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

### शासनाच्या बदलत्या धोरणाचा फटका

शासनाचे बदलले धोरण, प्रशासनाची कार्यपद्धती व वाळु व्यापाऱ्यांमधील परस्पर संघर्ष, यामुळे तालुक्यातील वाळु व्यवसायाचे गेल्या दोन वर्षांपासून कंबरडे मोडले आहे.

तालुक्यात चोरट्या मार्गाने चालणाऱ्या वाळु उपशाचे विरोधात प्रशासनाने गेल्या दोन वर्षांपासून कठोर कारवाई केलेली असल्याने पांरपारीक वाळु उपसा करणाऱ्या म्हाप्रळ, उमरोली, शिपोळे, वेसवी या गावांमध्ये यंदाही वाळु उपसा सुरू झालेला नाही.

## लेफ्टनंट दीपाली गावकर यांचा सत्कार

सावंतवाडी, (वा.) इंडियन एक्स सर्व्हिसेस लिग, डिस्ट्रिक्ट सेंटर, सिंधुदुर्ग व सैनिक नागरी सहकारी पतसंस्था, सावंतवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय सैन्य दलातील नवनियुक्त लेफ्टनंट दिपाली गावकर यांचा सत्कार करण्यात आला. सैनिक नागरी सहकारी पतसंस्था, सिंधुदुर्ग शाखा कोलगांव येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सैनिक पतसंस्थेचे चेअरमन सुभेदार मेजर शिवराम जोशी व आय. ई. एस. एल. चे जिल्हा अध्यक्ष सुभेदार शशिकांत गावडे यांच्या हस्ते गावकर व त्यांचे वडील विजय गावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सैनिक नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक बाबुराव कविटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील राऊळ, भारतीय भूतपूर्व माजी सैनिक संघटनेचे जनरल सेक्रेटरी हवालदार दीपक राऊळ, कुडाळ तालुकाध्यक्ष कॅप्टन विक्टर पिंटो, सैनिक स्कूल आंबोलीचे प्रशिक्षक सुभेदार शिवराज पवार, कार्यालयीन सचिव दीपक राऊळ, समन्वयक एस. एम. चंद्रशेखर जोशी आदींसह अनेक माजी सैनिक व सैनिक नागरी पतसंस्था कर्मचारी उपस्थित होते.

## म्हाप्रळ–आंबेत पूल खुला करण्याची मागणी

# व्यापक जनआंदोलन छेडणार: रघुनाथ पोस्टुरे

मंडणगड, (वा.) मंडणगड तालुक्याच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या म्हाप्रळ आंबेत पुलाचे कामासंर्दभात गेल्या दोन वर्षापासून शासन व प्रशासन चालढकल करीत असल्याने पूल वाहतुकीसाठी खुला करण्याकरिता व्यापक जनआंदोलन करणार असल्याची प्रतिक्रीया सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ पोस्टुरे यांनी पत्रकारांना दिली आहे. या संदर्भात प्रशासनास योग्य ती समज देऊन ३० नोव्हेंबर २०२२ पूर्वी पूल वाहतुकीस खुला करण्याचे आवाहन करण्यात येणार असून ३० नोव्हेंबरपर्यंत पुल वाहतूक खुला न झाल्यास तालुक्यातील तमाम जनतेला गोळा करुन पुलावरील वाहतूक सुरू करणार असल्याची माहिती पोस्टुरे यांनी पत्रकारांना दिली आहे.



### शासनाकडून चालढकल

गेली तीन वर्षे शासन व प्रशासन जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चालढकल करत आहे. पुलाच्या दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च होऊनही वाहतूक मात्र सुरू झालेली नाही. तर वांरवार खंडीत केली जात आहे. वरिष्ठांना या प्रश्नाविषयी काहीच पडलेले नाही, शासनाला जाग आणण्यासाठी तालुक्यात व्यापक जन आंदोलन उभे रहात असून तालुक्यातील जनता सर्व भेद पक्षीय राजकारण विसरुन ही समस्या मार्गी लागण्यासाठी एकत्र येत असल्याचे पोस्टुरे यांनी सांगितले आहे.

## # QUICK NEWS

### नळपाणी योजनेचे भूमिपूजन




बांदा, वा. आरोस-गिरोबावाडी मंदिराजवळील विहिरीच्या लघु नळ योजना कामाचे भूमिपूजन शिवसेना सावंतवाडी संपर्कप्रमुख राजू नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच शंकर नाईक, तंटामुक्त समिती अध्यक्ष राजन नाईक, तसेच दत्ताराम नाईक, जयानंद नाईक, बाबुल नाईक, दाजी नाईक, हरीश रहाटे, गजा सावंत, अक्षय बांदिवडेकर, बाळा शिरोडकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते. पंचायत समिती माजी सदस्य रेश्मा राजू नाईक यांच्या निधीतून सदर काम मार्गी लागल्याचे गुरू नाईक यांनी सांगितले. या कामासाठी शिवसेना मळेवाड जिल्हा परिषद मतदारसंघाचे माजी विभागप्रमुख गुरुनाथ नाईक यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ग्रा.पं.निवडणूक ● गावपुढारी, हौशी कार्यकर्त्यांची तहसील परिसरात गर्दी

# कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू

गुहागर, (वा.) गुहागर तालुक्यात २१ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर सर्वच ग्रामपंचायतीतील हौशी गावपुढारी आणि कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी जोरदार कंबर कसली असून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची जुळवाजुळव करण्याची लगबग दिसून येत आहे. त्यामुळे गुहागर तहसिल कार्यालय परिसरास गावपुढारी आणि हौशी कार्यकर्त्यांच्या वाढत्या संख्येमुळे जत्रेचे स्वरूप आले आहे. निवडणूक आणि राजकारणात मोठ्या प्रमाणात रस असणाऱ्या संभाव्य उमेदवार, कार्यकर्ते व पॅनलचे प्रमुख नेते कागदपत्रांसाठी तहसील कार्यालयात ये – जा करीत आहेत. काही अशिक्षित संभाव्य उमेदवारांची कागदपत्रे काढणे, जमा करून घेण्याची जबाबदारी गावातील पुढाऱ्यांवर येऊन पडते. अर्ज भरण्याची तारीख सुरू असून नियोजित वेळेत भरण्याच्या निर्धारित दिवशीच्या अगोदर कागदपत्रे पुर्णपणे जमा करणे गरजेचे असल्याने कोणत्याही प्रकारचा धोका न घेता सध्या डोळ्यात तेल घालून कागदपत्रे काढण्याची तयारी युध्दपातळीवर सुरू असल्याचे दिसून येत आहे. विशेष करून राखीव जागांसाठी जात वैध्य प्रमाणपत्र महत्वाचे मानले जाते. त्यासाठी आजोबा-वडील यांची जुने दाखले जमा करून स्वतःचा दाखला काढण्याची गडबड सध्या दिसत आहे. कागदपत्रांची पुर्तता करून जात पडताळणी विभागाकडे प्रस्ताव पाठवण्यासाठी आपापल्या परीने जो – तो विश्वास असलेली साखळी शोधत आहे.जेणेकरून तात्काळ आपल्याला जात वैधता प्रमाणपत्र मिळेल नावातील व अर्ज भरण्याची चुका टाळण्यासाठी एक नव्हे तर अनेकजण या कामावर नजर ठेवून आहेत. एरवी दहावी व बारावीच्या निकालानंतर तहसील कार्यालयात दाखले काढण्यासाठी विद्यार्थ्यांमुळे जत्रेचे स्वरूप येते; परंतू आत्ता तब्बल २१ ग्रामपंचायतीच्या निवडणुका आल्याने राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे.



### गावपातळीवरही गटातटाचे राजकारण



गुहागर विधानसभा निवडणुकीनंतर झालेल्या सत्तांतरानंतर तालुक्यातील निम्म्यापेक्षा जास्त ग्रामपंचायत निवडणुकीचा बिगुल वाजल्याने सर्वच राजकीय पक्ष व कार्यकर्त्यांनी कंबर कसली असून तालुक्यात वर्चस्व स्थापन करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. अनेक गावात विद्यमान सत्ताधारी विरूध्द विरोधक तर अनेक गावात स्वतःच्या सोयीनुसार गट करून आपल्याचे वर्चस्वाखाली ग्रामपंचायत असावी म्हणून एकाच पक्षातील एकापेक्षा जास्त गट सक्रिय झाले असल्याचे दिसून येत आहे.

### आरक्षणामुळे अनेकांना संधी

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत जातीय समीकरणे महत्वाची मानली जातात. ज्या वार्डात ज्या समाजाची मते अधिक असतात त्याच समाजाचा उमेदवार देण्याची धडपड दिसून येते. तर संपूर्ण गावात ज्या इतर समाजाची मते निर्णायक असतात त्यांची उमेदवारी साठी प्राधान्य दिले जाते. तर आरक्षणामुळे अनेकांना संधी मिळते, त्याचबरोबर दोन समाज एकत्र येऊन कशी निवडणूक जिंकता येईल याची व्यूहरचना केली.

# नरेंद्राचार्य संस्थानचे कार्य दखलपात्र

## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे प्रतिपादन

रत्नागिरी, (वा.) विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचे व ती वृद्धिंगत करण्याचे कार्य जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान अतिशय व्यापकपणे करत आहेत. त्यांचे गोव्यातील कार्य दखलपात्र आहे, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

ओल्ड गोवा येथे जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थांच्या सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी संतपीठावर जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज उपस्थित होते. संस्थानच्या उपपीठ गोवातर्फे सोमवारी त्रिपुरारी पौर्णिमा सोहळा उत्साहात झाला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या सोहळ्यात सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून गोवा येथील गरजू महिलांना उदरनिर्वाहासाठी १६ घरघंट्यांचे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ፣मी या सांप्रदायाशी बऱ्याच वर्षांपासून जोडला गेलो आहे. सर्व प्रथम जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराजांच्या पुढाकारातून वास्को येथे रक्तदान शिबीर झाले. त्यावेळी मी डॉक्टर या नात्याने रुग्णतपासणी केली होती. त्यानंतर सातत्याने मी या सांप्रदायाशी जोडलो गेलो. आज हा स्व-स्वरूप सांप्रदाय कार्यरूपाने कितीतरी पुढे गेला आहे, या सांप्रदायातर्फे समाजासाठी विविध उपक्रम राबविले जातात.



### गरजू महिलांना घरघंटीचे वाटप

एव्हढेच नसून पुरग्रस्तांना मदत, गरीब शेतकऱ्यांना गाय, म्हैस, शेळयाचं वाटप, चाऱ्याचे वाटप करण्यात येते. संस्थानची रुग्णवाहिका सेवा उपयुक्त आहे. असे अनेक उपक्रम जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान राबवित आहे. या पुढे माझ्या सरकारकडून जेवढी मदत करता येईल तेवढी करणार आहे. यावेळी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक, वीजमंत्री सुदिन ढवळीकर, आमदार संकल्प आमोणकर, आमदार जीत आरोलकर, आमदार केदार नाईक यांची भाषणे झाली. यावेळीं वास्कोचे आमदार श्रीकृष्ण उर्फ दाजी साळकर, कुंभार जुवाचे आमदार राजेंद्र फळदेसाई, मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर, वंदरेचे जित अलोरकर, ओल्ड गोवा सरपंच सेन्द्रा पिदादी गोंसालविस, मये मतदारसंघाचे प्रेमेंद्र शेट आदी उपस्थित होते.

## राज्य कुस्तीगीर परिषद बरखास्तीचा निर्णय

# राष्ट्रीय कुस्ती महासंघाला दणका

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद बरखास्तीचा निर्णय बेकायदा असल्याचे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाने राष्ट्रीय कुस्ती महासंघाला दणका देत शरद पवार गटाला मोठा दिलासा दिला आहे. महासंघाने कुस्तीगीर परिषद अथवा कार्यकारिणीतील सदस्यांची बाजू ऐकून न घेताच परिषद बरखास्त करण्याचा घेतलेला निर्णय हा मनमानी असल्याचे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे.

महाराष्ट्र कुस्तीगीर संघाची कार्यकारणी तातडीने बरखास्त करून नव्याने समिती नियुक्त करण्याच्या करण्याच्या निर्णय घेण्यात आला. अचानकपणे ही संघटना बरखास्त करण्याचा राष्ट्रीय कुस्तीगीर परिषदेचा निर्णय हा नैसर्गिक असल्याचा दावा करत बाळासाहेब लांडगे यांनी उच्च न्यायालयात याचिका केली होती. निवडणूकीचे निकाल जाहीर करण्यास न्यायालयची मनाई असतानाही अध्यक्षांनी सोशल मीडियावर बिनविरोध निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले, ज्यावरून याचिकाकर्त्यांनी त्यांच्याविरोधात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्या. संदीप शिंदे यांच्यासमोर सुनावणी पार पडली. तेव्हा, न्यायालयाने नुकताच निर्णय दिला आहे.

### शरद पवार गटाला उच्च न्यायालयाचा दिलासा

कोणत्याही परिस्थितीत, संघटनेकडून निवडलेली संस्था विसर्जित करणे ही एक कठोर कृती आहे आणि म्हणून राष्ट्रीय कुस्ती महासंघाने चुकीचा निर्णय घेण्यापूर्वी याचिकाकर्त्यांच्या निवडून आलेल्या सदस्यांना बाजू मांडण्याची पुरेशी संधी दिली पाहिजे होती, असे न्यायालयाने मत व्यक्त केले. विशेषतः लांडगे यांच्याविरोधात काही कुस्तीपटूंनी केलेल्या कथित तक्रारी राष्ट्रीय कुस्ती महासंघाकडे केव्हा आणि कशा पाठवल्या गेल्या याविषयी माहिती उपलब्ध नाही, त्यामुळे या तक्रारींवर संशय उपस्थित करून राष्ट्रीय कुस्ती महासंघाच्या एकूणच कार्यपद्धतीवर विश्वास ठेवण्यास खंडपीठाने नकार दिला.

## दिव्यांगांसाठी मतदार नोंदणी शिबिर



रत्नागिरी, (वा.) उपविभागीय जिल्हाधिकारी रत्नागिरी, तहसीलदार रत्नागिरी व आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष मतदार नोंदणी शिबिर शनिवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी, छत्रपती शिवाजी स्टेडियम, मच्छी मार्केटसमोर मारुती मंदिर रत्नागिरी येथे दिव्यांगांसाठी विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये दिव्यांग व्यक्तींची मतदार नोंदणी,मतदार यादीतील नाव दुरुस्ती वा वगळणे इत्यादीचे अर्ज भरून घेण्यासोबतच दिव्यांग व्यक्तींचे मतदार यादीतील नोंद चिन्हांकित करणे असे कामकाज चालणार आहे. निवडणूक आयोग मतदानाच्या दिवशी दिव्यांगांना पुरवत असलेल्या सुविधांबाबत माहिती देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

# वरवेलीत खडी क्रशरला विरोध

## ग्रामसभेत ग्रामस्थ आक्रमक

वरवेली, (वा.) गुहागर तालुक्यातील वरवेली ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणाऱ्या खडी क्रशर व मोठ्या प्रमाणत होणाऱ्या काळ्या दगडाच्या उत्खननाला वरवेली ग्रामस्थांनी विरोध केला असून पावसाळ्यापूर्वी तसेच पावसाळ्यानंतरही प्रचंड प्रमाणात चालणाऱ्या उत्खननामुळे या क्रशर परिसरातील फळबागा, शेती धोक्यात आल्या असून येथील बोअरवेल, विहीरीतील पाणी साठ्यावर विपरीत परिणाम होत आहे. यामुळे येथील शेतकरी, नागरिकांचे प्रचंड नुकसान होत आहे.

तसेच या ठिकाणी सुरुंग लावत असल्यामुळे परिसरातील घरांना तसेच घरांच्या भिंतीना तडे जात असल्याचा घटना घडत आहेत. दिवस रात्र सतत उत्खनन तसेच वाहतूक होत असल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने तसेच शासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी ग्रामसभेत केली. उपास्थित सर्वच नागरिकांनी खडी क्रशर व काळा दगड उत्खननापासून होणाऱ्या त्रासाची माहिती ग्रामसभेपुढे व्यक्त केली. खडी क्रशर व काळा दगड उत्खनन विरोधी नागरिकांमध्ये उद्रेक निर्माण झाला आहे. अंजनवेल येथील कोकण एलएनजीच्या ब्रेक वॉटरचे काम एलअँडटी कंपनीने घेतले असून या कामासाठी दिवसातून हजारो टन काळ्या दगडाचे उत्खनन केले जात आहे. दिवसातून शेकडो डंपर काळ्या दगडाची वाहतूक करत आहेत.



### ग्रामपंचायतीकडून मालकाला नोटीस

वरवेली ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात असलेला खडी क्रेशर व काळा दगड उत्खननामुळे वरवेली ग्रामस्थांना होत असलेल्या त्रासाबाबत वरवेली ग्रामपंचायतीच्यावतीने खडी क्रशर मालक दीपक पवार यांना ग्रामसभेच्या निर्णयानुसार, सूचना पत्र क्रशरस्थळी जाऊन देण्यात आले. या सूचना पत्रात म्हटले आहे की, वरवेली ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात खडी क्रशर व काळा दगड उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरू आहे. फळबाग लागवड शेतकऱ्यांच्या आंबा, काजू व इतर लागवड यांच्यावर मोठ्या प्रमाणत धूळ बसत आहे. तरी याबाबत त्वरित खबरदारी न घेतल्यास विनाकारण ग्रामस्थांच्या तक्रारींना सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला आहे.

### शेती, धोक्यात; सुरुंगामुळे घरांना तडे

सर्वच शेती, फळबागावर धुळीचा परिणाम होत आहे. येथील होणाऱ्या सुरुंगामुळे गावातील पाणीसाठे धोक्यात आले आहेत. दिवस- रात्र उत्खनन सुरू असते, त्यामुळे या क्रशर शेजारी असणाऱ्या वस्त्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. येथे लावणाऱ्या सुरुंगामुळे परिसरातील घरांना तडे जाण्याचे प्रकार घडत आहेत. दिवसभर कष्ट करून रात्रीच्यावेळी नागरिक विश्रांती घेत असतात; परंतु येथे होणाऱ्या सततच्या सुरुंगामुळे नागरिकांना आवाजाचा त्रास सहन करावा लागत आहे.

## पाच जण ताब्यात; पळताना अनेकांची घाबरगुंडी

# जत्रेतील जुगारावर पोलिसांची धाड

सावंतवाडी, (वा.) सावंतवाडी शहरालगत असलेल्या एका गावात गुरुवारी मध्यरात्री जत्रोदरम्यान सुरू असलेल्या जुगारावर कारवाई करत पोलिसांनी पाच जणांच्या मुसक्या आवळल्या. दस्तूर खुद्द सावंतवाडी पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. रोहिणी सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी ही कारवाई केली.

या कारवाईत अनिल सुमन नाईक (झिंरगवाडी), साईद नासीर शेख (कोलगाव ), दिपक न्हानु राऊळ (कोलगाव भोमवाडी), नितेश दत्ताराम म्हाडगुत (लाडाचीबाग ), केतन पुरुषोत्तम देऊलकर (जुनाबाजार सावंतवाडी) हेमंत शांताराम राऊळ (कोलगाव) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

दरम्यान, पोलीस दाखल झाल्याचे कळताच जुगाराच्या ठिकाणी उपस्थित लोकांनी अक्षरशः धूम ठोकली. यात काही लोकांची चिखलात घसरगुंडी होऊन काहीजण जखमी झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मंदिराच्या मागील भागात हा जुगार सुरू होता.



### मंदिराच्या मागील बाजूला अड्डा

याबाबत पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत जुगारावर धाड टाकली. पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. रोहिणी सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सचिन कोयंडे, रामदास चव्हाण, सचिन सोन्सुरकर यांनी ही कारवाई केली. दरम्यान, जत्रोत्सवाच्या पहिल्या टप्प्यातच झालेल्या या जुगारावरील या कारवाईमुळे जुगारी लोकांचे धाबे दणाणले आहेत. तर स्थानिक नागरिकांमधून मात्र या कारवाईबाबत समाधान व्यक्त होत आहे.

## धक्कादायक • मनाप्रमाणे शिक्षण घेता येत नसल्याची सल; खेडमधील अल्पवयीन मुलाचे कृत्य

# मुलाने रचला स्वतःच्या अपहरणाचा बनाव!

खेड, (वा.) आपल्याला मनाप्रमाणे शिक्षण घेता येत नसल्याने एका अल्पवयीन विद्यार्थ्याने स्वतःच्याच अपहरणाचा बनाव रचला. खेड तालुक्यात हा प्रकार घडला. खेड पोलिसांनी मुलाचा शोध घेत केवळ एका रात्रीतच या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावला. बारावीच्या शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा रस नाही. कारण मला आयटीआयमध्ये शिक्षण घ्यायचे आहे. पण घरच्यांना ही गोष्ट सांगू शकत नसल्याने अपहरणाचा बनाव रचल्याची कबुली या अल्पवयीन मुलाने दिली. एखाद्या चित्रपटाला शोभावी अशीच ही घटना आहे. पण त्याच वेळेला पालकांना देखील अंतर्मुख करुन विचार करायला ही घटना भाग पाडते.



### ...म्हणून विद्यार्थ्याने स्वतःच्या अपहरणाचा बनाव रचला!

पोलिसांनी मुलाची चौकशी केली. त्यावेळी अल्पवयीन मुलाने सांगितले की, 'बारावीच्या शिक्षणात मला रस नव्हता. मला आयटीआयमध्ये शिक्षण घ्यायचे होते. पण ही बाब मी घरातील कोणालाही सांगू शकत नव्हतो. त्यामुळेच मी घर सोडून निघालो आणि अपहरणाचा बनाव रचला.

त्यानंतर पोलिसांनी या मुलाचे समुपदेशन करुन त्याला पालकांच्या ताब्यात दिले. ज्यावेळी ही घटना समोर आली. त्यावेळी मात्र मुलाने सांगितलेले कारण प्रत्येकाला विचार करायला भाग पाडणारे असेच आहे.

### पालकांना अंतर्मुख करणारी घटना

- असे म्हणतात की, सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. तुम्हाला या स्पर्धेत टिकायचं असेल तर शिक्षण देखील तितकंच महत्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलाच्या शिक्षणाकडे सध्या अतिशय गंभीरपणे पाहताना दिसून येत आहेत.
- अगदी एखादा विषय किंवा शाखा निवडताना देखील सर्व बाजूंचा पुरेपूर विचार केला जातो.
- या साऱ्या गोष्टींमध्ये विद्यार्थ्यांवरती दडपण देखील येत असल्याच्या गोष्टी समोर येत आहेत.
- त्यातूनच विद्यार्थ्यांकडून असे प्रकार घडतात. त्यामुळे पालकांनीही या गोष्टीकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

### नेमके काय घडले?

खेड पोलीस स्टेशनमध्ये ९ नोव्हेंबर रोजी एका व्यक्तीने आपल्या सतरा वर्षांच्या पुतण्याचं अपहरण झाल्याची तक्रार नोंदवली होती. दरम्यान, ज्यावेळी मुलाशी संपर्क साधण्यात आला, त्यावेळी त्याने मला चोरांनी पकडून परजिल्ह्यात नेले आहे. कशीबशी मी माझी सुटका केली. आता एका ठिकाणी मी आश्रयाला थांबलो आहे, अशी माहिती या मुलाने त्याच्या काकांना दिली. त्यानंतर या मुलाशी संपर्क तुटला होता. रत्नागिरी पोलिसांनी तातडीने याबाबत पाऊले उचलली. पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करण्यात आले. मुलाच्या शोधाला सुरुवात झाली. मुलाचा शोध घेण्यास पोलीस पथकाला देखील यश आले. एका रात्रीत या मुलाचा शोध लागला होता. ही बाब समाधानाची होती.

# दशावतार कलाकारांची किमया महान

## प्रेमानंद देसाई यांचे प्रतिपादन

दोडामार्ग, (वा.) कोकणाला कला क्षेत्रात सुवर्णयुग सर्वच दशावतार कलाकार आणत आहेत, त्या कलाकारांची किमया महान आहे. यात आता पिकुळे येथील दशावतार कंपनी मोलाची भूमिका बजावेल, एका ग्रामीण भागातील कलाकार शत्रू गवस यांनी दशावतार क्षेत्रात योगदान दिले आणि आता स्वतः कंपनी काढून मालक बनले, हा प्रवास कौतुकास्पद असून वर्षभरात शतकी नाटयप्रयोग या कंपनीने साकारावेत, असे प्रतिपादन सरपंच सेवा संघ जिल्हाध्यक्ष प्रेमानंद देसाई यांनी केले. केर चव्हाटा मंदिर येथे आयोजित नाट्यप्रयोगादरम्यान सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी देसाई यांच्या समवेत तुकाराम देसाई, नारायण देसाई, प्रदीप देसाई, गोपाळ देसाई, विष्णू देसाई, काशीराम धुरी, राजन नाईक आदीसह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. पिकुळे येथील शत्रू गवस हे गेली अनेक वर्षे दशावतार रंगभूमीवर नारद भूमिका साकारतात. अतिशय कष्टमय प्रवास करत त्यांनी कोकणच्या कलेत योगदान देणे सुरू ठेवले आहे. यावर्षी त्यांनी सिद्धीविनायक दशावतार कंपनी नव्याने स्थापन केली.



### रसिकांचे प्रेम आणि कलाकारांची साथ : शत्रू गवस

आपण स्वतःची नाट्य कंपनी सुरू करण्याचा विचार केला. मात्र, कोणतीही जमा पुंजी नव्हती, केवळ रसिकांचे प्रेम आणि कलाकारांची साथ होती. त्यामुळे हे धाडस करू शकलो. आदर्श गावाने आपला केलेला सन्मान आम्हाला प्रेरणा देणारा ठरेल, असे गवस म्हणाले.

CMYK

## मनीष दळवी; जिल्हास्तरीय इको फ्रेंडली गणेशमूर्ती प्रदर्शनाचे उद्घाटन

# जिल्ह्यातील मूर्तींचे वेगळेपण जपा

कुडाळ, (वा.) सिधुदुर्ग जिल्ह्यातील गणेशमूर्तींचे वेगळेपण राज्यातच नव्हे तर देशातही आहे आणि हे वेगळेपण व्यवसायिक स्वरूपाच्या माध्यमातून पुढे नेण्याची गरज आहे ही कला टिकवण्यासाठी कुठल्यातरी यंत्रांची पाठबळ आहे, म्हणून जिल्हा बँकेने पुढाकार घेतला आहे, असे प्रतिपादन जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी यांनी शुक्रवारी गणेश मूर्ती कार्यशाळा प्रदर्शन मेळाव्यात केले. सिंधुदुर्ग जिल्हा बँक, श्री गणेश मूर्तिकार संघ सिंधुदुर्ग व भगिरथ ग्रामविकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय इको फ्रेंडली गणेश मूर्ती प्रदर्शन व स्पर्धा ११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत ओंकार डिलक्स, हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी सावंतवाडी संस्थांचे युवराज लखमराजे भोसले यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार प्रमोद जठार सिंधुदुर्ग जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी, जिल्हा बँक उपाध्यक्ष अतुल काळसेकर,श्री गणेश मूर्तीकार संघटनेचे अध्यक्ष नारायण सावंत, बँक संचालक विद्याप्रसाद बांदेकर, आत्माराम ओटवणेकर, नीता राणे, गणपत देसाई समीर सावंत मुख्य कार्यकारी प्रमोद गावडे नगरसेविका प्राजक्ता बांदेकर नयना मांजरेकर आदी उपस्थित होते.



### पर्यावरण जपणे काळाजी गरज : युवराज लखमराजे भोसले

युवराज लखमराजे यांनी सांगितले की, आपण पर्यावरण जपले पाहिजे, भविष्यात पर्यावरणाची जोपासना न केल्यास अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल. आपण गणेश मूर्ती बनवतो, त्यासाठी वापरणारा रंग हा ऑइलपेंट असतो, तो रंग बदलून ऑरगॅनिक रंग या गणेशमूर्तीसाठी वापरण्याची काळाची गरज असल्याने स्पष्ट केले.

जिल्हा बँक अध्यक्ष दळवी म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८० हजारांहून अधिक गणेश मूर्ती केल्या जातात. यातून सुमारे २०० कोटींची उलाढाल होते.

जास्त उलाढाल झाली पाहिजे, या गणेशमूर्ती घडविण्याला व्यवसायाचे स्वरूप मिळाले पाहिजे, यासाठी जिल्हा बँकेने वाटचाल केली आहे, असे सांगितले. आमदार प्रमोद जठार म्हणाले की, कलेला राजाश्रयाची गरज आहे. गणेश मूर्ती प्रदर्शन व स्पर्धा या वेगळ्या विषयाला अनुसरून जिल्हा बँकेने या कलेला व्यवसायाच्या माध्यमातून प्रोत्साहन देऊन जी वाटचाल केली. ती अतिशय कौतुकास्पद आहे. अशा प्रकारच्या कलेच्या माध्यमातून हजारो वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचे जतन केले जात आहे. आपल्या या कलेला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाताना विविध कलांतून या जिल्ह्यात पर्यटक मोठ्या प्रमाणात यावेत, असा संकल्प करूया, असे सांगितले.

### जिल्ह्यातील १२० मूर्तीकारांचा सहभाग

जिल्ह्यातील १२० गणेश मूर्तिकार इको फ्रेंडली गणेश मूर्ती प्रदर्शनात सहभागी झाले हे प्रगतीचे द्योतक असल्याचे सांगितले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा १३ नोव्हेंबरला सायंकाळी ३.३० वा माजी खासदार निलेश राणे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

जिल्ह्यातील गणेश भक्तांना १२० अप्रतिम कलाकृती पाहण्याची सुवर्णसंधी लाभणार आहे. शनिवारी १२ व १३ नोव्हेंबरलाअक्षय मेस्त्री,घोडगे सिध्देश तेली,परूळे यांना मूर्तिकार प्रात्यक्षिकांसाठी निमंत्रित करण्यात आले असून गणेश भक्तांना या दोन दिवशी गणेश मूर्ती घडत असतानाचे प्रात्यक्षिक पहाता येणार आहे.

### गणेशमूर्ति कार्यशाळा कौतुकास्पद उपक्रम : अतुल काळसेकर

अतुल काळसेकर हे म्हणाले की, गणेश मूर्ती कार्यशाळा हा कौतुक करण्याचा उपक्रम आहे.

पेणमध्ये पीओपीचे हब आहे तसा पर्यावरण पूरक गणेशमूर्तींचा हब सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाला पाहिजे, जिल्ह्यात गणेशशाळाऐवजी गणपतीचा कारखाना झाल्यास व्यवसायिक स्वरूप प्राप्त होईल, असे सांगितले.

## बांद्यात खासगी मोबाईल कंपनीची मनमानी

बांदा, (वा.) स्थानिक प्रशासनाची परवानगी न घेता शहरातील पाटो पूल ते मच्छिमार्केट रस्त्यावर खासगी मोबाईल कंपनीने केबल टाकण्यासाठी केलेली रस्त्याची खोदाई बांदा ग्रामपंचायत प्रशासनाने रोखत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. स्थानिक प्रशासनाच्या कारवाईच्या बडग्यामुळे मोबाईल कंपनीने नमते घेत रस्त्याची डागडुजी करण्यासाठी १४ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा धनादेश ग्रामविस्तार अधिकारी लीना मोर्ये यांच्याकडे सुपूर्द केला. शहरातील ग्रामीण मार्ग क्रमांक १०१ हा राष्ट्रीय महामार्ग पाटो पूल ते मच्छिमार्केट आसा जातो. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. २२ मे रोजी पावसाळ्याच्या तोंडावर केबल टाकण्यासाठी खासगी मोबाईल कंपनीने स्थानिक प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदा खोदाई केली. पावसाळ्यात डांबरीकरण करणे शक्य नसल्याने रस्त्याची डागडुजी करणे कठीण होते. याची माहिती मिळताच सरपंच अक्रम खान, ग्रामपंचायत सदस्य बाळू सावंत, साईप्रसाद काणेकर, राजेश विरनोडकर यांनी आक्रमक पवित्रा घेत काम बंद पाडले.

## मनसेचे पोलीस निरीक्षकांना निवेदन

# 'धूम स्टाईल'दुचाकी चालवणाऱ्यांना आवरा



सावंतवाडी, (वा.) धूम स्टाईल गाड्या हाकणाऱ्या शहरासह परिसरातील महाविद्यालयीन युवकांना आवरा, आवश्यक असल्यास त्यांच्यावर कारवाई करा, अशी मागणी शुक्रवारी येथील मनसेच्यावतीने सावंतवाडी पोलिसांकडे करण्यात आली आहे. बेदकार वाहने चालवल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. याचा नाहक मनस्ताप सर्वसामान्य लोकांना सहन करावा लागत आहे. तशा तक्रारी काही नागरिकांनी आमच्याकडे केल्या आहेत. त्यामुळे याकडे गांभीर्याने लक्ष द्यावेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान येत्या एक-दोन दिवसात नाकाबंदी करून अशा बाईक स्वारांवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन पोलिसांकडून देण्यात आले. याबाबतचे निवेदन सहाय्यक पोलीस निरीक्षक तौसीफ सय्यद यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष आशिष सुभेदार, तालुका उपाध्यक्ष प्रकाश साटेलकर, उपशहर अध्यक्ष शुभम सावंत, प्रवीण गवस आदी हजर होते.

### कारवाई करण्याचे आश्वासन

पोलिसांनी या मागणीची दखल घेत येत्या दोन ते तीन दिवसांतच महाविद्यालयीन धूम स्टाईल बाईकस्वारांवर कारवाई करण्यास सुरुवात केली जाईल, त्यासाठी शहरात नाकाबंदी करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

# QUICK NEWS

## रस्त्यासाठी ग्रामस्थांचे उपोषण

दोडामार्ग, वा. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला रस्ता खुला करण्याच्या आदेशाचा अवमान करून सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता बंद केल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी, या मागणीसाठी माजी सरपंच व विद्यमान सदस्य नामदेव धर्णे यांनी त्या प्रभागातील ग्रामस्थांसह साटेली भेडशी ग्रामपंचायतीसमोर शुक्रवारपासून साखळी उपोषण सुरू केले आहे. साटेली येथील स. नं. ६५ हि. नं. ४ मधून वार्ड नं. ४ मधे जाणारा रस्ता वहिवाट केस नं. ४/२०१८ बाबत अप्पर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या झालेल्या निर्णयानुसार, रस्ता खुला करुन दिलेल होता. परंतु तो रस्ता अप्पर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची पायमल्ली करुन वीरभद्र सावंत, अमित परब किरण परब, सिताबाई परब, तसेच अन्य व्यक्तींनी तो रस्ता पुन्हा बंद केला, असे म्हणणे आहे. त्यामुळे रस्ता कायम स्वरुपी खुला करावा, या मागणीसाठी उपोषण सुरू आहे.

## राजकारण • केसरकरांनी जनतेच प्रश्न सोडवावेत: साळगावकर

# प्रवक्तेगिरी काय कामाची?

सावंतवाडी, (वा.) मंत्री दिपक केसरकर यांनी आपण कधीही भाजपात जाणार नाही, अशी घोषणा करावी नुसता लोकात भ्रम पसरवू नये जी आश्वासने दिलीत त्यातील अर्धी तरी कामे करावीत नुसते प्रवक्तेगिरी करून लोकांचे प्रश्न सुटणार नाहीत, असा टोला आज येथे माजी नगराध्यक्ष बबन साळगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिला दरम्यान, राजघराण्याची जागा वादात असल्यामुळे ती मिळणार नाही, हे माहीत असताना केसरकर यांनी ती जागा सुचविली.

मात्र, यापूर्वीच बाहेरचावाडा येथिल जागा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी आरक्षीत ठेवण्यात आली आहे, ती जागा संपादीत करून रेंगाळलेला प्रश्न मार्गी लावावा, असे त्यांनी सांगितले. साळगावकर हे शुक्रवारी पत्रकारांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, या ठीकाणी केसरकर यांनी गेल्या तेरा वर्षात नुसत्या घोषणा करण्याचेच काम केले आहे. विकासाचे कोणतेही प्रश्न सुटले नाहीत, या ठिकाणी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा प्रश्न सुटणे गरजेचे होते; परंतू दुर्दैवाने तसे झाले नाही तर राजघराण्याची जागा आहे, त्यावर दावा आहे, हे माहीत असताना सुध्दा त्यांनी या ठिकाणच्या जागेसाठी आग्रह धरला आणी भूमिपूजन केले.



### विकासाच्या नावावर मतदारांमध्ये भ्रम

साळगावकर पुढे म्हणाले की, केसरकरांनी नेहमी विकासाच्या नावावर मतदारांमध्ये भ्रम निर्माण करण्याचे काम केले आहे. येथिल रघुनाथ मार्केटचे तब्बल चार ते पाच वेळा उदघाटन करण्यात आले. त्या ठिकाणी दोन ते तीन दिवसांसाठी महिलांना उभे करून ठेवण्यात आले. मात्र, त्यानंतर ते बंद ठेवण्यात आले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे अशा प्रकारे अनेक आश्वासने देण्यापेक्षा त्यांनी किमान एक तरी काम पूर्ण करावे. असे सांगितले. सोनुर्लीच्या माउली मंदीरात झालेल्या चोरीचा प्रश्न का सुटला नाही? असा ही त्यांनी प्रश्न केला.

### सावंतवाडीत महा रक्तदान शिबिर

गोव्याशी असलेले रक्ताचे नाते जपण्यासाठी सावंतवाडीत महा रक्तदान शिबिर २१ तारखेला आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत- जास्त रक्तदात्यांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. गोवा बांबुळी येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना रक्त मिळताना अडचणी निर्माण होवू नयेत, यासाठी सावंतवाडीतील सामाजिक संघटनांच्या माध्यमातून महारक्तदानर शिबिर आयोजित करून गोवा व सिंधुदुर्गमध्ये असलेले रक्ताचे नाते जपले जाणार आहे, अशी घोषणा येथे आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांच्या माध्यमातून करण्यात आली.

## हिंदू हितचिंतक अभियानाचा शुभारंभ

वेंगुर्ले, (वा.) विश्व हिंदू परिषदेच्या हिंदू हितचिंतक अभियानाचा शुभारंभ हभप सावळाराम कुर्ले महाराजांच्या शुभहस्ते येथील विठ्ठल मंदिरात वारकरी संप्रदायाच्या मंडळीसोबत करण्यात आला. यावेळी श्री देव रामेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रवींद्र परब यांच्या हस्ते सावळाराम कुर्ले बुवांचा पंढरपुरची अखंड वारी करीत असल्याबद्दल सत्कार करण्यात आला. संपूर्ण देशभर विश्व हिंदू परिषदेने ६ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत हिंदू हितचिंतक अभियान आयोजित केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला असून वेंगुर्ले तालुक्यांमध्ये वारकरी संप्रदायाच्या मंडळी सोबत या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पंढरपुरची कार्तिकी वारी करुन आलेल्या वारकरयांचा सन्मान विश्व हिंदू परिषद, प्रखंड- वेंगुर्लेच्यावतीने करण्यात आला. विश्व हिंदू परिषदेचे जिल्ह्याचे सामाजिक समरसतेचे प्रमुख विष्णु खोबरेकर यांनी हितचिंतक अभियानाची माहिती दिली. तसेच सर्व हिंदूंनी एकत्रित येण्याची गरज असल्याचे सांगितले.

## ओव्हरलोड चिरे वाहतूक; ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन

# गावराई रस्त्याची दुरवस्था

कुडाळ, (वा.) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून नव्याने करण्यात आलेल्या गावराई येथील रस्त्याची ओव्हरलोड चिरे वाहतुकीमुळे दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरून भरधाव चालणाऱ्या या वाहतुकीमुळे शालेय मुले व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावरून होणाऱ्या ओव्हरलोड वाहतुकीवर प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करावे लागेल, असा इशारा गावराई ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना तसेच कुडाळ तहसीलदार याना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

कुडाळ तालुक्यातील गावराई-धनगरवाडी सडा या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून गेली चार वर्षे रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, सुरू असलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे. मात्र, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यात गरज नसताना खोदकाम केले जात असून ही माती शेतात जाऊन शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नसतानाही या रस्त्यावरून हेदुळ गावातील चिरे खाणीतून उत्खनन होणाऱ्या चिऱ्यांची वाहतूक करणारे डंपर सुसाट वेगाने जात आहेत.



### ओव्हरलोड वाहतूक बंद करण्याची मागणी

नव्याने होत असलेल्या रस्त्यावरून ओव्हरलोड वाहतूक होत असल्याने रस्त्याची दुरावस्था झाली आहे. तसेच या रस्त्यावरून शाळकरी मुले आणि ग्रामस्थांची ये- जा सुरू असते. मात्र, या रस्त्यावरून ओव्हरलोड वाहतूक होत असल्याने शाळकरी मुले व ग्रामस्थांच्या जीवितास धोकादायक ठरत आहे. दोन दिवसापूर्वीच या रस्त्यावर चिरे वाहतूक करणाऱ्या डंपर ब्रेक फेल होऊन रस्त्याच्या कडेला कलंडला होता. यावेळी समोरून येणारा दुचाकीस्वार थोडक्यात वाचला होता. यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या प्रकाराबाबत संतापही व्यक्त केला जात आहे. त्यामुळे गावराई ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांची व कुडाळ तहसीलदार यांची भेट घेत निवेदन सादर केले. तसेच या रस्त्यावरून अवजड वाहनांना बंदी घालावी. चिरे वाहतूक बंद करावी अशी मागणी केली आहे. यावेळी गावराई सरपंच उदय नारळीकर, पोलीस पाटील स्वप्नील वेंगुर्लेकर, गितेश राऊत, अमित राणे, मिलिंद तावडे, निलेश आंगणे, गोविंद फाले आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्त उपस्थित होते.

## नीलेश मोरजकर यांनी घेतली भेट

# शिवविचार मनामनात पोहोचावेत : डॉ. कोल्हे



बांदा, (वा.) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तृत्त्वाचा इतिहास तळागाळात पोहोचविण्याचे काम आपण श्री स्वराज्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून करत आहात, हे कौतुकास्पद असून ही काळाची नितांत गरज आहे. भविष्यात श्री शिवशंभू प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने शिवविचार प्रत्येकाच्या मनामनात पोहचविण्याचे पवित्र कार्य करण्यासाठी आपण निश्चितच आपल्याला सहकार्य करू, असे आश्वासन खासदार तथा अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी दिले. श्री स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष निलेश मोरजकर यांनी खासदार डॉ. कोल्हे यांची पुणे येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत राकेश केसरकर उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर खासदार कोल्हे यांच्याशी चर्चा करण्यात आली. सक्षम व संवेदनशील युवा पिढी घडवायची असेल तर शिवविचार तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत. यासाठी स्पर्धात्मक उपक्रम राबवा अशा सूचना डॉ. कोल्हे यांनी दिल्या.

# १५ पैकी १३ जागा बिनविरोध

## 'सिंधुदुर्ग पोस्टल एम्प्लॉइज' मालवण कर्मचारी संस्थेची निवडणूक

सिंधुदुर्गनगरी, (वा.) सिंधुदुर्ग पोस्टल एम्प्लॉइज को ऑप सोसायटी लिमिटेड मालवण या कर्मचारी संस्थेची निवडणूक बिनविरोध झाली आहे. १५ पैकी १३ जागा बिनविरोध झाल्या असून दोन जागा रिक्त राहिल्या आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकृष्ण मयेकर यांनी दिली. सिंधुदुर्ग पोस्टल एम्प्लॉइज को ऑप सोसायटी लिमिटेड मालवण या कर्मचारी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक कार्यालय यांच्यावतीने जाहीर करण्यात आली होती. यासाठी १४ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मदत होती. १ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. तर आवश्यकता भासल्यास १२ नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार होती. या संस्थेसाठी एकूण १५ संचालक निवडून द्यायचे होते. यात सर्वसाधारण मतदार संघातून दहा संचालक, दोन महिला प्रतिनिधी, एक इतर मागास प्रवर्ग, एक अनुसूचित जाती जमाती प्रतिनिधी आणि एक भटक्या विमुक्त जाती, जमाती व विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी असा प्रवर्ग निहाय समावेश आहे. १५ पैकी एक महिला प्रतिनिधी आणि इतर मागास प्रवर्ग यासाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नव्हता. त्यामुळे या जागा रिक्त राहिल्या आहेत. तर उर्वरित १३ जागांसाठी १९ अर्ज दाखल झाले होते. यातील सहा उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने निवडणूक बिनविरोध झाली. बिनविरोध निवडून आलेल्या संचालकांमध्ये सर्वसाधारण दहा जागांसाठी अजय अनंत लाड, महेश मधुकर आलेकर, अशोक मारुती गावडे, महेंद्र मधुकर जगताप, बालाजी पंढरीनाथ मुंडे, विजय दत्ताराम चीपकर, राजेश रमाकांत निकम, विठ्ठल मारुती शेलटकर यांचा समावेश आहे.

### विविध टप्प्यांमध्ये जाहिरात देणार



शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीनंतर पद भरतीसाठी आवश्यकतेनुसार तीन महिन्यातून एकदा व्यवस्थापनाकडून पोर्टलवर जाहिराती घेण्यात येतील. त्यात त्या-त्या कालावधीमध्ये आलेल्या जाहिरातीसाठी पात्र उमेदवारांकडून एकत्रित प्राधान्यक्रम घेऊन शिफारस पात्र उमेदवारांची व्यवस्थापननिहाय यादी प्रसिद्ध करण्यात येईल. विविध टप्प्यांमध्ये जाहिरात येणार असल्याने उमेदवाराची एकदा निवडीसाठी शिफारस झाल्यानंतर असा उमेदवार पुन्हा नव्याने येणाऱ्या जाहिरातीनुसार, त्याने अर्ज केल्यास, निवडीसाठी पात्र राहील.

## बेकायदा दारू विक्रीवर कारवाई



सावंतवाडी, (वा.) बेकायदा दारू विक्री करताना आरोंदा येथे एकावर कारवाई करण्यात आली आहे. सातु आगस्तीन फर्नांडिस (रा.मटवाडी), असे संशयिताचे नाव आहे. त्याच्याकडून ६ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई स्थानिक गुन्हा अन्वेषण आणि आरोंदा पोलिसांनी शुक्रवारी दुपारच्या सुमारास केली. दरम्यान, या प्रकरणी सावंतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, संशयित हा आपल्या घराजवळ अवैध दारू विक्री करत होता. याबाबतची गुप्त माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी ही कारवाई केली. यावेळी संशयिताकडून ६ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## गजानन पाटणकर यांची ग्वाही

# शिक्षकेतर बांधवांना न्याय मिळवून देणार

चिपळूण, (वा.) प्रत्येक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न निकाली काढणेस संघटना प्रयत्नशील असून शिक्षकेतर बांधवाना न्याय देण्यासाठी संघटना बांधिल आहे, अशी ग्वाही रत्नागिरी जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन पाटणकर यांनी दिली. चिपळूण एज्युकेशन सोसायटीच्या महाराष्ट्र हायस्कूल सभागृहत आयोजित रत्नागिरी जिल्हा शिक्षकेतर संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभेत गजानन पाटणकर बोलत होते. संघटनेचे कार्यवाह प्रकाश साळवी यांनी प्रास्तविक केले. प्रथम मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. तसेच सन २०२०-२१ चा आर्थिक अहवाल वाचून दाखविण्यात आला. केलेला खर्च योग्य असून उपस्थित सदस्यांनी संस्थेच्या आर्थिक सक्षमतेबाबत समाधान व्यक्त केले.

### आकृतीबंध सादर



पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारीत सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेंतर्गत १०/२० सेवाधरुन वेतन मिळावे, याबाबत सदस्यांनी मागणी केली. यासाठी जिल्हा समन्वयातून राज्य संघटना प्रयत्नशील असलेबाबत तसेच जिल्ह्यातील शिक्षकेतरांची प्रलंबित देयके, मान्यात प्रस्ताव अनुकंपा नियुक्तीबाबत संघटनेच्यावतीने जिल्हा शिक्षण विभागाशी संपर्कातून प्रयत्न केले जात असलेबाबत रत्नागिरी तालुका संघटनेचे रामचंद्र केळकर यांनी सांगितले. शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंध व त्यानुसार अतिरिक्त शिक्षकेतर कर्मचारी यांचेबाबत रायगड जिल्हा शिक्षकेतर संघटनेनी सादर केले.

## नवे धोरण • उदय सामंतांची घोषणा; इलेक्ट्रीक व्हेईकल, फूड प्रोसेसिंग क्लस्टरसाठी उद्योजकांना सहकार्य

# 'फुटवेअर क्लस्टर' धोरण ३० दिवसांत बनणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. फुटवेअर अँड लेदर क्लस्टर, स्टील पार्क, इलेक्ट्रिक व्हेईकल व फूड प्रोसेसिंगसाठी राज्यामध्ये मुबलक प्रमाणात संसाधने उपलब्ध असून फुटवेयर आणि लेदरसंदर्भात येत्या ३० दिवसांमध्ये धोरण निश्चित होणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिली.

आज फुटवेअर अँड लेदर, स्टील पार्क, इलेक्ट्रिक व्हेईकल व फूड प्रोसेसिंग क्षेत्रासाठी क्लस्टर उभारण्याबाबत उद्योगमंत्री श्री.सामंत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य असून ज्या क्षेत्रासाठी राज्याची धोरणे निश्चित नाहीत अशा क्षेत्रासाठी तत्काळ धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच काही उपलब्ध धोरणांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. फुटवेअर अँड लेदर उद्योगांसाठी येत्या ३० दिवसांमध्ये याबबत धोरण निश्चित झाल्यानंतर 'फुटवेयर आणि लेदर क्लस्टर' उभारण्यात येणार असल्याचे श्री.सामंत यांनी सांगितले.

श्री.सामंत म्हणाले, विदर्भामध्ये स्टील उद्योगासाठी लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या उद्योगांसाठी आवश्यक असणारी संसाधने आपल्याकडे असल्यामुळे स्टील उद्योगासंदर्भात धोरण निश्चित करून लवकरच काही जिल्ह्यामध्ये स्टील पार्क उभारण्यात येणार आहे.




### प्रोत्साहन देण्याबाबत निर्णय

फुटवेअर अँड लेदर, स्टील पार्क, इलेक्ट्रिक व्हेईकल व फूड प्रोसेसिंग क्षेत्रासाठी क्लस्टर उभारण्याबाबत चर्चा झाली. त्यानंतर पर्यावरणपूरक असणाऱ्या इलेक्ट्रिक व्हेईकल संदर्भात राज्य सरकारची भूमिका उद्योजकांना पूर्णपणे सहकार्य करण्याची आहे. नियोजित 'इलेक्ट्रिक व्हेईकल पार्क' ला आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. त्याचप्रमाणे फूड प्रोसेसिंग प्रकल्प संदर्भात राज्य शासन केंद्र शासनाशी पाठपुरावा करीत असून राज्य शासनाकडून योग्य ते प्रोत्साहन देणेबाबत निर्णय घेणार असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले. यावेळी, प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.विपिन शर्मा, उद्योजक सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य

श्री. सामंत म्हणाले, महाराष्ट्र राज्य हे उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य करीत असून अधिकाधिक उद्योग राज्यात यावेत यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. राज्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी काही नवीन धोरणांची निर्मिती करून सध्या असलेल्या धोरणांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

# डीएड बेरोजगार संघर्ष समितीची स्थापना

सावंतवाडी, (वा.) जिल्ह्यातील डीएड बेरोजगारांना न्याय मिळावा, यासाठी जिल्हास्तरीय संघटना नुकतीच स्थापन करण्यात आली आहे. डीएड/डीटीएड बेरोजगार संघर्ष समिती, सिंधुदुर्ग या नावाने ही संघटना असून कार्यकारिणी पुढीलप्रमाणे गठीत करण्यात आली आहे. अध्यक्ष - विजय फाले (दोडामार्ग), उपाध्यक्ष– स्वराली वाक्कर (कुडाळ), सचिव - सहदेव पाटकर (कुडाळ), सहसचिव- गौरी आडेलकर (कुडाळ), खजिनदार- नाना देसाई (दोडामार्ग), सल्लागार- तेजस देसाई (दोडामार्ग), सदस्य- गणपत डांगी (दोडामार्ग), शिवप्रसाद नाटेकर (दोडामार्ग), श्रुती तारी (सावंतवाडी), विलास जंगले (सावंतवाडी), सुरेश ताटे (दोडामार्ग), अमृता तेली (कुडाळ), देऊ धोंड (वेंगुर्ला), गौरवी महाजन (दोडामार्ग), मीनल कदम (सावंतवाडी), सोनाली कोदे (मालवण), नीलेश तिर्लोटकर (देवगड). स्थानिक पदवीधारकांना प्राधान्य देऊन पूर्वीप्रमाणे सेवा आयोजन कार्यालयामार्फत जिल्हा निवड मंडळामार्फत स्थानिक पातळीवर डीएडच्या मेरिटप्रमाणेच स्थानिकांमधूनच शिक्षक भरती करावी, टीईटी परीक्षेत महाराष्ट्र राज्यात बोगस प्रमाणपत्रांचा मोठा भ्रष्टाचार झाल्यामुळे टीईटी परीक्षा मारक आहे, अशा बोगस परीक्षेवर आता कोणाचाही विश्वास राहिला नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराने माखलेली ही अट रद्द करून जिल्हा पातळीवर एकच परीक्षा घेऊन किंवा पदविका मेरीटचा विचार करून स्थानिकांमधूनच शिक्षक भरती करावी.

## रांगोळी स्पर्धेत निशा ओली प्रथम

चिपळूण, (वा.) शहरातील माधव सभागृह येथे घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत निशा ओली यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत एकूण ६६ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी दहा स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त निशा ओली यांना रोख रक्कम दोन हजार पाचशे रुपये, चषक व प्रशस्तीपत्र, द्वितीय क्रमांक प्राप्त रश्मी कदम यांनो दोन हजार रुपये व प्रशस्तीपत्र, तृतीय क्रमांकप्राप्त शिवशंभो प्रतिष्ठानला एक हजार रुपये व प्रशस्तीपत्र, चतुर्थ क्रमांकप्राप्त राजे महाडिक ग्रुपला पाचशे रुपये व प्रशस्तीपत्र, पाचवा क्रमांक प्राप्त पूजा पुरोहित यांना पाचशे रुपये व प्रशस्तीपत्र, तर सहावा क्रमांक प्राप्त संजना जाधव, सातवा क्रमांक प्राप्त झोलाई ग्रुप, आठवा क्रमांक प्राप्त ईश्वरी चव्हाण हिने प्राप्त केला.